किंमत १ रुपया
( वा. वर्गणी ६ रु. )

Reg. No. B, 3434 Licence No. 18
Licenced to post without prepayment

# दिवाळी अर्थ अंक

वर्ष १८ | पुणें, बुधवार तारीख ११ आक्टोबर, १९५१ | अंक ४१


## लेख व लेखक

१ आर्थिक वाङ्मयास व्यावसायिकांचा हातभार ( संपादकीय ) ३३३
२ महाराष्ट्रीय बँकांना विनंति ( चिं. वि. जोग ) ३३४
३ बँकांच्या संचालकांचीं कर्जें ( " इनवल " ) ३३७
४ काळ ओळखून वागण्याचा अर्थमंत्र्यांचा इशारा ( शं. ज. जोशी ) ३३९
५ लांच, कमिशन, सूट, सर्व अन्याय्य ( के. बी. साठे ) ३४१
६ मुंबई राज्यांतील दुष्काळी प्रदेश ( वा. रु. कोगेकर ) ३४२
७ संशोधन " केल्यानें होत आहे रे " ( श्री. द. लिमये ) ३४७
८ लँड मॉर्गेज बँकांस नव्या भांडवलाचा तुटवडा ( आ. ना. कल्याणी ) ३४९
९ व्यावसायिक उत्कर्षांतील पत्नीचा वांटा ( 'विवेक परदेशी' ) ३५१
१० रॉकफेलर फौंडेशनचा अहवाल ३५४
११ लोकशाही आणि सहकारी संस्था ( य. द. सोले ) ३५५
१२ विक्रेत्याची गिऱ्हाइकाशीं वागणूक ३५६
१३ ब्रिटनमधील जीवनक्रम ( स. वा. कोगेकर ) ३५७
१४ दुष्काळ-निवारण ( न. स. जोशी ) ३५९
१५ हिंदी बँकांनीं दिलेल्या कर्जांची वर्गवारी ३६५
१६ करचुकव्यांचा करास बेजबाबदार विरोध ( ग. रा. साठे ) ३६७
१७ राहणीच्या खर्चाचें मान उतरलें ३६७
१८ ठेवींचा विमा ( गो. वि. सराफ ) ३६९
१९ जगांतील सर्वांत मोठ्या बँका ३७०
२० भारतांतील सर्वांत मोठ्या बँका ३७०

★ ही दीपावलि आमचे भागीदार व खातेदार यांना सुखसमृद्धीची जावो. ★

: संचालक मंडळ :
श्री. धों. कृ. साठे, ( अध्यक्ष )
श्री. श्री. गो. मराठे, ( उपाध्यक्ष )
श्री. न. ग. पवार
श्री. फ. दो. पदमजी
श्री. मा. रा. जोशी
श्री. मा. वी. शहा
श्री. शं. ल. किर्लोस्कर
श्री. भा. म. गुप्ते

बँकेच्या डेक्कन जिमखाना शाखेंत सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय.



आपली बचत प्रभावी शक्ति निर्माण करील
परंतु ह्यांकरितां आपल्या ठेवी योग्य बँकेत राहूं द्या.

भांडवल
★ वसूल भांडवल रु.१६,००,०००
★ रिझर्व्ह फंड रु. ५,६५,०००
★ खेळते भांडवल रु.३। कोटींवर

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.
–पुणें २.–
मॅनेजर – चिं. वि. जोग

: शाखा-विस्तार :
मुंबई ( फोर्ट, गिरगांव, दादर व कल्याण ), पुणें ( डेक्कन जिमखाना व खडकी , नाशिक, चाळिसगांव, धुळें, जळगांव, नागपूर, रत्नागिरी, कोपरगांव, हुबळी, सोलापूर, कोल्हापूर, द. हैद्राबाद, सांगली व अमरावती.

ठाणें व हरिहर येथें शाखा लवकरच सुरू होणार.

★ एक्झिक्यूटर व ट्रस्टीचीं कामें महाराष्ट्र एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी कंपनी करते.

सहकार्य, ऐक्य, चिकाटी व दीर्घोद्योग यांचे जोरावर शेतकऱ्यांनीं उभारलेली व शेतकऱ्यांच्याच पूर्ण मालकीची व शेतकऱ्यांनींच चालविलेली अखिल भारतांतील एकच आदर्श साखर संस्थाः—

# दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि.,

## माळीनगर, जिल्हा सोलापूर.

पंढरपुरी ( पवित्र साखरेचे निर्माते )

| स्थापना | अधिकृत भांडवल | वसूल भांडवल |
|---|---|---|
| १९३१ | ५१,००,००० | रु. ३७,७९,३७५ |

हा कारखाना शेतकऱ्यांनींच स्वतःचे भांडवलावर उभारून स्वतःच चालविला आहे. सर्व बागायतदार पिढीजात जातिवंत शेतकरी असल्यानें अखिल भारतांत ऊंस-उत्पादनाचा त्यांनीं उच्चांक गांठला आहे.

सुरुवातीस साखरेची मशिनरी दररोज २५० टन ऊंस गाळणें इतकी होती, ती वाढवून आतां ५५० टनांची झाली आहे. येत्या सीझनपासून कारखान्याची कार्यक्षमता वाढवून दररोज ७५० ते ८०० टन ऊंस गाळणेकरितां कारखान्यांत अद्ययावत् इलेक्ट्रिक यंत्रसामुग्री बसविण्याचे बोर्ड ऑफ डायरेक्टर्स यांनीं योजिलें आहे व त्याकरितां जरूर ती परदेशांतून मागविलेली यंत्रसामुग्री येत असून बसविली जात आहे. यामुळें येत्या सीझनमध्यें या आधुनिक व सुसज्ज कारखान्यांतून निघालेली पांढरी शुभ्र दाणेदार साखर आपणांस वापरणेस मिळेल.

**आमच्या सर्व ग्राहकांस, भागीदारांस, हितचिंतकांस व मित्रमंडळींस नूतन वर्ष संपत्तिदायक, उत्कर्षाचें व सुखाचें जावो, ही शुभेच्छा.**

**ह. व. गिरमे,**
मॅनेजिंग डायरेक्टर

**दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि.**
पो. माळीनगर, जि. सोलापूर.

# धी बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड,

९ बेक हाऊस लेन, फोर्ट मुंबई.

स्थापना १९११

टेलिफोन नं. १५४६१ / ३१६८६ चेअरमन—**श्री. आर. जी. सरैया,** ओ. बी. ई. (पोस्ट बॉक्स नं. ४७१ / (तारेचा पत्ता : फॉर्मरबँक

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल—भागीदारांतर्फे | रु. ३३,१८,६०० | |
| मुंबई सरकारतर्फे | रु. १६,००,००० | रु. ४९,१८,६०० |
| गंगाजळी व फंड .... .... .... .... | | रु. ३९,२७,५०० |
| ठेवी .... .... .... .... .... | | रु. ७,५८,०१,००० |
| खेळतें भांडवल .... .... .... .... | | रु. १२,१७,६१,००० |

## १५ जिल्ह्यांमध्यें ६३ शाखा.

**भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींसाठी चौकशी करावी.**

**वा. पुं. वर्दे**
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.

# दि मराठा को-ऑपरेटिव्ह क्रेडिट बँक लि., बेळगांव

स्थापना ] बेळगांव [ १९४२

(१) अधिकृत भांडवल रु. १,००,०००
(२) वसूल भांडवल रु. ४९,२००चे वर
(३) रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्हेज्‌ रु. ३३,१३०चे वर
(४) एकूण खेळतें भांडवल रु. ४,७६,३००चे वर

या बँकेंत सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

व्याजाचे दर आकर्षक आहेत. याचा ठेवीदारांनीं अवश्य फायदा घ्यावा.

बँक सुरुवातीपासून "अ" वर्गांत आहे. यावरून बँकेचा कारभार अत्यंत दक्षतेनें केला जातो, हें सिद्ध होतें.

विशेष माहितीसाठीं भेटा.

ए. के. सोमणाचे, D. CO-OP. सेक्रेटरी.
जी. एम्. भातकांडे, चेअरमन.



५०

पन्नास वर्षांपेक्षां जास्त सरदारगृह जनतेची सेवा करीत आहे. त्याचा पूर्वीचा राहण्याचा व जेवणाचा उच्च दर्जा हल्लींच्या महागाईच्या व बदललेल्या काळांत जेवढा ठेवतां येईल तेवढा ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

# सरदारगृह

—क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २—
फोन ३१०८४—तार 'सरदारगृह'

मुंबईंतील एक प्रसिद्ध निवासस्थान
प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

## स्पेशल भोजनाची नवी सोय

लग्न-मुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टीची मनपसंत व्यवस्था, हें विशेष वैशिष्ट्य

हें वर्ष आमच्या आश्रयदात्यांस सुखाचें जावो.



यंदाची दिवाळी सर्वांस सुखाची जावो !

# दि कोल्हापूर मराठा को-ऑप. बँक लि., कोल्हापूर.

( स्थापना १९३३ )

शेअर भांडवल उभारलेली रु. २,००,०००
शेअर भांडवल वसूल रु. १,००,२३०
रिझर्व्ह व इतर फंडस्‌ रु. ७७,३१५
खेळतें भांडवल रु. ७,००,०००

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

सूचनाः--डिव्हिडंड वांटणी सुरू आहे.

भा. सा. पाटील, प्रेसिडेंट.
व्ही. एन. यादव, मॅनेजर.
जे. डी. भोसले, ऑ. सेक्रेटरी



—सुंदर बनारसी पातळें—
नवीन जरीचीं लुगडीं
व
मिलचें कापड
—यांकरितां—

# शाहाडे-आठवले लि.,

—दादर—

शाहाडे बिल्डिंग; एन्. सी. केळकर रोड
दादर, मुंबई २८
:: टेलिफोन ६०५५४ ::

नेतृत्व—आपली प्राचीन परंपरा



# अतुलनीय ऑंडनिक

अति प्राचीन कालपासून भारतीय पोलादाची उत्कृष्टपणाविषयीं सुधारलेल्या देशांत ख्याति होती. भारतीय पोलाद इतर देशांच्या पोलादापेक्षां इतकें उत्कृष्ट नि सरस होतें कीं, हरएक व्यापारी पेठेंत त्याला बेसुमार मागणी असे. भूमध्य समुद्राच्या पूर्व किनाऱ्यावरील देशांत "वूट्झ" या नांवानें प्रसिद्ध असलेल्या पोलादापासूनच, मजबुती व सौंदर्य या दोन्ही गुणांबद्दल ख्याति असलेले नक्षीदार दमास्कस चिलखत बनविण्यांत येत असे. मध्ययुगीन अरबांच्या तलवारी आणि तेराव्या शतकांत युरोपांतील सरदार वापरीत असलेल्या चिलखतांसारखें सालळीदार व चकचकीत चिलखत हीं निष्णात भारतीय कारागिरांनीं आपल्या कारखान्यांत बनविलेल्या पोलादापासूनच बनविण्यांत येत असत.

मार्को पोलोनें उल्लेखलेलें 'ऑंडनिक' पोलाद आणि स्पॅनिश चिलखत बनविण्यासाठीं वापरण्यांत येत असलेलें "अऊहुदे" व "अलफिंदे" हीं नांवें भारत–पर्शियामध्यें भारतीय पोलादास दिलेल्या "हुंड्वनीज" या नांवाचा केवळ अपभ्रंशच होत. सध्यां भारतीय कारागिरी व बुद्धिमत्ता पुन्हा नव्यानें चमकूं लागली आहेत. आपल्या मालाचा श्रेष्ठ दर्जा अधिकच वाढविण्यासाठीं व नव्यानें अमता मिळविण्यासाठीं प्राचीन कसब आधुनिक तंत्रकलेची जोड घेत आहे. ह्या भारतीय पुनरुज्जीवन कार्यांत टाटा स्टील अत्यंत महत्त्वाची कामगिरी बजावतें.

दि टाटा आयर्न ॲण्ड स्टील कंपनी लि०

TN.?012

# अर्थ

## दिवाळी अंक

बुधवार, ता. २१ आक्टोबर, १९५१

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः





स्थापना : १९३९

संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

अर्थमूलौधर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र


**“अर्था”च्या वाचकांस व हितचिंतकांस नवें वर्ष आनंदाचें व समृद्धीचें जावो.**

# आर्थिक वाङ्मयास व्यावसायिकांचा हातभार

“अर्था”चा १८ व्या वर्षाचा हा दिवाळी अंक वाचकांस सादर करण्यास आम्हांस आनंद होत आहे. गेलीं अठरा वर्षें “अर्थ” मराठी वाचकांना आर्थिक विषयांसंबंधीं मार्गदर्शक लेख, माहिती व आकडे पुरवून, आणि तज्ज्ञांकरवींहि मार्गदर्शन करून महाराष्ट्रीय व्यावसायिक व्यक्ती व संस्था ह्यांची बैठक सुदृढ करण्याचें कार्य कसोशीनें करीत आहे. “अर्था”च्या ह्या कामगिरीबद्दल अर्थमंत्रि, श्री. चिंतामणराव देशमुख, ह्यांनीं आपण होऊन गौरवाचे उद्गार काढले, ते वाचकांस परिचित आहेतच. “सर्वसाधारण समाजाला दुर्बोध व गुंतागुंतीच्या घडामोडींची अंतःप्रवणता समजून घेण्यांत त्यांना सहाय्य देणें, हें आपल्या “अर्थ” साप्ताहिकाचें कार्य राष्ट्रहिताच्या दृष्टीनें फार महत्त्वाचें आहे. “अर्थ” ही कामगिरी फार उत्कृष्ट रीतीनें बजावीत आहे असें मी स्वानुभवावरून दृढनिश्चयानें सांगूं शकतो” असा अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला आहे. अशा गौरवास “अर्था”ची कामगिरी पात्र तर झालीच; त्याबरोबरच प्रत्यक्ष व्यवसाय करणाऱ्या व्यक्ती, कारखाने, संस्था, सोसायटया, कंपन्या, इत्यादिकांस “अर्था”च्या परिशीलनानें प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फायदा सतत होत आहे; ती नित्य अनुभवाची गोष्ट आहे. त्याचें अगदीं ताजें उदाहरण म्हणजे, कितीतरी बँकांच्या संचालकांनीं आपल्या अहवालांत “अर्था”मधील कर्जविषयक धोरणाच्या उपयुक्त सूचना उद्धृत करून, त्या सूचनांचें लोण अगदीं खालपर्यंत व दूरपर्यंत पोंचविलें आहे. महाराष्ट्रीय सद्प्रवृत्त व्यक्ती व संस्था ह्यांच्या हार्दिक सहाय्यामुळें व सहकार्यामुळेंच “अर्था”चें व्रत टिकवतां आलें आहे, म्हणून त्यांचे आम्हीं मनःपूर्वक आभार मानतों. “अर्था”ची कामगिरी ज्यास्त भरीव होण्यासाठीं त्यांच्या मदतीचा अधिकाधिक उपयोग ह्यापुढेंहि होत राहील, ह्याची आम्हांस खात्री वाटते. आमच्या सर्व सहाय्यकांस व हितचिंतकांस ही दिवाळी व नवें वर्ष समृद्धीचें जावों.

ह्या अंकांतील लेख व लेखक ह्यांचेकडे लक्ष दिलें असतां असें दिसून येईल, कीं सर्व लेखक हे त्या त्या विषयांतील अनुभवी व तज्ज्ञ असेच आहेत. प्रत्यक्ष व्यवसायांत गुंतलेल्यांनीं त्या व्यवसायासंबंधीं आपले विचार मांडावे, चर्चा करावी, हें केव्हांहि इष्ट. परंतु, आजवर मात्र कांहीं ठराविक व्यासंगी लोकांनींच सर्व विषय हाताळावे, अशी परिस्थिति होती. व्यावसायिक लोक लेखन करण्यास पुढें येत नसत. अनेक व्यावसायिकांना लेखनास प्रवृत्त करून लेखांचें स्वरूप वास्तववादी करण्यामध्यें बरेंच यश मिळाल्याबद्दल आम्हांस समाधान वाटतें. त्यांच्या लेखाबद्दल आम्हीं त्यांचे ऋणी आहों. आर्थिक वाङ्मयास व्यावसायिकांचा लागलेला हातभार महाराष्ट्राच्या प्रगतीच्या दृष्टीनें आम्हांस महत्त्वाचा वाटतो. लेखनाप्रमाणें भाषणें, चर्चा व निवेदनें ह्याहि बाबतींत त्यांनीं पुढाकार घेतला व तारतम्यानें आपले प्रश्न पुढें मांडले, तर ती अत्यंत स्वागतार्ह अशी गोष्ट होईल, ह्यांत संशय नाहीं. केवळ तांत्रिक दृष्टीनें कांहीं यश मिळालें, तरी तें हातीं पाडण्यासाठीं व वाढविण्यासाठीं वेगळे गुण लागतात, आणि ज्यांचेपाशीं ते मुळांतच आहेत किंवा ज्यांना ते मिळवितां आले, त्यांच्या उपक्रमांचा विस्तार त्या प्रमाणांत झालेला आपणांस आढळतो. अर्थात्, ह्या बाबतींत बऱ्याच प्रगतीस अद्याप वाव आहे, आणि ह्या दृष्टीनें प्रयत्न करण्यांत आले पाहिजेत.

“अर्था” च्या तज्ज्ञ व अनुभवी लेखक-वर्गानें आपुलकीनें सतत केलेल्या लेखनसहाय्याचा येथें कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला पाहिजे. चालू आर्थिक विषयांवर साप्ताहिक लेखन करणें किती अवघड आहे, ह्याची ज्यांना कल्पना असेल त्यांनाच ह्या लेखनसहाय्याची आम्हांस किती किंमत वाटते हें लक्षांत येईल. त्या सर्वांस ही दिवाळी व नवें वर्ष आनंदाचें जावों.

ह्या अंकांतील कांहीं विषयांकडे वाचकांचें लक्ष वेधणें योग्य होईल. महाराष्ट्रीय बँकांनीं सहकार्यानें एकत्र येऊन एखादी योजना आखली, तर त्यामुळें बँकिंगच्या दृष्टीनें कसा फायदा होईल आणि त्याबरोबरच व्यापारी आणि कारखानदार ह्यांचें कसें हित होईल, ह्याची छाननी करण्याची सूचना विचारार्ह आहे. बँकांचे संचालक कर्ज देण्याच्या आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करीत आहेत आणि त्यावर जालीम उपाययोजना केली पाहिजे, तिचा संचालकेतर हितसंबंधी लोकांनीं गंभीरपणें विचार करण्याची वेळ आली आहे, असें एका तज्ज्ञानें कळकळीनें सुचविलें आहे. कारखानदारांनीं काळ ओळखून वागलें पाहिजे, महाराष्ट्रांतील दुष्काळी प्रदेशाबाबत साधार व अनुभवसिद्ध चर्चा, संशोधन करीत राहिलें पाहिजे, सहकारी संस्थांच्या निवडणुकी, लोकशाही ब्रिटनमधील सुखी जीवनाचें रहस्य, इत्यादि विषयहि अत्यंत महत्त्वाचे असून त्यांवरील चर्चा मार्गदर्शक झाली आहे. महत्त्वाच्या विषयावरील आंकडे आणि तक्ते हेहि, वाचकांस उद्बोधक वाटतील.

“अर्था”चा ता. १९ चा अंक बंद राहून ह्यापुढील अंक ६ नोव्हेंबर रोजीं प्रसिद्ध होईल.

# महाराष्ट्रीय बँकांना विनंती

( लेखक :— चिं. वि. जोग, बी. कॉम., एफ्. आय्. बी. लंडन )

*बंगालमधील चार मोठ्या बँकांचें एकत्रीकरण १९५० सालीं होऊन त्यांतून 'युनायटेड बँक ऑफ इंडिया' ही मोठी बँक निर्माण झाली. त्या प्रयोगाकडे त्यावेळीं महाराष्ट्रांत सर्वांनीं दुर्लक्ष केलें. राजस्थानांत अशाच एका बँकेची स्थापना होऊं घातली आहे. तेथील बँकांच्या विचारप्रणालीपासून महाराष्ट्रास बोध घेता येण्यासारखा आहे. महाराष्ट्रीय नियामक मंडळांखालील आठ शेड्यूल्ड बँकांचें एकत्रीकरण झाल्यास तें अत्यंत इष्ट व फायदेशीर होईल. परिस्थितीनें ठेंचा दिल्या-वरच जागें होण्यांत काय स्वारस्य आहे ? सर्व हितसंबंधीयांनीं ह्याचा दक्षतेनें विचार करावा.*

१९५० सालीं बंगालमध्यें बँकिंग क्रायसिस ज्याला म्हणतां येईल अशी परिस्थिति निर्माण झाली नि त्याची झळ अनेक बँकांना लागली. पुष्कळशा बँकांच्या ठेवीदारांची पैसे परत घेण्यासाठीं झुंबड उडाली नि ही परिस्थिति आटोक्यांत न आल्यानें नाथ बँकेसारख्या बँका बुडाल्या देखील. या सर्व परिस्थितीपासून योग्य तो धडा घेऊन बेंगाल सेंट्रल बँक, कोमिल्ला बँकिंग कॉर्पोरेशन, कोमिल्ला युनियन बँक आणि हुगळी बँक या चार जुन्या बँकांनीं एकत्र यावयाचें ठरवलें. यांतील बेंगाल सेंट्रल बँक १९१८ सालीं, कोमिल्ला बँकिंग कॉर्पोरेशन १९१४ सालीं, युनियन बँक १९२२ सालीं व हुगळी बँक १९३२ सालीं स्थापन झाली होती. म्हणजे, एकत्रीकरणाचा विचार करणाऱ्या बँका १८ ते ३२ वर्षांइतक्या जुन्या होत्या. पण परिस्थितीनें परंपरेवर मात केली नि या चार बँका यशस्वी रीतीनें एकत्र येऊन १९५० मध्यें १८ डिसेंबरला युनायटेड बँक ऑफ इंडिया ही मोठी बँक त्यांतून निर्माण झाली. तिचें जमा झालेलें भांडवल २,६४,६१,९५२ रु. झालें व गंगाजळी १ कोटी १८ लाख रु. झाली. या एकत्रीकरणामुळें १४४ शाखांपैकीं ३६ अडगळीच्या शाखा बंद झाल्या, ठेवींत २ कोटी, ८६ लाखांची नवीन भर पडली. कारण, लोकांचा वाढलेला विश्वास हेंच होय. या बँकेचा पहिल्या वर्षी नफा २०,४१,००० रु. इतका झाला नि आर्थिक स्थैर्याचा मजबूत पाया असलेली एक नवी बँक निर्माण झाली.

### महाराष्ट्रांत झालेलें दुर्लक्ष

त्यावेळीं महाराष्ट्रांत सुद्धां असा कांहीं प्रयोग करतां येईल का, याचे वारे वाहूं लागले. पण, तिकडे सगळ्यांनीं दुर्लक्ष केलें आणि त्याला कारणें म्हणून, बंगाल व महाराष्ट्राची परिस्थिति खूप वेगळी आहे, बंगालमध्यें कांहीं बँका बुडाल्या, कित्येकांची आर्थिक स्थिति असमाधानकारक झाली; या उलट महाराष्ट्रांत गेल्या २०–२५ वर्षांत एकही बँक बुडाली नाहीं, उलट सर्व बँकांचा कारभार समाधानकारक व सुव्यवस्थेखालींच चालू आहे, तेव्हां अशी आवश्यकता नाहीं, अशीं देण्यांत आलीं. हें जरी खरें असलें तरी असे प्रयत्नच करूं नयेत असा कांहीं त्याचा अर्थ नव्हता. आधींच जागें होऊन मजबूत बांधणी करण्यापेक्षा घराच्याच भिंती कोसळल्यावर मग आधार द्यायला निघायचें, या प्रकारचीच ही प्रवृत्ति होय. केवळ अंगावर शेकूं लागल्यावरच मग निभावून जाण्याचे मार्ग शोधावेत, असा कांहीं सिद्धांत नाहीं. पण तिकडे अजूनही कुणाचें लक्ष वेधलें गेलेलें दिसत नाहीं नि आज या प्रश्नाकडे परत जिव्हाळ्याच्या नजरेनें बघण्याचें व इतरांचें लक्ष केंद्रित करण्याचें कारण म्हणजे राजस्थान या नवीनच निर्माण झालेल्या राज्यांत होऊं घातलेली अशीच दुसरी बँक हें होय.

### राजस्थानांतील प्रयोग

ता. ६–९–१९५२ च्या कॉमर्स साप्ताहिकांत अशी बातमी प्रसिद्ध झाली आहे कीं, राजस्थानमधील बँक ऑफ जयपूर, बँक ऑफ राजस्थान व बँक ऑफ बिकानेर या तीन बँका अशाच एकत्र येऊन नवीन बँक निर्माण करण्याच्या प्रयत्नांत असून त्यांना कदाचित् जोधपूर कमर्शियल बँकहि येऊन मिळेल. इथें हा विचार करणें आवश्यक आहे कीं, या बँका बंगालमध्यें निर्माण झालेल्या परिस्थितीसारख्या परिस्थितीमुळें एकत्र येत नसून त्या आपणहून आर्थिक स्थैर्याची वाढ करण्याकरतां ही गोष्ट करीत आहेत. या बँका जयपूर, उदेपूर, बिकानेर व जोधपूर या पूर्वीच्या संस्थानांतून स्थापन झालेल्या होत्या. पुढें संस्थानांचें विलीनीकरण झाल्यावर अशा संस्थानी बँकांपुढें वेगवेगळे नवीन प्रश्न साहजिकच उपस्थित झाले. पूर्वी या बँकांना संस्थानांचा पाठिंबा असे वा त्या त्यांचे खजिनदार म्हणून कामें बघत; पण त्यामुळें प्रत्येकाचें क्षेत्र फारच मर्यादित होतें. राजस्थान राज्य नवीन निर्माण झाल्यानंतर जरी हें खजिनदारीचें काम त्यांच्याकडे राहिलें तरी तें एका बँकेकडे न रहातां चौघा बँकांत वाटलें गेलें व अशा रीतीनें प्रत्येक वैयक्तिक बँकेस फार थोडें काम मिळाल्यानें त्यांचें क्षेत्र आणखी मर्यादित झालें. उत्पन्न नि आवक यावर जरी अशी मर्यादा पडली तरी एकमेकांतल्या स्पर्धेमुळें त्यांना ठेवीवर व्याजाचे दर जास्त ठेवावे लागत, पण कर्जावर मात्र कमी व्याज आकारावें लागे. शिवाय, दर ठिकाणीं प्रत्येक बँकांच्या शाखांमुळें द्विरुक्ति मात्र उगीचच होत होती. युद्धकालीन व युद्धोत्तर भरभराट संपत चालली नि सगळ्यांच्या संयुक्त ठेवींत यापुढें भर पडणें अशक्य झालें. एका बँकेंतून ठेव कमी होऊन दुसरीकडे वाढ होणें हें वाढीचें लक्षण समजलें जात नाहीं. या बँकांपैकीं प्रत्येकीची आर्थिक परिस्थिति समाधानकारक आहे असें त्यांच्या ताळेबंदावरून समजण्यास हरकत दिसत नाहीं. बंगालमध्यें युनायटेड बँक स्थापन होण्यापूर्वी जी परिस्थिति निर्माण झाली तशी त्यांच्याबाबत मुळींच नाहीं. तरी देखील एका वेगळ्या विचार-प्रणालीमुळें त्या एकत्र होत आहेत. त्यामुळें होणाऱ्या संयुक्त बँकेचें आर्थिक स्थैर्य जास्त बळकट होईल. तोट्यांत चालणाऱ्या शाखा बंद करण्यांत येतील. खर्च कमी होईल. लोकांत जास्त विश्वास निर्माण झाल्यानें नवीन ठेवीदार आकर्षित होतील. एकमेकांतील स्पर्धा बंद झाल्यानें दरांत सुसूत्रता येईल नि त्या भागांतील उद्योगधंदे व व्यापार यांना वाढत्या प्रमाणांत मदत मिळूं शकेल. रिझर्व बँक अशा एकत्रीकरणाचें नेहमींच स्वागत करणारी असल्यानें कदाचित् या नव्या बँकेला राजस्थानमधील रिझर्व बँकेचे प्रतिनिधी म्हणूनहि नेमण्यांत येईल. यापासून महा-राष्ट्रानें जर कांहीं शिकलें तर बरें, अशा उद्देशानें मीं याचा परत विचार सुरू केला आहे.

### महाराष्ट्रांतील आजची परिस्थिति

बंगालसारखी नसली तरी राजस्थानसारखी परिस्थिति इथें निश्चित आहे. आज महाराष्ट्रांत रजिस्टर झालेल्या एकूण १७ ते १८ शेड्यूल्ड बँकांपैकी महाराष्ट्रीय नियामक मंडळा-खालीं असणाऱ्या अशा ८ शेड्यूल्ड बँका आपल्याकडे आहेत. त्या म्हणजे (१) बँक ऑफ महाराष्ट्र लि. (२) युनायटेड वेस्टर्न बँक लि. (३) न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.

(४) मिरज स्टेट बँक लि. (५) बँक ऑफ पूना लि. (६) सांगली बँक लि. (७) प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि. व (८) बेळगांव बँक लि. या सर्वांची शक्ति विखुरल्यामुळें त्या उरलेल्या ७१८ बँका ज्या भारतभर पसरल्या आहेत त्यांच्याशीं योग्य ती लाभकारक स्पर्धाहि करूं शकत नाहींत. त्यांचें प्रत्येकी भांडवल व एकूण ठेवी त्या त्या बँकेला स्थैर्य देणाऱ्या असल्या तरी त्यांची शक्ति एकत्रित होऊं शकल्यास महाराष्ट्राला भक्कम आर्थिक पाया लाभूं शकेल. आज प्रत्येक बँक व्यक्तिशः लहान असल्यानें व्याजाचे दर जास्त ठेवावे लागत आहेत. सेंट्रल बँक, इंपीरियल बँक, यासारख्या बँका त्यांच्या मोठ्या शक्तीवर कुठेंही शाखा काढून स्पर्धा निर्माण करीत असतां त्यांना यशस्वी तोंड देण्याची कुवत कुठल्याहि बँकेंत नाहीं. ठेवीदार व इतर काम मिळवण्याची शक्ति उगीचच विखुरली गेली असून मोठा धंदा आम्हांला मिळूं शकत नाहीं. परदेशी हुंडणावळीची परवानगी प्रत्येकजण लहान असल्यानें कुणासच न मिळाल्यानें त्यासाठी दुसऱ्या मोठ्या बँकांवर अवलंबून रहावें लागून गिऱ्हाईक बुडतें, तर इतर बाबतींत एकमेकांच्या स्पर्धेचा त्यांना उगीचच फायदा मिळतो. आज या आठहि बँकांच्या मिळून ११५ शाखा आहेत. त्यांतल्या ३६ द्विरुक्ति करणाऱ्या असल्यानें अनवश्यक आहेत. पुणें, मुंबई, सांगली, सोलापूर, बेळगांव, अशा ठिकाणीं सर्वांच्या शाखा आहेत. उलट ठाणें, कुलाबा, अलिबाग, किंवा कोंकण व खानदेश जिल्हे इकडे कुणींच फारसें लक्ष आजवर दिलें नाहीं. वरील बँकांचें एकत्रीकरण होऊं शकल्यास अनवश्यक शाखा बंद करून वरील ठिकाणीं शाखा काढतां येऊन दुर्लक्षित अशा महाराष्ट्राकडे नजर देतां येऊन कार्यक्षेत्र नि खेळतें भांडवलहि वाढेल. सध्या या बँकांपैकी बहुतेकांनीं दक्षिण महाराष्ट्रांतच आपलें लक्ष केंद्रित केलें आहे व उत्तर महाराष्ट्र तसाच दुर्लक्षित राहिला आहे. ही विषमता मग नाहींशी होऊं शकेल. लोकांचा जास्त विश्वास बसून मोठमोठ्या ठेवीहि या नव्या बँकेकडे आकृष्ट होतील. एकमेकांतील स्पर्धा गेल्यानें दरांत सुसूत्रता येऊन लोकांची जास्त सेवा करतां येईल. शिवाय नोकरवर्गावरील पगार, जागा, कर, इतर खर्च, हे सर्व एकदम कमी होऊन नफ्यांत निश्चित वाढ होईल. अशी बँक जर झाली तर तिची व्याप्ति कशी राहील हें खालीं आठहि बँकांचा एकत्रित असा ३१-१२-१९५१ चा ताळेबंद दिला आहे, त्यावरून कळून येईल.

**३१-१२-१९५१ चा आठ बँकांचा एकत्रित ताळेबंद**

**देणें (रु.)**

| | |
|---|---|
| भांडवल | ६९,३०,००० |
| गंगाजळी | २१,८६,००० |
| ठेवी | ८,२१,२०,००० |
| बँकांचीं देणीं | ३७,९३,००० |
| इतर देणीं | ८२,९०,००० |
| नफा | ७,०७,००० |
| खेळतें भांडवल रु. | १०,४०,२६,००० |

**येणें व जिंदगी (रु.)**

| | |
|---|---|
| रोख रक्कम व बँकेंत शिल्लक | १,५६,७७,००० |
| गुंतवणूक (इन्व्हेस्टमेंट) | ३,२०,३८,००० |
| कर्जे | ४,६६,८८,००० |
| इमारती वगैरे कायम स्व. मिळकत | १३,९४,००० |
| फर्निचर वगैरे | ५,०२,००० |
| इतर | ७७,२७,००० |
| खेळतें भांडवल रु. | १०,४०,२६,००० |

**एकत्रीकरणाचे फायदे**

या सर्वांचें अधिकृत भांडवल दोन कोटी, दोन हजार रु. होतें. ताळेबंदाकडे नजर टाकली असतां असें दिसून येईल कीं, प्रत्येक बँकेला स्वतःच्या ताळेबंदाच्या दृष्टीनें जरूरीपेक्षा जास्त रोख रक्कम ठेवणें आवश्यक वाटल्यानें या संयुक्त बँकेच्या एकूण ताळेबंदांत ही रक्कम १ कोटी, ५६ लाख रु. इतकी दिसते. संयुक्त बँक हें एक युनिट झाल्यास हीच रोख रक्कम जास्तींत जास्त एक कोटीपर्यंत म्हणजे एकूण ठेवींच्या सुमारें १२ टक्के ठेवली तरी भागण्यासारखें आहे. अशा रीतीनें वरचे ५६ लाख रु. जे सध्या बिनव्याजीं पडून आहेत ते कर्जे किंवा गुंतवणूक या ठिकाणीं उपयोगी आणतां येऊन त्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नानें नफ्यांत चांगलीच भर पडूं शकेल. गुंतवणुकींत एकूण रक्कम ३ कोटी, २० लाख रु. आहे व ती ठेवींच्या सुमारें ४०% टक्के आहे. हें प्रमाण वाजवी आहे. पण इथेंहि दूरदृष्टीनें पैसे गुंतवून नफ्याचें प्रमाण वाढवतां येण्यासारखें आहे. कर्जाचें प्रमाण एकूण ठेवींशीं ५६% आहे व तेंहि वाजवींच आहे.

अशा तऱ्हेनें योग्य तऱ्हेच्या फेरफारांनीं जिंदगींतून ज्याप्रमाणें नफ्याचें प्रमाण वाढवतां येईल, त्याचप्रमाणें कांहीं ठिकाणीं संयुक्त रीत्या खर्चाचें प्रमाण कमी करतां येईल. अशा मोठमोठ्या खर्चाच्या ज्या बाबी आहेत त्या खालीलप्रमाणें :— पगार, पोस्टेज, भाडें व कर, स्टेशनरी व इतर किरकोळ खर्च या बाबींवर सध्याच्या आठ बँकांचा खर्च खालीलप्रमाणें (३१-१२-५१ या वर्षी) होता.

| | | | |
|---|---|---|---|
| पगार | १२,०००,०० रु. | पोस्टेज | ८६,००० रु. |
| भाडें, कर | १,७०,००० रु. | स्टेशनरी | १,५८,००० रु. |
| किरकोळ खर्च | १,१८,००० रु. | | |

या बँकांपैकी सगळ्या बँकांना नोकरवर्गासाठी अवॉर्ड लागूं नसलें तरी कमीजास्त प्रमाणांत सारखाच पगार द्यावा लागतो. पोस्टेज, स्टेशनरी, भाडें इ. मधून जवळ जवळ दोन लाख रु. ची बचत करून नफा वाढवतां येईल. अर्थात् सध्या असणारा सगळीकडचा नोकरवर्ग कायमच राहूं शकेल. त्याबाबत कुणासहि भीति वाटण्याचें कारण नाहीं. याला आक्षेप म्हणून मग या बँकेची अनियंत्रित सत्ता झाल्यानें लोकांना सध्यासारख्या सवलती मिळूं शकणार नाहींत असा येतो. पण तो भ्रामक आहे. कारण, भारतभर व्याप्ति असणाऱ्या मोठ्या बँकांना येथें स्पर्धा निर्माण करतां येऊं नये म्हणून दरांत भरमसाट वाढ या नवीन बँकेला करतां येणार नाहीं. उलट, मोठमोठ्या धंद्यांच्या वाढीसाठीं आवश्यक असें कर्ज मिळूं शकून महाराष्ट्राची सर्वांगीण औद्योगिक उन्नति होण्यास हातभारच लागेल. बँकेला फसवणाऱ्या गिऱ्हाइकांना आळा बसेल. एक नवीन मानाची संस्था निर्माण होऊन कांहींतरी अधिकारी आवाज आपल्याला महाराष्ट्रांत मिळूं शकेल. उद्यां संयुक्त महाराष्ट्र झाला तर महाराष्ट्रीय नेतृत्वाखालची एक मोठी पेढी म्हणून तिला विचारणा करण्यांत येईल. त्यांत कुणाचाहि संबंधी हितभाग न राहिल्यानें बँक म्हणून तिची अमर्याद प्रगति होऊं शकेल. किंबहुना, एकीकरणाच्या बिंदूंपैकी एक नवीन बिंदु निर्माण होऊन इतरत्र एकीची भावना बळावूं शकेल.

**प्रयत्नास मदत करा**

हा प्रश्न फक्त याच आठ शेड्यूल्ड बँकांनीं विचार करण्यासारखा नसून बँक ऑफ कराड, बँक ऑफ सिटीझन्स, रत्नाकर बँक, युनियन बँक ऑफ कोल्हापूर, भारत इंडस्ट्रियल बँक, वांठीया बँक, भोर स्टेट बँक, बँक ऑफ कोंकण, पूना इनव्हेस्टर्स बँक, डेक्कन इंडस्ट्रियल बँक, बँक ऑफ औंध, अशा

इतरहि ज्या नॉन–शेड्यूल्ड बँका आपापल्या क्षेत्रांत योग्य तें कार्य करीत असून बँकिंगला मदत करत आहेत, त्यांनींहि विचारांत घेण्याजोगा आहे. तरी वरील बँकांचे चेअरमन, डायरेक्टर्स, त्यांचे ठेवीदार, यांना माझी आग्रहाची विनंती आहे कीं, त्यांनीं या बाबतींत जरूर लक्ष घालावें व अशा प्रयत्नांना सुरवात करावी. परिस्थितीनें ठेंचा दिल्यावरच जागे होण्यांत काय स्वारस्य आहे ? तसा कुणीं विचार केला तर सर्वांची एकत्रित बैठक घेतां येऊन पुढील विचारविनिमय होऊं शकेल. हें एकत्रीकरण कसें करावयाचें हा प्रश्न रिझर्व बँकेकडे सोंपवून तिची मदत आपणाला घेतां येईल व रिझर्व्ह बँक ती केव्हांहि आनंदानें देईल. तरी या सूचनेचा सर्वांनीं व इतर संबंधी लोकांनींहि विचार करावा अशी माझी आग्रहाची विनंती आहे. त्यांत बँकांच्या हिताबरोबर महाराष्ट्राचेंहि अधिक कल्याणच होईल हें निश्चित, नि तसें झाल्यास उरलेलीं इतर राज्यें आपल्या उदाहरणाकडे अभिमानानें बोट दाखवून तसे प्रयत्न करूं लागतील यांत शंका नाहीं. वरील आठ शेड्यूल्ड बँकांचे आंकडे फक्त उद्बोधक म्हणून घेतले आहेत. यांत कुणाचीं नांवें गळलीं गेलीं असल्यास ती नजरचूक समजावी; त्यांत दुसरा हेतु नाहीं. पण हा प्रयत्न करण्याबद्दल विनंती मात्र प्रत्येक महाराष्ट्रीय बँकेस आहे, हें लक्षांत घेऊन कुणींहि या प्रयत्नास मदत केली किंवा पुढाकार घेतला तर तो पाहिजेच आहे.


WILICO

शुभ चिंतन

चालू दिवाळी आमचे असंख्य विमेदार, प्रतिनिधी, डॉक्टर्स व हितचिंतक या सर्वांना आनंदाची, सुखाची व भरभराटीची जावो.

वेस्टर्न इंडिया विमा कं. लि.,
सातारा

शाखा कचेरी:—१७९, बुधवार पेठ, बेलबाग चौक, पुणें. फोन नं. ३४०२

फोन नं. ५३

अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. सांगली.

जिल्हा : दक्षिण सातारा.

स्थापना सन १९३५

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | १,७५,४८० |
| रिझर्व्ह फंड | रु. | ६७,६३७ |
| इतर फंड | रु. | ९१,१८३ |
| ठेवी | रु. | १६,७५,९७९ |
| खेळतें भांडवल | रु. | २०,७६,६२४ |

—: डायरेक्टर्स :—

श्री. वामन विष्णु वाटवे, B. A., LL. B.,
श्री. गणेश काशिनाथ दांडेकर, D. M. E., कारखानदार
श्री. रामचंद्र लक्ष्मण कुलकर्णी उदगांवकर जमीनदार.
श्री. गणेश कोंडो गोडबोले, B. A., LL. B., (चेअरमन)
श्री. केशव विनायक भिडे, लोखंडी मालाचे व्यापारी
श्री. गंगाधर गोविंद विनीवाले
श्री. महादेव हरी गोडबोले, B. A., LL. B., (M. L. C.)
श्री. वासुदेव हरी गोसावी, B. A., व्यापारी
श्री. लक्ष्मण दत्तात्रय भिडे

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

लक्ष्मण यशवंत लागू, B. A., LL. B.,
मॅनेजर.

जिल्ह्यांतील शेतकऱ्यांची आद्य संस्था

दि नॉर्थ सातारा डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑप. बँक लि.,

सातारा.

( स्थापना १९४९ )

| | | |
|---|---|---|
| वसूल शेअर भांडवल | रु. | २,२५,००० |
| रिझर्व्ह फंड | रु. | २७,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १४,५०,००० चे वर |

— शाखा —

कराड ( संकलित ) कोरेगांव

आकर्षक व्याजाचे दरानें ठेवी स्वीकारल्या जातात व सर्व प्रकारच्या बँकिंगचा व्यवहार केला जातो.

केवळ दुसऱ्याच वर्षी बँकेस 'अ' वर्ग मिळाला आहे.

आर. डी. पाटील,
चेअरमन.

# बँकांच्या संचालकांचीं कर्जें

## पळवाटा बंद झाल्याच पाहिजेत

( लेखक :— "हत-बल" )

*( बँकिंगच्या नवीन कायद्यामुळें बँकिंगच्या कांहीं क्षेत्रांत सुधारणा झाली असली, तरी "संचालकांचीं कर्जें" ह्या बाबतींत परिस्थिति बदललेली नाहीं, आणि पळवाटा काढून बँकांचे संचालक दडपणानें अधिकाराचा दुरुपयोग करतात, असें फार मोठ्या प्रमाणावर घडलेलें आढळतें. त्यावर अत्यंत जालीम उपाययोजना झालीच पाहिजे, असें "हत-बला"नें निश्चयपूर्वक प्रतिपादलें आहे. प्रस्तुत तज्ज्ञ लेखकास भारतांतील अनेक मोठ्या बँकांचा दीर्घकाळ प्रत्यक्ष अनुभव असून त्यांनीं कर्तव्यबुद्धीनें ह्याबाबत गंभीर इशारा येथें दिला आहे. )*

बँकांसाठी इतर कंपन्यांप्रमाणेंच कंपनी-कायदा न ठेवतां स्वतंत्र कायदा असावा, असे विचार जेव्हां प्रदर्शित करायला कांहीं वर्षांपूर्वी सुरवात झाली तेव्हां त्यापाठीमागें जीं अनेक उद्दिष्टें होतीं, त्यांतील एक म्हणजे अधिकारी लोकांच्या अधिकाराच्या दुरुपयोगाच्या अतिरेकाला आळा घालणें, हें होतें. नियामक मंडळाच्या लोकांना आपल्या सत्तेचा दुरुपयोग करायची संवय जडली होती, असें आढळून आलें. त्या दृष्टीनें मॅनेजिंग एजन्सीची पद्धत बँकांतून बंद करण्यांत आली. बँकेचा अधिकारी किंवा व्यवस्थापक एका वेळेस जास्तींत जास्त पांच वर्षें मुदतीनें बांधलेला असावा आणि त्याचा पगार निश्चित असावा, हें दुसरें बंधन निर्माण करण्यांत आलें. त्याला खेळत्या भांडवलावर किंवा नफ्यावर कमिशन देणें नियमबाह्य ठरवण्यांत आलें. तसेंच, बँकेच्या संचालकांपैकीं कोणासहि एकापेक्षा जास्त बँकांचे संचालक रहातां येऊं नये, असें नवीन कलमहि घालण्यांत आलें. अशा रीतीनें, १९४९ सालीं जो बँकिंग कंपनीज ॲक्ट पास झाला, त्याची यंत्रणा बघतां व त्याचें प्रत्यक्षांत उतरलेलें स्वरूप बघतां हा कायदा खूपच यशस्वी झाला असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं.

### निर्बंध हळूहळू सैल होत गेले

या सर्व गोष्टींत मुख्य उतारा संचालक मंडळांतल्या लोकांना देण्यांत येणाऱ्या कर्जाबाबत होता. हीं कर्जें संचालकांस त्यांच्या वैयक्तिक खात्यावर किंवा ते ज्या संस्थेंत डायरेक्टर, मॅनेजिंग एजंट्स अगर भागीदार आहेत अशा कंपन्यांस व कारखान्यांस व ज्या कंपन्या खाजगी असून त्यांच्या भांडवलापैकीं बरेंच भांडवल अशा संचालकांनीं शेअरहोल्डर म्हणून गुंतवलें आहे अशा कंपन्यांस देण्यांत येत असत. किंबहुना, बँकेचा संचालक होतांना त्या व्यक्तीपुढें कमी दरांत बँकेकडून मुबलक कर्ज मिळूं शकेल हाच फायदा डोळ्यांसमोर असे. त्यामुळें प्रथमतः या नवीन संचालकांना कुठल्याहि प्रकारचीं कर्जें देण्यांत येऊं नयेत असा निर्बंध घातला होता. पण मग अनेक बँकांच्या वतीनें असें सांगण्यांत आलें कीं, धंद्याच्या वाढीसाठीं एक धंदेवाईक म्हणून जरी मग अशा व्यक्तींना कर्ज लागलें तरी तें योग्य तारणावरहि न मिळाल्यास बँकांच्या संचालकत्वासाठीं कोणीच पुढें येणार नाहीं आणि त्या संस्थांचें अस्तित्वच धोक्यांत येईल. शिवाय, या लोकांच्या नैपुण्याचा जो फायदा किंवा सल्ला मिळूं शकतो तो बँकांना मिळणार नाहीं. त्यामुळें वरील निर्बंधांत मग सुधारणा करण्यांत आली व संचालकांना तारण घेऊन कर्जें देण्यास हरकत नाहीं, अशी दुरुस्ती झाली. परंतु त्यानंतर अशीं अनेक उदाहरणें पुढें आलीं कीं, ज्यांत कांहीं मोठमोठ्या पब्लिक लिमिटेड कंपन्या यांत असे बँकेचे संचालक असून त्यांच्या व्यापामुळें किंवा धंद्यांत गुंतलेल्या कायम रकमेमुळें त्या कंपन्या जंगम मालमत्ता बँकेला तारण म्हणून देऊं शकत नाहींत किंवा शक्य होत नाहीं पण कंपनीची एकूण आर्थिक परिस्थिति तर मजबूत आहे. त्यामुळें यावर तोड म्हणून अशी काढण्यांत आली कीं, अशा कंपन्यांना तारण न घेतां सांघिक व वैयक्तिक जामीनकीवर कर्जें देण्यास हरकत नाहीं. पण हीं कर्जें रिझर्व्ह बँकेला कळवलीं पाहिजेत व तिच्या दृष्टीनें जर तीं योग्य ठरलीं नाहींत तर तीं कुठल्याहि वेळेस बँकेस परत मागण्याचा आदेश रिझर्व्ह बँक देऊं शकेल. ह्या रीतीनें विना-तारण देखील अशीं कर्जें देण्याची दुसरी सवलत निर्माण झाली. यांतून मार्ग काढण्याकरतां संचालकांनीं अनेक मार्ग योजिले किंबहुना कायदा करणाऱ्यांची बैठक एकीकडे चालू असतां पळवाट काढणारांची बैठक त्याच वेळेला दुसरीकडे त्याचा विचार करण्यासाठीं चालू असते असें विनोदानें म्हटलें जातें त्याचा प्रत्यय इथेंहि पुरेपूर आला. हीं बंधनें चुकवण्यासाठीं भागीदारीच्या पेढ्यांतून प्रत्यक्ष नांव काढून घ्यायचें पण अप्रत्यक्ष, सुप्त भागीदार, राहून वर्चस्व गाजवायचें, हा एक मार्ग निर्माण झाला. खाजगी कंपन्यांतील आपल्या नांवावरचे भाग आपल्या जवळच्या नातेवाइकांच्या नांवावर वर्ग करून स्वतः नामानिराळा रहायचें, ही दुसरी युक्ति तात्काळ निर्माण झाली. अशीं कर्जें स्वतःच्या नांवावर न घेतां जवळच्या नातेवाइकांच्या नांवावर घ्यायचीं अशीं अनेक उदाहरणें हल्लीं उजेडांत येऊं लागलीं आहेत.

### व्यवस्थापकांवर दडपण

संचालक मंडळांच्या या खुब्यांपुढें अर्थातच व्यवस्थापक मंडळींना नमतें घेणें भाग पडतें. या सर्व गोष्टींपासून बँकांना संरक्षण देऊन या व्यवसायाची खरी प्रतिष्ठा वाढविण्याचा गंभीरपणें विचार करण्याची वेळ आज आली आहे. कंपनी कायद्यांत सुधारणा करण्यासाठी नुकतीच जी कमिटी नेमली गेली होती तिनें संचालकांच्या जवळच्या नातेवाइकांच्या नेमणुकांविषयीं खूप बंधनें घालण्याची शिफारस केली आहे. संचालकांपैकीं एकाद्यानें व्यवस्थापकांवर जर दाब आणून कर्ज मागावयाचें ठरवलें तरी तें त्यांस अवघड जात नाहीं. प्रत्यक्ष नुसत्या प्रो. नोटवर कर्ज मिळूं शकत नाहीं म्हणून कागदावर तरी तें सुरक्षित व तारणावर दिसावें म्हणून बँकेला हायपॉथिकेशनच्या तत्त्वावर कर्ज द्यावयास लावणें, असलेला माल जास्त आहे म्हणून स्टेटमेंट पाठवणें, किंमती वाढवून दाखविणें व विकला जाणारा माल किंवा प्रत्यक्षांत ज्याची किंमत कांहीं नाहीं असा अमूल्य (!) माल तारण म्हणून दाखवणें, वगैरे अनेक प्रकार यासाठी सर्रास उपयोगांत येतात. सामान्य व्यवहारांत जीं कर्जें बँकेच्या संचालक मंडळानें इतरांना मंजूर केलीं नसतीं अशाच प्रकारचीं कर्जें ते केवळ संचालक म्हणून घेऊं शकतात. ज्या कंपन्यांच्या शेअर्सना शेअरबाजारांत कांहींहि किंमत नाहीं असे शेअर्स (ते सुद्धां स्वतःच्या ऐवजीं तिसऱ्याच्याच नांवावर असलेले) ठेवून कर्ज घेतलें जातें. तारणावर कर्ज दाखवण्याचा दुसरा मार्ग म्हणजे शेताच्या जमिनींचे किंवा इतर स्थावर मिळकतींचे कागद तारण ठेवणें हा होय. बँका तारण म्हणून शहरांतील स्थावर मिळकत मान्य करूं शकतील. पण खेड्यांतील, शेतसाऱ्याची जमीन टाकून

देणें हें फक्त कायद्याच्या चौकटींतून सुटण्यापुरतेंच ठरतें. या जमिनींची किंमत ते दाखवतात तशी नसते. बाजारांत त्यांना लगेच गिऱ्हाईक मिळणें अशक्य असतें. तिची किंमत वाढवून दाखवलेली असते आणि शिवाय त्या जमिनींचा मालकीहक्क बदलण्यासाठी सोपा होण्याइतका सरळ नसतो. कुळकायदा आणि इतर अडचणींच्या गोष्टी संचालकानें दिलेलें तारण म्हणून बाजूला ठेवाव्या लागतात. यांतच इनामी जमिनींचाहि अंतर्भाव होतो. या तारणावर परत कृसहि (मार्जिन) नसते. तारणावर सुरक्षित कर्ज देतांना जी तारण या शब्दाची व्याख्या असते, तींत तें सहजीं विकी होणारें, आणि कर्जापेक्षा पुरेशा जास्त किंमतीचें असें लागतें. पण येथें असा मार्जिन ठेवण्याऐवजीं ९०% कर्ज या तारणावर दडपणानें घेतलें जातें. कोठल्याहि एका विशिष्ट संस्थेबद्दल किंवा व्यक्तीबद्दल हा उल्लेख नसून, हल्लीं ज्या अनेक गोष्टी भारतांत सर्वत्र उजेडांत येत आहेत त्यांत हें दिसून येत आहे.

### कडक उपाययोजना हवी

बँकिंगच्या नवीन कायद्यामुळें बँकांच्या इतर क्षेत्रांत सुधारणा झाली असली तरी 'संचालकांची कर्जे' या सदरावर कांहीं उतारा आणि सुधारणा मिळाली का? असा प्रश्न करतां, आपणांस याचें नकारार्थींच उत्तर द्यावें लागेल आणि त्याबाबत कांहींतरी उपाययोजना करण्याची वेळ आली आहे असें म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं. कॅन्सर किंवा असाच दुसरा दुर्धर रोग झाल्यावर ज्याप्रमाणें शस्त्रक्रियाच करावी लागते, त्याप्रमाणें बँक या संस्थेला असलेल्या या जुनाट, दुर्धर आणि वाढत्या अशा क्षयावर (ज्यामुळें बँकेचा कधीं तरी क्षय होण्याची भीति असते अशा) तसाच जालीम उपाय योजला, तरच कांहींतरी उपयोग होईल. त्यांतून एकहि भुयार किंवा पळवाट राहूं नये, म्हणून अशीं कर्जे सरसकट बंद करणें हा एकच मार्ग आहे. कांहींएक काळापर्यंत बँकेच्या संचालकाला कुठल्याहि प्रकारचें कर्ज, अगदी सोन्याच्या तारणावरसुद्धां, देऊं नये असा रिझर्व बँकेनें कायदा करून मग त्या कालनिक्षेपानंतर परत परिस्थितीचें अवलोकन करावें. यावर तोड म्हणून कदाचित् दोन–चार बँकांचे संचालक मिळून एक गट अथवा सिंडिकेट स्थापन करण्याचा संभव आहे. 'क्ष' बँकेनें 'य' बँकेच्या संचालकाला कर्ज द्यावें व त्याच्या मोबदल्यांत 'य' बँकेनें 'क्ष' बँकेच्या संचालकाला कर्ज द्यावें असा मार्ग संचालक हुडकतीलहि. आतां त्यावर देखील, स्वतःच्याच नव्हे तर कुठल्याहि बँकेच्या संचालकाला कुठल्याहि प्रकारचें कर्ज देण्यांत येऊं नये असा कायदा करण्यांत यावा व त्या सर्वांची यादी प्रत्येक बँकेजवळ ठेवावी किंवा त्याला अपवाद म्हणून तितकीच गरज असल्यास त्यांचें अर्ज रिझर्व्ह बँकेकडे पाठवून ते संमत करून घ्यावेत व हीं कर्जे रिझर्व्ह बँकेला योग्य वाटेल तेव्हां परत मागवण्याचा अधिकार ठेवावा, असा मार्ग काढतां येईल. यांतून दुसरा आक्षेप निघतो तो असा कीं मग बँकेचे संचालक व्हावयास कुणीच पुढें येणार नाहीं. पण तो भ्रामक आहे. ज्यांना पैशाची अपेक्षा नाहीं आणि जे खरोखरीच तज्ज्ञ आहेत असे गुणी लोक भारतांत पुष्कळच आहेत. संकटाच्या वेळीं साहाय्याचा हात पुढें करणें हें या लोकांचें जन्मतःच ब्रीद असल्यानें त्यांचें सहकार्य घेऊन बँका उलट आपलीं पावलें ज्यास्त निरोगीपणानें टाकूं शकतील.

तात्पर्य, संचालकांचीं कर्जे हा एक गंभीर विषय होत चालला आहे आणि त्यावर कांहींतरी जालीम उपाययोजना झालीच पाहिजे. आतां तो काय असावी आणि कशी असावी, हें ठरविणें मात्र रिझर्व्ह बँकेचें काम आहे.


# मध्यप्रदेश को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना-१९११

हेड ऑफिस–नागपूर शहर (टिळक पुतळ्याजवळ)

अध्यक्ष–सर माधवराव देशपांडे, के. बी. ई.

मध्यप्रदेशांतील सहकारी चळवळीच्या केन्द्रस्थानीं असलेली व कित्येक वर्षे लोकादरास व ठेवीदारांच्या विश्वासास पात्र झालेली

**एकमेव प्रादेशिक सहकारी बँक**

शाखा : सितावर्डी–नागपूर, अमरावती, खामगांव, मलकापूर, बुलढाणा, चांदा, बैतूल, इटारसी, हरदा, पिपारिया, नरसिंगपूर, जबलपूर, मंडला व राजनांदगांव.

★

| | | |
|---|---|---|
| अधिकृत हिस्से-भांडवल | रु. | २०,००,००० |
| जमा झालेलें हिस्से-भांडवल | रु. | १०,९७,००० |
| गंगाजळी | रु. | १४,५१,००० |
| एकूण ठेवींची रक्कम | रु. | २,१५,५५,००० |
| सरकारी रोखे | रु. | ७२,९१,००० |

खेळतें भांडवल रु. ३ कोटींचे वर.

आर्थिक दृष्ट्या पूर्ण सुरक्षित !
आकर्षक व्याजाचे दर !!
सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात !!!
— व —
इतर सर्व बँकिंगचे व्यवहार करण्यांत येतात !!!!

★

मागील सहा वर्षांपासून हिश्श्यांवर ५ टक्के "इन्कमटॅक्स माफ" मुनाफा वांटण्यांत येत आहे.

**आपल्या मूल्यवान् वस्तू व दागिने आमच्या "सेफ डिपॉझिट व्हॉल्ट" मध्यें ठेवून निर्धास्त व्हा.**

वैयक्तिक तिजोऱ्यांची (Lockers) व्यवस्था केली आहे.

सविस्तर माहिती समक्ष भेटींत अथवा पत्रद्वारें

★

आमच्या भागीदारांस व ठेवीदारांस ही दिवाळी सौख्याची व भरभराटीची जावो.

नि. स. देव,
मॅनेजर.

# काळ ओळखून वागण्याचा अर्थमंत्र्यांचा इशारा

( लेखकः—शंकर ज. जोशी, बी. कॉम्. )

*बदलत्या परिस्थितींत जुन्या निष्ठा-श्रद्धा जाऊन त्या जागीं नव्या निष्ठा-श्रद्धा निर्माण होत आहेत. क्रांतीची चाहूल वेळींच लक्षांत घेऊन आणि काळ ओळखून कारखानदारांनीं वागलें पाहिजे.*

कारखानदारीचे आजचे प्रश्न विविध असून ते अधिकाधिक गुंतागुंतीचे होत आहेत.

### मंदीची वाटचाल

१९५१ अखेर डोकावूं लागलेली धंद्यांतील मंदी या वर्षीं चांगलीच जाणवूं लागली आहे. अर्थशास्त्राचा असा एक सिद्धान्त आहे कीं किंमती चढूं लागल्या म्हणजे तयार मालाच्या किंमती प्रथम वाढतात; उलट मंदीच्या काळांत तयार मालाच्या किंमती प्रथम उतरतात आणि कालान्तरानें इतर खर्च कमी होतात.

या उतरत्या मागणीच्या नि किंमतींच्या दिवसांत कारखान्यांची स्थिति मोठी कठीण होते; कटकटी वाढतात. तेच हे आजचे दिवस !

### मंदी-काळांतील अडचण-परंपरा

नेमक्या याच वेळीं बँकासारख्या संस्था हात आखडत असल्याचा अनुभव येतो. सटोडियांना कर्ज देऊं नका असा आदेश असला तरी व्यवहारांत कारखानदार नि उत्पादक यांनाहि तोच अनुभव येतो !

कारखान्याच्या हातांतील पैसा अशा रीतीनें कमी पडूं लागला म्हणजे प्रथम नफा कमी करून आणि नंतर वेळेनुसार तोटा सोसूनहि माल विकण्यास सुरवात होते.

कमी मागणीनुसार कमी काम करण्याच्या योजना सुरू होतात. तोट्यांत कपात करण्याचे प्रयत्न असतात. कामगार कमी करण्याचा विचार सुरू होतो. तसें करण्यास कामगार, सरकार, जनता, या सर्वांचाच विरोध असतो. पण धंदा परवडत नाहीं. अशी स्थिति आली म्हणजे सर्वांचाच नाइलाज होतो. त्रावणकोरमध्यें काथ्याचा फार मोठा धंदा दीर्घकाळ टिकून आहे. १० लक्ष लोकांचें जीवन या धंद्यावर अवलंबून आहे. गेले कित्येक महिने हा धंदा साफ बसून गेला आहे. परदेशांतून नेहमींप्रमाणें मागणी येत नाहीं. लक्षावधि लोकांच्या हा पोटापाण्याचा प्रश्न; पण कोणी कांहीं विशेष करूं शकत नाहीं अशी स्थिति आहे.

### नवीन श्रद्धा

अशा परिस्थितींत जुन्या निष्ठा-श्रद्धा जाऊन त्या जागीं नवीन श्रद्धा निर्माण झाल्या, तर नवल नाहीं. समाजवाद नि साम्यवाद ही केवळ बौद्धिक कसरतीची-वादविवादाची बाब राहिली नसून ज्वलंत निष्ठा-निर्मिति करीत आहेत. समाजवाद-साम्यवाद हा नवीन धर्म आहे. धर्माला देशा-राष्ट्राचीं बंधनें नसतात. प्रश्न ह्या किंवा त्या वादाचा नसून, मनाला काय मानवतें याचा आहे.

नवीन पिढी डाव्याकडे वळत आहे. कूट प्रश्नांचीं उत्तरें तांबड्या वाङ्मयांत गवसत असल्याचा प्रत्यय तिला येत आहे. वर्गविग्रहाच्या कल्पना मूळ धरीत आहेत.

स्वदेशीचा पुरस्कार आणि परदेशी मालावर बहिष्कार, या चळवळी, या कल्पना, जशा मागें पडल्या आहेत त्याचप्रमाणें राष्ट्रीयत्वाचा विचार अपुरा, तोकडा तर आंतरराष्ट्रीय विचारसरणी अयावत् मानण्याची प्रवृत्ति वाढत आहे.

वैयक्तिक कष्ट, त्याग, लायकी, खाजगी मालमत्ता, व्यक्तिप्रयत्नांनीं उभारलेले कारखाने, यांचें सकारण नि अकारण अवमूलन झालें असून लोकशाही पद्धति आणि पक्षनिष्ठा वाढीला लागत आहेत.

### लोकशाही आणि कामगार

लोकशाहीच्या या काळांत इतरांप्रमाणें कामगार संघटनांचा राजकारणाशीं संबंध येणार हें स्वाभाविकच आहे.

इतरेजनांचा पाठिंबा मिळविण्याच्या दृष्टीनें त्यांना आपलें कार्य उघडपणानें व सर्वमान्य होईल अशी पद्धतीनें करावें लागेल; वर्गविद्वेषाच्या भूमिकेवरून कार्य करून चालणार नाहीं. कामगारपक्ष राजकारणांत पडल्यानें लोकशाहीची जोपासना नि वाढच होईल.

या प्रश्नांशीं कारखानदारीचा आजच विशेषसा संबंध नसला तरी लोकहितवादी सरकार, स्वतःच्या हक्काविषयीं जागृत असलेले कामगार आणि न संपणाऱ्या भगभगीला कंटाळलेली सर्वसामान्य जनता यांच्या विचारा-विकारांचे पडसाद कारखान्यांच्या व्यवहारांवर पडल्याखेरीज कसे राहतील ?

### भांडवलाचा बिकट प्रश्न

दिवसेंदिवस भांडवलाचा प्रश्न अधिकाधिक बिकट होत आहे. १९४५-४६ नंतर नवीन भांडवल जमवून कारखाने काढणें अशक्यप्राय झालें आहे. गेल्या ६-७ वर्षांत नवीन खाजगी किती कारखाने निघाले ? चालू कारखान्यांनीं नवीन किती उपक्रम केले ? टाटांच्या पोलादाच्या कारखान्यांत जुन्याचे जागीं नवीन यंत्रें बसवावयाचीं तर त्यांना सरकारकडून कर्ज घ्यावें लागत आहे. मग इतरांची काय स्थिति असणार ?

खुद्द सरकारला पैसा उभारणें कठीण जात आहे. निरनिराळ्या करांच्या रूपानेंच भांडवली खर्चाकरितां सरकारला पैसा गोळा करावा लागत आहे. नुकत्याच उभारलेल्या राज्य सरकारांच्या कर्जावर ४ टक्के व्याज देण्यांत आलें आहे.

अशा स्थितींत खाजगी धंद्यांनीं किती व्याज द्यावें ? त्यांना भांडवल कसें मिळावें ? त्यांनीं किती टक्के नफ्यावर धंदा करावा ? तेवढा वाढावा धंद्यांत मिळत आहे का ?

### औद्योगिक घरांचा प्रश्न

ह्यांतच आतां औद्योगिक वसाहतीसारख्या खर्चिक बाबींची जबाबदारी कारखान्यांवर टाकण्याची प्रवृत्ति वाढत आहे. कामगारांच्या सुखसोयींकडे लक्ष देण्यांत सर्वांचेंच हित आहे. तथापि कोणाला काय आणि किती शक्य आहे याचाहि विचार होणें जरूर आहे. दोन हजार कामगार असलेल्या सिंध्रीच्या खताच्या कारखान्यानें रु. ४ कोटींवर आणि वीस हजार कामगार असलेल्या चित्तरंजन रेल्वेइंजिनांच्या कारखान्यानें एकूण भांडवलापैकी अर्धे भांडवल म्हणजे रु. ७ कोटी औद्योगिक वसाहतींवर खर्च केलें आहेत. जेथें कारखाना चालविण्यासच भांडवल कमी पडत आहे, तेथें वसाहतींवर असे खर्च करणें कसें शक्य आहे ?

बरें, एवढें करून कोणाला किती सुख लागतें हें पाहिलें तर काय दिसतें ?

बहुसंख्य कामगार खेडेगांवांतून आलेले असतात, त्यांना बराकी पद्धतीच्या खोल्यांतून राहणें बरें वाटत नाहीं.

वसाहती कारखान्यांच्या मालकांच्या असल्याकारणामुळें चालकवर्गाला त्यांची साफसुफी–व्यवस्थेकरितां प्रतिवर्षी मोठा खर्च करावा लागतो. शिवाय, नागरी जीवनांतील अनेक प्रश्न सोडवावे लागतात. हल्लींच्या वातावरणानुसार "लहान–मोठे, तूं–मी" असेहि प्रकार प्रसंगीं होतात आणि प्रश्न येतो कीं, चालकांनीं कारखान्यांतील उत्पादनाकडे पाहावयाचें कीं हीं कधींहि न संपणारीं नगरपालिकेचीं आणि इतर कामें करीत बसावयाचें? एवढेंच नव्हे तर नागरी जीवनांतील संबंध नि अपेक्षा उत्पादनाच्या कार्यात कधीं कधीं अस्वस्थता नि अडथळे उत्पन्न करीत असल्याचा अनुभव अनेकांना आहे.

औद्योगिक घरांचा प्रश्न केवळ पैशाचा, दगडमातीचाच नसून मानवी मनोव्यापाराचाहि आहे आणि तो सहृदयतेनें व्यावहारिकतेच्या भूमिकेवरून सोडविण्याचा प्रयत्न होणें अगत्याचें आहे.

### क्रांतीची चाहूल

"उद्योगपतींनीं काळ ओळखून जरा आत्मनिरीक्षण करावें. लोकांच्या भावना व अपेक्षा लक्षांत घेऊन आपला दृष्टिकोन व व्यवहारपद्धति बदलल्या पाहिजेत. क्वालिटी कंट्रोल, प्रॉडक्शन्, एंजिनिअरिंग सारख्या आधुनिक तंत्राचा उपयोग केला पाहिजे; कार्यक्षमता वाढविली पाहिजे; नासधूस टाळली पाहिजे. नोकरांचा पगार किंवा शेअरहोल्डर्सचें डिव्हिडंड यांना धक्का न लावतां सर्वांत १०–१५ टक्क्यांनीं बचत करून गिऱ्हाइकांना स्वस्त माल विकला पाहिजे."

"कराच्या वाढत्या बोजामुळें औद्योगीकरणाकरितां पैसा नाहीं, असल्या श्रीमंतांच्या गाऱ्हाण्याकडे लक्ष देत बसलों तर क्रांति अटळ आहे."

वरील उद्गार अनुक्रमें श्री. चिंतामणराव देशमुख व श्री. ए. डी. गोरवाला यांचे आहेत. दोघेहि अर्थज्ञ आहेत; एवढेच नव्हे तर कालज्ञहि आहेत.

### महाराष्ट्रीय कारखानदारी

महाराष्ट्रीय कारखानदारी ही सर्वसाधारणपणें कामगार किंवा विश्वविद्यालयीन जीवनांतून निर्माण झालेली आहे. इतरांच्या कारखानदारीबाबतच्या कल्पना बहुसंख्य महाराष्ट्रीय कारखानदारांत नाहींत; त्यांना कामगार–कारखानदार म्हणणें अधिक सयुक्तिक होईल. त्यांचें जीवन कामगारांप्रमाणेंच कारखान्यावर पूर्णतः अवलंबून असतें. महाराष्ट्रीय कारखानदारीच्या भवितव्याबाबत शंका नाहीं. तथापि, बदलत्या कालमानानुसार अधिक संघटना, जागृति नि स्वतःचें वैशिष्ट्य कायम राखण्याचे प्रयत्न होणें आवश्यक आहे, हें उघड आहे.

---

**शेतमजुरांना किमान वेतन**—कूर्ग संस्थानच्या सरकारनें शेत-मजुरांना किमान वेतन देण्याची योजना आखली आहे. नवीन वेतनश्रेणीप्रमाणें रोजगार देण्यास चालू महिन्यापासून आरंभ झाला. ह्या योजनेचा फायदा २० हजार शेतमजुरांना मिळणार आहे.

**डी. डी. टी.चा नवा उपयोग**—म्हैसूर संस्थानचे सार्वजनिक आरोग्य अधिकारी डॉ. चंद्रशेखरन् ह्यांच्या मतानें डी. डी. टी.चा उपयोग प्लेगचें नियंत्रण करण्याच्या कामीं चांगला होतो. राज्यांतील १६० खेडेगांवीं डी. डी. टी. चे फवारे उडविण्यांत आले असतांना तेथील प्लेग नाहींसा झाला असा अनुभव त्यांनीं सांगितला.


## धी चाळिसगांव पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

**चाळिसगांव, पू. खा.**

(स्थापना १९४३)

| | | |
|---|---|---|
| (१) वसूल झालेलें भांडवल | रु. | ८५,००० |
| (२) रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ६०,००० |
| (३) खेळतें भांडवल | रु. | ५,००,००० चे वर |

**कार्यवाहक मंडळ**

(१) श्री. दाजी काशिनाथ भंडारी, (प्रेसिडेंट)
(२) श्री. पांडुरंग वामन अंतापूरकर, (व्हा. प्रेसिडेंट)
(३) श्री. के. एस्. खाबीया
(४) श्री. नथ्थू काळू वाणी
(५) श्री. विठ्ठलदास वल्लभदास
(६) श्री. शांतीलाल पन्नालाल जैन
(७) श्री. अनंत विश्वनाथ थत्ते

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सोनें, शेतीचा माल व इतर मालावर, इमारतीचे तारणावर व पतीवर कर्ज दिलें जातें. चालू, सेव्हिंग्ज व मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात. मुदतीच्या ठेवीदारासहि बोनस मिळूं शकतो.

विशेष माहिती चौकशीअंतीं.

आनंदराव डी. पाटील
मॅनेजर.

---

आमच्या भागीदारांस, ठेवीदारांस आणि खातेदारांस दिवाळी व नवीन वर्ष भरभराटीचें जावो.

शिड्यूल्ड बँक

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें

| | |
|---|---|
| हेड ऑफिस | मुंबई शाखा |
| **प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें २** | ८२ मेडोज स्ट्रीट कॉमनवेल्थ बिल्डिंग मुंबई १. |
| टे. फोन नं. २७६३ | टे. फोन नं. ३०४०८ |
| अध्यक्ष | उपाध्यक्ष |
| **श्री. ग. रा. साठे** | **श्री. दा. ग. बापट** |

**: भांडवल :**

| | |
|---|---|
| अधिकृत विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ७,१४,७१० |
| खेळतें भांडवल | रु. ७९,००,००० |

| | |
|---|---|
| श्री. गो. धों. जोगळेकर | श्री. चिं. त्रिं. चितळे |
| बी. ए. (ऑ.), बी. कॉम्., एलएल.बी. | मॅनेजिंग डायरेक्टर |
| मॅनेजर | टे. फोन नं. २६०७ |

# लाच, कमिशन, सूट हीं सर्व अन्याय्य आहेत

( लेखकः—के. बी. साठे, बी. ए., चालक, साठे स्पोर्टस्, पुणें ४. )

*प्रत्येक सचोटीच्या व्यापाऱ्यानें, आपल्या कुवतीप्रमाणें, दुकानांत येणाऱ्या ग्राहकांना सरळ व न्याय्य व्यवहार शिकविला पाहिजे.*

गेल्या लढाईचे काळांत "काळा बाजार" ह्या शब्दप्रयोगास सुरवात झाली व आजतागायत हा शब्द विशेषतः खोटा व फसवा व्यवहार करणाऱ्या व्यापाऱ्यांना उद्देशून वापरला जात आहे. आमचे मतें 'काळा बाजार' करणारा व्यापारी जितका नीच म्हणून लेखला जातो तितकाच त्याला मोहांत पाडणारा त्याचा ग्राहकही नीच म्हणून समजला जावा— कारण समाजांत तो आज साव म्हणून मानला जातो.

एखाद्या बँकेंतून पांच हजार रुपये घेऊन यःपलायन करणाऱ्या कारकुनाला समाज चोर म्हणून संबोधतो. त्याचप्रमाणें आपल्या बापाच्या खिशांतून एक आणा चोरणाऱ्या लहान मुलालाही समाज चोर म्हणतो. चोरींची तरफदारी कोणताही शहाणा माणूस करणार नाहीं आणि समाजानें ती गर्हणीय मानली हें ठीकच आहे. समाजाला चोरीला गेलेल्या मोठ्या अगर लहान रकमेशीं कांहीं कर्तव्य नाहीं. बँकेचा व बापाचा त्या रकमेशीं संबंध येतो. समाज या चोरण्याच्या क्रियेला— चोरीला— वाईट म्हणतो. चोराप्रमाणें लांच घेणारासुद्धां वाईटच. येथेंही लांच घेतलेल्या रकमेचें समाजाला महत्त्व नाहीं तर घेण्याच्या क्रियेला म्हणजेच लांचेला समाज वाईट म्हणतो.

"मला एखादी फलाणी ऑर्डर सरळ व न्याय्य मार्गानें मिळण्याचें लक्षण दिसलें नाहीं तर मी त्या ऑर्डरीसाठी १० टक्के सुटेची ( कमिशनची ) लांच देतों व मग ती ऑर्डर मिळते कां तें पहातो" अशा धर्तीचे व्यवहार नेहेमीं अन्यायानें व अनीतीचे मार्गानें व्यापारी करीत असतात.

पुष्कळ वेळां बोलतांना आपल्या वाक्यांमधून असंबद्ध नांवें आपण बोलण्याचें ओघांत वापरीत असतों. पण या शब्दांचे अर्थ मात्र आपण त्यादृष्टीनें लक्षांत घेत नाहीं. उदाहरणार्थ, कितीतरी-वेळां लांच या शब्दप्रयोगाबद्दल "कमिशन," "सूट" हे शब्द वापरतों. एखादें बिल त्वरित चुकतें केल्याबद्दल व्यापारी लोक शेंकडा रकमेवर अडीच टक्के सूट अगर कमिशन देतात व अशी सूट देणें सर्वमान्य आहे. परंतु ऑर्डर घेण्याकरतां दिलेलें कमिशन अगर सूट ही फुकाची सूट म्हणजे सरळ लांच नव्हे कां? असें असतांना या फुकाच्या सुटीला 'कमिशन' म्हणून मोठा भारदस्त शब्द वापरला जातो.

दुकानांतल्या प्रत्येक वस्तूची किंमत लेबल लावून अगर अन्य रीतीनें ग्राहकाला स्पष्ट दिसेल अशी बहुतेक नामवंत दुकानांतून लिहिलेली असते. तरी सुद्धां कितीतरी ग्राहक घासाघीस घालून स्वतःचा व दुकानच्या विक्रेत्याचा वेळ घेत असतात. त्यांची फुकाफुकीची सूट मिळवण्याची धडपड चाललेली असते. इंग्लंड व आस्ट्रेलिया सारख्या सुधारलेल्या देशांत या युद्धोत्तर काळांत विक्रीकर ३३ टक्के असून सुद्धां राष्ट्राच्या अडचणींची जाणीव असलेले लोक खरेदीचे वेळीं निमुटपणें हा कर देतात. उलट, आमचेकडे ३१/२ टक्के विक्रीकर देण्यास शेंकडा नव्वद गिऱ्हाइकें नाखूष असतात. 'अहो, आम्हांला पावती नको' म्हणून पार मोकळे. म्हणजे आम्हीही कर देत नाहीं व तुम्हीही तो देऊं नका. ही वृत्तीही लांच याच सदराखालीं येते, पण तिला समाजांत "व्यवहार" म्हणून म्हणतात. स्वतंत्र्याच्या पहिल्या पिढीच्या नीतिमत्तेची जबाबदारी ज्या कॉलेज युवकांवर पडणार आहे, ते स्वतःसाठी अगर कॉलेज जिमखान्यासाठी वस्तु खरेदी करतांना या फुकाच्या सुटीसाठी काय काय क्लृप्त्या करतात तें संबंधित व्यापारांना पूर्ण माहीत असतें, व ही फुकाची सूटही 'कमिशन' म्हणून ओळखली जाते. सरकारी ऑफिसेसमधून व खासगी संस्थांमधून व्यापाऱ्यांच्या विकण्याच्या मालाच्या किंमतीची यादी मागवली जाते. सुप्रसिद्ध मालाच्या किंमती त्या मालाच्या जाहिरातींतून व स्थानिक वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या असून पुष्कळ वेळां नियंत्रित असतात. तरी सुद्धां हे सरकारी ऑफिसर व खाजगी संस्थांचे चालक चार-आठ आण्यांनीं ज्या व्यापाऱ्याचे भाव नियंत्रित दराचे खालीं असतील त्यालाच ऑर्डर देतात. म्हणजे ते पर्यायानें अशा व्यापाऱ्याकडे चार आठ आण्याची भिक्षा मागतात. पण असे सौदे 'व्यवहार' म्हणून समजले जातात. हे सरकारी अधिकारी अगर संस्थांचे चालक जेथें नोकरी करतात तेथें जर एखादा लायक उमेदवार त्यांचा प्रतिस्पर्धी म्हणून गेला व त्यांना मिळत असलेल्या पगारापेक्षां चार-दोन रुपयांनीं कमी पगारावर नोकरी करण्याची त्यानें तयारी दाखविली तर मात्र त्याची ही कृति हलकट अगर नीच म्हणून ओळखली जाते.

एके दिवशीं मी सकाळीं दुकान उघडल्याबरोबर एक अनोळखी बनिया वृत्तीचे गृहस्थ टेनिसचे एक डझन चेंडू विकत घेण्यासाठी आले. कारखानदारानें त्या चेंडूंच्या विक्रीची नियंत्रित किंमत पस्तीस रुपये डझन जाहीर केलेली होती व मी ती त्यांना त्याप्रमाणें सांगितली. थोडा वेळ त्या गृहस्थांनीं विचार केल्यासारखें दाखवून, "मी हे तेहेतीस रुपयांस घेतों" म्हणून म्हटलें. "साहेब, कारखानदारानें या एक डझन चेंडूंची किंमत पस्तीस रुपये ठेवली आहे. मी त्याचा अधिकृत विक्रेता आहें. मला आपले तेहेतीस रुपये कसे स्वीकारतां येतील?" म्हणून मी त्यांना नम्रपणें म्हणालों. "तें समजलें हो! हे मी इथें तेहेतीस रुपये ठेवले आहेत. मला जायची घाई आहे. चटकन् ते चेंडू बांधून द्या." असें ते गृहस्थ हंसत हंसत म्हणाले. त्यावर मी आपला नकार निश्चयपूर्वक पुनः नम्रपणें दर्शविला. लागलीच त्या गृहस्थानें 'ऊंः' करून खांदे उडवले व ते परत जाण्यास निघाले. नेटानें मी त्या गृहस्थाच्या जवळ गेलों व म्हणालों, 'साहेब, क्षणभर थांबा. मी आपला फार वेळ घेत नाहीं. समजा, मी तुम्हाला रस्त्यांत भेटलों व तुम्हांला हातानें अडवून दोन रुपयांची याचना केली तर आपणांस राग येणार नाहीं का?" "होय, मग?" ते गृहस्थ त्यावर उद्गारले. "अगदीं तसेंच तुम्हीं मला दुकानांत गांठून दोन रुपयांची याचना करीत आहांत" म्हणून मी उत्तर दिलें. इतकें बोलल्यावर मात्र ते गृहस्थ परतले व समाधानपूर्वक एक डझन चेंडूंची खरेदी केली गेली. "मिस्टर साठे, हे आपलें तत्त्वज्ञान अगदीं साधें आहे पण मी त्याचा त्या दृष्टीनें विचारच केला नव्हता," जाता जाता, ते गृहस्थ म्हणाले.

राष्ट्रपोषक व समाजपोषक शिस्तींचीं बंधनें पाळण्याची जबाबदारी स्वतंत्र राष्ट्रांतील प्रत्येक नागरिकावर पूर्णांशानें येते. "मला काय त्याचें" ही सहानुभूतिशून्य वृत्ति टाळली पाहिजे.

गृहस्था, तुझा जरी त्याचें कांहीं नसलें, तरी तूं ज्या स्वतंत्र राष्ट्राचा घटक आहेस त्याला तुझ्या या दुबळेपणामुळें कमकुवतपणा येतो. परिणामीं अशी वृत्ति तुझी व राष्ट्राला मारक होते, म्हणून तुझा त्याचें महत्त्व वाटलेंच पाहिजे, इतकेंच नव्हे तर तुझें आचरण तदनुसार देशाला व समाजाला पोषक होईल असेंच असलें पाहिजे.

त्याच रीतीनें मला वाटतें-कदाचित् मी चुकतही असेन-फुकाफुकीची सूट मागणाऱ्या ग्राहकांविरुद्ध सर्व नेकीच्या व्यापाऱ्यांनीं एकजुटीनें परिणामकारक मोहिम सुरू केली तर ही सूट मागणारे ग्राहक कमी होतील व त्यांनीं चालवलेली ही नीतिमत्तेची लूट थांबवण्याचें श्रेयही त्या व्यापाऱ्यांना मिळेल. लहान मुलांचे मनावर प्रथम आईबाप व मग इतर गुरुजन नीतिपाठ बिंबवीत असतात. अगदीं त्याचप्रमाणें, प्रत्येक सचोटीच्या व्यापाऱ्यानें, आपल्या कुवतीप्रमाणें, दुकानांत येणाऱ्या ग्राहकांना सरळ व न्याय्य व्यवहार शिकवला पाहिजे. त्यानें स्वतः केलेले वायदे नेकीनें न चुकतां पाळले पाहिजेत व सरळ, न्याय्य आणि सदाचाराच्या व्यवहारापासून दूर जाण्याचा मोह टाळला पाहिजे.

---

**उत्तर ध्रुवाजवळील प्रकाश**—उत्तर ध्रुवावर 'अॅरोरा बोरिॲलिस' ह्या नांवानें प्रसिद्ध असणारा प्रकाश दिसत असतो. हा प्रकाश विजेचा आहे, असें शास्त्रज्ञांचें मत आहे. पण, उत्तर ध्रुवाच्या आसपास रहाणाऱ्या लॅप लोकांची मात्र अशी समजूत नाहीं. उत्तर ध्रुवाजवळ रात्र मोठी असते. त्यामुळें ती मनोरंजक रीतीनें जावी म्हणून आपले पूर्वजच प्रकाशाच्या रूपानें नृत्य करीत असतात, अशी त्यांची समजूत आहे.

**ब्रिटनचा डॉलर्सचा सांठा**—ब्रिटनजवळील डॉलर्सचा सांठा अजूनहि समाधानकारक नाहीं, असें ब्रिटनच्या अर्थखात्याचे मंत्री सर आर्थर साल्टर ह्यांचें मत आहे. जून, १९५१ पासून मार्च १९५२ पर्यंत ब्रिटनचा डॉलर्सचा सांठा दर महिना सरासरी २० ते ३० कोटींनीं कमी होत होता. आतां त्यांत अधिक घट होण्याचें बंद झालें आहे.

**दुर्मिळ पोस्टाचीं तिकिटें**—न्यूयॉर्कमध्यें बारा दुर्मिळ अमेरिकन पोस्टाच्या तिकिटांचा लिलांव करण्यांत आला असतां तीं ३,७५० डॉलर्सना विकलीं गेलीं. हीं तिकिटें न्यूयॉर्कच्या पोस्ट-मास्तरनें तात्पुरती म्हणून १८४५ व १८४७ च्या दरम्यान काढलीं होतीं. त्यानंतर अमेरिकन सरकार तिकिटें छापूं लागलें.

**हैद्राबादमधील उद्योगधंदे**—हैद्राबाद कायदेमंडळाचे व पार्लमेंटचे कांहीं सभासद ह्यांनीं पं. नेहरू यांना संस्थानांतील उद्योगधंद्याविषयीं एक खलिता सादर केला आहे. शिरपूर येथील कागदाचा कारखाना व रेशमाचा कारखाना भांडवलदारांना न विकतां ते सरकारनेंच चालवावेत असें खलित्यांत म्हटलें आहे.

**मुंबईजवळील तेलाचा कारखाना**—मुंबईजवळ उभारण्यांत यावयाच्या स्टँडर्ड व्हॅक्यूम कंपनीच्या कारखान्याची कांहीं यंत्रसामुग्री नुकतीच मुंबई बंदरांत आली आहे. ह्या सामुग्रींत बांधकामासाठी लागणारे मजबूत पोलादाचे खांब आहेत. कंपनी आपणास लागणारें पोलाद परदेशाहून आणणार आहे.

**बिहारमधील रेशमाचा धंदा**—बिहार राज्यांतील डबघाईला आलेले कांहीं धंदे पुनरुज्जीवित करण्याचें राज्य सरकारनें ठरविलें आहे. खेडेगांवांतील बेकारीचें निर्मूलन करण्याचा हेतु ह्या योजनेमागें आहे. राज्यांत रेशीम व हातमाग हे दोन मुख्य ग्रामोद्योग आहेत.


रजिस्टर नंबर ७२९८ स्थापना १९३५

## सातारा जिल्हा को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लि.

## शेतकरी बांधवांच्या कर्जाची खास सोय !

शेतकरी लोकांना कर्जातून मोकळे होणेची, जमीन सुधारणेची, विहीर दुरुस्त करणेची, अगर नवीन विहीर काढणेची, इंजिनादि यंत्रसामुग्री खरेदी करणेची अगर जमीन खरेदी करणेची आलेली अमूल्य संधि !

हेड ऑफिस, कराड — ब्रँच ऑफिस, सांगली

| | | |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. | १,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | ६७,००० |
| खेळतें भांडवल | रु. | ९,४८,७०० |
| वांटलेलें कर्ज | रु. | १२,७५,००० |

म. सि. पुटाणी, मॅनेजर.
आण्णापा नारायण कल्याणी, चेअरमन.

महाराष्ट्रांतील सर्व सहकारी अर्बन बँकांत अग्रस्थानीं असलेली

## दि नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

अहमदनगर
स्थापना सन १९१०
हेड ऑफिस-अहमदनगर शहर
शाखा:-१ संगमनेर (जि. नगर) २ बेलापूर रोड-श्रीरामपूर, (जिल्हा नगर) ३ वांबोरी (जि. नगर.)

| | | |
|---|---|---|
| (१) अधिकृत व काढलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| (२) वसूल भांडवल | रु. | ३,६६,९०० |
| (३) रिझर्व्ह फंड | रु. | २,४३,४४३ |
| (४) इतर फंड | रु. | २,९१,५५८ |
| (५) चालू ठेवी | रु. | ११,६८,३११ |
| (६) सेव्हिंग्ज ठेवी | रु. | ८,५३,५१४ |
| (७) मुदत ठेवी | रु. | १६,१४,८६८ |
| (८) खेळतें भांडवल | रु. | ६७,१८,०११ |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग्ज व चालू ठेवी स्वीकारल्या जात असून सर्व प्रकारचे तारणांवर कर्जे दिलीं जातात. तसेंच चेक, हुंड्या, सरकारी रोख्यांची खरेदी-विक्री, वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

दागदागिने, मौल्यवान् वस्तू व कागदपत्रें सुरक्षित ठेवणेसाठी सेफ डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था या बँकेंत आहे. तरी गरजूंनीं फायदा घ्यावा.

जास्त माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांकडे लिहा.

तारीख २७ सप्टेंबर १९५२. मो. कुं. फिरोदिया, चेअरमन.

# मुंबई राज्यांतील दुष्काळी प्रदेश

( लेखकः—वा. कृ. कोगेकर, एल्. एजी. )

*मुंबई राज्यांतील महाराष्ट्र, कर्नाटक, गुजराथ व कोंकण ह्या विभागांपैकी महाराष्ट्राच्या वांट्यास सर्वांत जास्त म्हणजे एकूण दुष्काळांच्या जवळजवळ निम्मे दुष्काळ येतात, असा गेल्या पंचवीस वर्षांचा अनुभव आहे. म्हणून, मुंबई राज्य धान्याच्या दृष्टीनें स्वयंपूर्ण करण्यासाठी, कमी पावसाच्या प्रदेशांतच म्हणजे, महाराष्ट्रांतच, पाणीपुरवठ्याच्या योजना त्वरित हातीं घेण्यांत आल्या पाहिजेत.*

कोणत्याहि प्रदेशांतील शेतीची सुबत्ता त्या प्रदेशांत पडणाऱ्या पावसाच्या मानावर बहुंशीं अवलंबून असते. पिकें चांगलीं येण्याकरितां लागणारी इतर परिस्थिति म्हणजे योग्य प्रकारची जमीन, खताचा पुरवठा, निवडक बीं, हीं होत. परंतु हीं तिन्हीं योग्य प्रकारचीं असूनसुद्धां, पावसाचें एकंदर प्रमाण, व तो पिकांच्या हंगामांत वक्तशीर पडण्याचें प्रमाण बरोबर नसेल तर तो प्रदेश पावसाच्या आपत्तीमुळें दुष्काळी प्रदेशांत मोडला जातो.

### पावसाचें प्रमाण

सर्वसाधारणपणें भारताचे पावसाच्या प्रमाणावरून खालीलप्रमाणें भाग पडतात. ( १ ) १० इंचाखालीं पाऊस पडणारे प्रदेश, म्हणजे पंजाब व राजपुताना वगैरे. ( २ ) १० ते ३० इंच पाऊस पडणारे प्रदेश—यामध्यें महाराष्ट्राचा कमी पावसाचा प्रदेश, कर्नाटकचा कमी पावसाचा प्रदेश, हैद्राबादचा कांहीं भाग हे मुख्यत्वेंकरून येतात. ( ३ ) ३० ते ५० इंच पाऊस पडणाऱ्या भागांत मध्यप्रदेश, मध्यभारत, उत्तर प्रदेश, मुंबई राज्यांतील खानदेश व गुजरात हें मुख्यत्वेंकरून येतात. ( ४ ) ५० ते १०० इंच पाऊस पडणाऱ्या प्रदेशांत हिमालयालगतचा प्रदेश, दार्जिलिंग, सिमला, आसामचा बराचसा भाग, बंगाल, त्रावणकोर वगैरे प्रामुख्यानें येतात. ( ५ ) १०० इंचापेक्षा जास्त पाऊस पडणाऱ्या भागांत पश्चिम घाटालगतची कोंकणपट्टी, आसामचा कांहीं भाग, कारवार वगैरे येतात.

वरील प्रदेशांपैकी १० इंचांपर्यंत पाऊस पडणाऱ्या प्रदेशांत बाहेरील पाण्याशिवाय शेती होणेंच शक्य नसल्यामुळें तो सोडला असतां १० ते ३० इंच पाऊस पडणारा प्रदेश प्रामुख्यानें दुष्काळी प्रदेशांत येतो. येथें पावसावर शेती होऊं शकते. परंतु अपुऱ्या, अनिश्चित पावसामुळें वारंवार दुष्काळ पडतात. ३० इंचापेक्षां जास्त पाऊस पडणारे प्रदेश म्हणजे वर निदर्शित केलेले नं. ३, ४, ५ या सदराखाली येणारे होत. हे निसर्गतः पावसाच्या अनिश्चित व अपुऱ्या प्रमाणापासून संरक्षित आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यामुळें येथें पावसाच्या आपत्तीमुळें दुष्काळ सहसा पडत नाहींत.

### मुंबई राज्यांतील दुष्काळी भाग

वरील दृष्टीनें मुंबई राज्यासंबंधानें पहातां, या राज्याच्या दुष्काळी भागामध्यें, सर्व साधारणपणें, महाराष्ट्रांतील दुष्काळी भाग व कर्नाटकांतील कांहीं जिल्हे येतात. अर्थात् या भागामध्यें पावसाच्या कमतरतेमुळें नेहमीं दुष्काळाची भीति असते. इतर भाग म्हणजे कोंकण, खानदेश, गुजराथ हे पावसाच्या दृष्टीनें बरेच संरक्षित आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं.

मुंबई राज्यामध्यें सन १९२३–२४ ते १९४७–४८ या सुमारें २५ वर्षांच्या मुदतीमध्यें कोठें कोठें दुष्काळ पडले, यासंबंधी माहिती खालील तक्त्यांत दिली आहे. यावरून मुंबई राज्याच्या गेल्या पंचवीस वर्षांतील दुष्काळी परिस्थितीसंबंधानें स्पष्ट कल्पना

| वर्ष | महाराष्ट्र | | | | | | कर्नाटक | | | गुजराथ | | | कोंकण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सोलापूर जिल्हा | अहमदनगर जिल्हा | पुणें जिल्हा | सातारा जिल्हा | नाशिक जिल्हा | पू. खानदेश जिल्हा | विजापूर जिल्हा | बेळगांव जिल्हा | धारवाड जिल्हा | अहमदाबाद जिल्हा | खेडा जिल्हा | पंचमहाल जिल्हा | ठाणें जिल्हा | कुलाबा जिल्हा |
| १९२३–२४ | ... | ... | ... | ... | ... | ... | दु. | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १९२६–२७ | ... | ... | ... | ... | ... | ... | दु. | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १९३०–३१ | ... | ... | ... | ... | ... | ... | दु. | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १९३४–३५ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | दु. | दु. | ... | ... | ... | ... | ... |
| १९३५–३६ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | दु. | ... | ... |
| १९३६–३७ | दु. | दु. | दु. | ... | ... | ... | दु. | ... | ... | ... | ... | दु. | ... | ... |
| १९३७–३८ | दु. | दु. | दु. | ... | ... | ... | दु. | ... | ... | ... | ... | दु. | ... | ... |
| १९३८–३९ | दु. | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १९३९–४० | दु | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | दु. | ... | दु. | ... | दु. |
| १९४०–४१ | दु. | ... | दु | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १९४१–४२ | दु. | दु. | ... | ... | दु. | ... | ... | ... | ... | ... | ... | दु | दु | ... |
| १९४२–४३ | दु. | ... | दु. | दु. | ... | ... | दु | दु | दु. | ... | ... | दु. | ... | ... |
| १९४३–४४ | दु. | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १९४५–४६ | दु | ... | दु. | दु. | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १९४६–४७ | दु. | दु. | ... | ... | ... | दु. | दु. | दु. | दु. | ... | ... | दु. | ... | ... |
| १९४७–४८ | ... | ... | ... | ... | ... | ... | दु. | ... | ... | ... | दु. | ... | ... | ... |
| एकूण वर्षें | १० | ४ | ५ | २ | १ | १ | ८ | ३ | ३ | १ | १ | ७ | १ | १ |

★ दिवाळीचा आनंद ★

लुटण्यासाठी मानसिक स्वास्थ्य आवश्यक आहे.
आपल्या मोटारींच्या विम्याबाबत हें स्वास्थ्य

## दि मोटार ओनर्स म्यूच्युअल इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड

या संयुक्त कायद्याच्या नवाबार एक तप चाललेल्या आपल्या स्वतःच्या संस्थेंत विमा उतरल्यानेंच मिळेल.

- ★ अत्यंत सवलतीचे दर
- ★ तिमाही, सहामाही, हप्त्यांची सोय
- ★ ॲक्ट, थर्डपार्टी, कॉम्प्रिहेन्सीव्ह, वगैरे सर्व तऱ्हेच्या विम्यांची तरतूद
- ★ आस्थापूर्वक सल्ला व सेवा
- ★ तत्पर नुकसानभरपाई

शिवाय

प्रत्येक विमेदार आपोआप कंपनीचा सभासद होतो.

मुख्य कचेरी:—फोर्ट रोड, बेळगांव.

शाखा:—मुंबई, पुणें, कोल्हापूर, नाशिक

ऑर्ग. कचेऱ्या:-कलकत्ता, बडोदा, कुर्नूल, वगैरे ठिकाणीं.

ही दिवाळी आमचे विमेदारांना, प्रतिनिधींना व हितचिंतकांना आनंदाची जावो.

( शारदा मुद्र, बेळगांव )

## दि बेळगांव बँक. लि.

फोन नं. ११८ ( शेड्यूल्ड बँक )

—स्थापना १९३०—

हेड ऑफिसः—बळ्ळोळ्ळी बिल्डिंग, रविवार पेठ, बेळगांव

महाराष्ट्र, कर्नाटक व कोंकण मिळून २२ शाखा

ता. ५।९।५२ अखेर

| | |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | ... रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | ... रु. ३,००,००० |
| एकूण रिझर्व्हज् | ... रु. १ ७१,००० |
| एकूण ठेवी | ... रु. ७१,३०,००० चे वर |
| खेळतें भांडवल | ... रु. ८१,००,००० चे वर |

बँकेची स्वतःची चार मजली बिल्डिंग सेफ डिपॉझिट व्हॉल्ट-सह पूर्ण होण्याचे मार्गावर आहे.

बँकेचा सेफ डिपॉझिट व्हॉल्ट अद्ययावत पद्धतीनें बांधण्यांत आला असून ता. १ जानेवारी १९५३ पासून सुरू होईल.

बँकेनें गेल्या मंदीच्या काळांत आपल्या मजबूत धोरणानें आपलें स्थैर्य व दर्जा टिकवून व वाढवून ठेवीदारांच्या, शेअर-होल्डर्सच्या व व्यापारी बंधूंच्या विश्वासांत भरच टाकलेली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

आकर्षक स्वरूपाच्या निरनिराळ्या प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

श्री. म. गो. हेरेकर, बँकर, चेअरमन

श्री. अ. रा. नाईक
B. A., B. Sc., LL. B.
मॅनेजिंग डायरेक्टर

श्री. ह. सी. कुलकर्णी
बेनाडीकर, B. A.
मॅनेजर



डोकेदुखी व मेंदूच्या सर्व विकारांवर खात्रीचा इलाज

## रामतीर्थ ब्राम्ही तेल

[ स्पेशल नं. १ ]
( मेडिकेटेड )

पांढरे केस काळे होतात, स्मरणशक्ति वाढते, टक्कलावर केस उगवतात, शांत झोंप येते, केस वाढतात, दृष्टीही सुधारते.

मोठी बाटली रु. ३-८-०

लहान बाटली रु. १-८-०

टपालानें मागविणारांनीं अनुक्रमें ५ रु. ५ आ. व ३ रु. ७ आ. ची मनिऑर्डर करावी. व्ही. पी. केली जाणार नाहीं.

### श्री रामतीर्थ योगाश्रम

"उमेशधाम," १७, व्हिन्सेंट स्क्वेअर स्ट्रीट, नं. १ दादर ( जी. आय. पी. ) रेल्वे स्टेशन नजीक, मुंबई १४.

## धुळें अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. धुळें

स्थापना १९०८

| | |
|---|---|
| खपलेल शेअर भांडवल | रु. १,२९,९३० |
| रिझर्व व इतर फंड | रु. २,०१,२३५ |

— मॅनेजिंग बोर्ड —

श्री. नथू सखाराम पाटील चेअरमन
श्री. बाबूराव माधवराव हारनोळ व्हाइस चेअरमन
श्री. शेख अम्मन शेख कासम मॅनेजिंग डायरेक्टर
श्री. गणपतराव मोघाजी वराडे „
श्री. जगन्नाथ वधु बडगुजर
श्री. अहमद कमाल

व्याजाचे दर—चालू ठेव ½% सेव्हिंग्ज बँक १½
मुदत ठेवी १ वर्ष ३%, २ वर्षें ३½%, ३ वर्षें ३½

सर्व प्रकारचीं बँकिंगचीं कामें केलीं जातात.

ए. एस्. देशपांडे
मॅनेजर.

न. स. पाटील
चेअरमन.

येईल. या तक्त्यांतील माहिती केवळ पावसाच्या कमतरतेमुळें दुष्काळासंबंधींची आहे. ही माहिती सरकारनें प्रसिद्ध केलेल्या "स्टॅटिस्टिकल ॲटलस ऑफ धी बॉंबे स्टेट, १९५०" या पुस्तकावरून घेतलेली आहे.

तक्त्यांतील माहितीवरून मुंबई राज्याचे मुख्य चार भाग किंवा प्रदेश म्हणजे (१) महाराष्ट्र (२) कर्नाटक (३) गुजराथ व (४) कोंकण यामध्यें गेल्या २५ वर्षांत दुष्काळी परिस्थिति कोठे व कशी होती यासंबंधानें सर्वसाधारण कल्पना येईल. तक्त्यामध्यें 'दु' हें अक्षर ज्या जिल्ह्याखालीं दिलेलें आहे त्या जिल्ह्यामध्यें निर्दर्शित केलेल्या वर्षी दुष्काळ होता असें समजावयाचें आहे. दुष्काळाची तीव्रता जिल्ह्यांतील कोणत्या भागांत विशेष होती, यासंबंधानें माहिती थोडक्यांत खालीं दिली आहे.

## मुख्य दुष्काळी प्रदेश

एकंदर पडलेल्या दुष्काळांच्या संख्येवरून पहातां महाराष्ट्रांतील निरनिराळ्या भागांत हें प्रमाण सर्वांत जास्त म्हणजे जवळ जवळ निम्में आहे, असें दिसून येतें. त्यानंतर कर्नाटकाचा नंबर लागतो व नंतर गुजराथ व कोंकण असा क्रम येतो. महाराष्ट्रामध्यें सोलापूर जिल्ह्यांत सर्वांत जास्त म्हणजे (गेल्या २५ वर्षांत) दहा वर्षे दुष्काळी परिस्थिति होती असें दिसून येईल. अर्थात् ही स्थिति या जिल्ह्याच्या निरनिराळ्या तालुक्यांत वेळोवेळ होती. यावरून या जिल्ह्यांतील पाऊसमान किती अनिश्चित आहे हें सहज समजण्यासारखें आहे. यानंतर कर्नाटकांतील विजापूर जिल्ह्यांत गेल्या पंचवीस वर्षांत आठ वर्षे दुष्काळाचीं होतीं, असें दिसून येतें.

## गुजराथ

गुजराथसंबंधानें पहातां फक्त पंचमहाल जिल्ह्यांतच दुष्काळांची संख्या थोडी जास्त दिसून येते. परंतु या जिल्ह्यांतील दोन विवक्षित तालुक्यांतच फक्त, म्हणजे 'दाहोद' व 'जालोद' यांतच आळीपाळीनें दुष्काळी परिस्थिति तालुक्यांच्या कांहीं भागांत होती असें आढळतें; परंतु जिल्ह्याचा इतर भाग सुरक्षित असाच होता असें दिसून येतें. गुजराथमधील इतर जिल्ह्यांत पावसाचें एकंदर प्रमाण व पर्जन्याची वर्षभर वाटणी हंगामशीर होत असल्यामुळें हा प्रदेश दुष्काळापासून संरक्षित असा आहे. शिवाय या प्रदेशांतील जमिनी उत्तम प्रकारच्या असल्यामुळें, पडलेल्या पावसाचें पाणी धरून ठेवण्याची शक्ति या जमिनीमध्यें चांगली असते. कित्येक वेळेस पाऊस थोडा अधिक झाल्यास पिकावर त्याचा परिणामही होतो. भडोच जिल्ह्याच्या कांहीं भागांत ४० इंच पर्यंतही पाऊस पडतो, व या भागांत कापूस हें मुख्य पीक असूनसुद्धां कापसामध्यें भातही पेरण्याचा प्रथा आहे. कारण, पावसाचें प्रमाण भातासहि पुरण्याइतकें असतें हें होय. भात निघाल्यानंतर कापसाचें पीकही उत्तम येऊं शकतें. याप्रमाणें पावसाच्या निश्चित व भरपूर प्रमाणामुळें दोन पिकें सहज निघूं शकतात: एक अन्नधान्याचें व दुसरें कापसासारखें पैसे देणारें व्यापारी पीक. केवळ पावसाच्या निश्चित व भरपूरपणामुळें एकाच जमिनींत एकाच वर्षी दोन्ही हंगामी पीकें होऊं शकतात, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. महाराष्ट्रासारख्या प्रदेशांत हें केवळ पाणी देऊनच शक्य होईल.

तक्त्यामध्यें गुजराथमधील अहमदाबाद ह्या जिल्ह्यामध्यें १९३९-४० सालीं दुष्काळ पडल्याचें दाखविलें आहे. परंतु यावर्षी या जिल्ह्याच्या फक्त 'विरमगांव' तालुक्यामध्यें पाऊस कमी झाल्यामुळें तेथें दुष्काळी परिस्थिति निर्माण झाली होती. या जिल्ह्याच्या बाकीच्या भागामध्यें नेहमीप्रमाणें सुकाळच होता. त्याचप्रमाणें खेडा जिल्ह्यामध्यें १९४७-४८ सालीं दुष्काळ असल्याचें दाखविण्यांत आलेलें आहे. परंतु वरीलप्रमाणेंच या जिल्ह्यांतील 'मातर' या तालुक्यांतच फक्त या वर्षी पाऊस कमी पडल्यामुळें दुष्काळी परिस्थिति निर्माण झाली होती. जिल्ह्याच्या इतर भागामध्यें सुस्थिति होती.

वरील एकंदर हकिकतीवरून गुजराथ हा प्रदेश पावसाच्या बाबतींत महाराष्ट्र व कर्नाटक या दोन्हीं प्रदेशांच्या मानानें बराच संरक्षित आहे, असें दिसून येतें. पंचमहाल जिल्ह्यासंबंधी वर उल्लेख आलेला आहेच. या जिल्ह्यामध्यें सात वेळेस दुष्काळी परिस्थिति होती असें तक्त्यावरून दिसून येतें. परंतु हे दुष्काळ सबंध जिल्ह्यामध्यें नसून जिल्ह्याच्या तालुक्यांतील कांहीं भागामध्यें होते हें खालीलवरून दिसून येईल. १९३५-३६ मध्यें दुष्काळी परिस्थिति फक्त 'गोधा' तालुक्यांतच होती. १९३७-३८ सालीं पडलेला दुष्काळ फक्त 'झालोद' तालुक्यापुरताच होता. १९३७-३८ सालीं दुष्काळी परिस्थिती फक्त 'दाहोद' तालुक्यापुरतीच होती. याप्रमाणें पंचमहाल जिल्ह्यांत पडलेले दुष्काळ मुख्यतः 'दाहोद' व 'झालोद' या तालुक्यांतच पडलेले दिसून येतात; जिल्ह्याचा बाकीचा भाग दुष्काळपीडित नव्हता असें दिसतें.

## महाराष्ट्र

महाराष्ट्रासंबंधानें पाहूं गेलें असतां, सोलापूर जिल्ह्यामध्यें बहुतेक दरवर्षी कांहीं तालुके दुष्काळानें पछाडलेले दिसून येतात. एकामागून एक अशीं पावसाच्या कमतरतेचीं वर्षे या जिल्ह्याच्या कोणत्याना कोणत्या तरी भागांत येत असल्यामुळें, या जिल्ह्यांत सर्वत्र दुष्काळाची छाया पसरली जाते. त्यामुळें सर्वत्र जिल्हाभर वेळेवर व भरपूर पाऊस झाला तरच परिस्थितीमध्यें पालट होतो. वरील तक्त्यावरून दिसून येईल कीं, १९३६-३७ पासून १९४६-४७ पर्यंत म्हणजे लागोपाठ १० वर्षे या जिल्ह्याच्या कोणत्याना कोणत्या तरी भागांत पावसाची कमतरता कमीअधिक प्रमाणांत होतीच. वरीलप्रमाणेंच अहमदनगर व पुणें या महाराष्ट्रांतील इतर जिल्ह्यांची स्थिति थोड्याफार प्रमाणांत दिसून येते. हे तीन्हीहि जिल्हे पावसाच्या दृष्टीनें अत्यंत अनिश्चित असेच आहेत.

नाशिक जिल्ह्यामध्यें १९४१-४२ या वर्षी दुष्काळ असलेला तक्त्यांत दाखविला आहे. परंतु नाशिक जिल्ह्याच्या 'पेठ' या तालुक्यांत भरपूर पाऊस न झाल्यानें या वर्षी या तालुक्यांतच फक्त दुष्काळी परिस्थिति होती; जिल्ह्याचा इतर भाग सुखी होता. त्याचप्रमाणें सन १९४६-४७ सालीं पूर्व खानदेशमध्यें दुष्काळ दाखविला आहे. परंतु या ठिकाणीं पावसाची कमतरता हें दुष्काळाचें कारण नसून या वर्षी नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यांत गारांची भयंकर वृष्टि झाल्यामुळें पिकांची नुकसानी होऊन दुष्काळी परिस्थिति निर्माण झाली होती. सातारा जिल्ह्याचे कांहीं तालुके, विशेषतः 'माण' व 'खटाव' वगैरे कमी पावसाच्या प्रदेशांत येतात व या जिल्ह्यांतहि दुष्काळी परिस्थिति निर्माण होते. तक्त्यावरून सातारा जिल्ह्यामध्यें दोन वेळेस ही परिस्थिति होती, असें दिसून येईल.

## कर्नाटक

कर्नाटकांतील विजापूर जिल्हा हा अत्यंत दुष्काळी प्रदेशांत येतो. पंचवीस वर्षांच्या काळामध्यें या जिल्ह्यांत आठ वर्षे दुष्काळाचीं होतीं असें दिसून येतें. या जिल्ह्याशिवाय कर्नाटकांतील

बेळगांव व धारवाड या जिल्ह्यांचे पूर्व भागांतहि पावसाच्या अनिश्चिततेमुळें दुष्काळ पडतात. यावरून कर्नाटकाचाहि बराचसा भाग दुष्काळी आहे असें दिसून येतें.

### कोंकण

कोंकण प्रदेश हा पावसाचे बाबतींत निश्चित व भरपूर पाऊस पडणारा आहे. परंतु या प्रदेशामध्यें अतिवृष्टीमुळें नुकसान होण्याचा संभव असतो. तक्त्यावरून १९३९–४० सालीं कुलाबा जिल्ह्यामध्यें दुष्काळ होता असें दिसून येतें. परंतु सदर वर्षी कुलाबा जिल्ह्यांतील अलिबाग तालुक्यामध्येंच फक्त पाऊस फार झाल्यामुळें पिकांची नुकसानी होऊन दुष्काळी परिस्थिति निर्माण झाली होती. जिल्ह्याच्या इतर भागांत नेहमींप्रमाणें अबादानी होती. सन १९४०–४१ सालीं ठाणें जिल्ह्यामध्यें दुष्काळी परिस्थिति असलेली दिसते. परंतु या जिल्ह्याच्या 'डहाणू', 'उंबरगांव' व 'पालघर' या तालुक्यामध्यें पावसाच्या कमतरतेमुळें या सालीं पिकें बरीं नव्हतीं. त्यामुळें दुष्काळी परिस्थिति निर्माण झाली होती. कोंकण प्रदेशामध्यें पावसाच्या आपत्तीपासून क्वचितच दुष्काळ पडण्याची भीति असते.

याप्रमाणें जोडलेल्या तक्त्याच्या निरीक्षणावरून पावसाच्या आपत्तीमुळें कोणते प्रदेश दुष्काळास वारंवार बळी पडतात व कोणते पावसामुळें संरक्षित आहेत याची कल्पना स्पष्ट येईल.

## दुष्काळ–प्रतिबंधक उपाय

वरील एकंदर हकीगतीवरून मुंबई राज्यामध्यें दुष्काळाचें मुख्य कारण म्हणजे पावसाचा अपुरेपणा, तो अवेळीं पडणें व त्याची अनिश्चितता हीं कारणें मुख्य होत असें दिसून येतें. वर दिलेली दुष्काळासंबंधी माहिती ही अलीकडील पंचवीस वर्षांपुरतीच आहे. परंतु याच्याही पूर्वी अनेक मोठे मोठे दुष्काळ पडलेले आहेत व त्यांची नोंदही झालेली आहे. दुष्काळ पडूं नयेत म्हणून काय उपाय केले पाहिजेत, त्याचप्रमाणें दुष्काळ पडल्यावर काय करावयाचें, यासंबंधीच्या शिफारशी करण्याकरितां सन १८८० सालीं एक 'फॅमिन कमिशन' (दुष्काळ कमिशन) सर जॉन स्ट्रॅची त्यावेळचे वायव्य सरहद्दप्रांताचे लेफ्टेनंट गव्हरनर, यांचे अध्यक्षतेखालीं नेमण्यांत आलें होतें. या कमिशननें फारच माहितीपूर्वक असा रिपोर्ट प्रसिद्ध केलेला होता. या रिपोर्टमधील दुष्काळ-प्रतिबंधक उपायांपैकीं दोन महत्त्वाच्या बाबींचाच येथें उल्लेख करणें अत्यंत जरूर वाटल्यावरून त्यांचा निर्देश खालीं केला आहे. त्या म्हणजे (१) शेती सुधारणा आणि (२) दुष्काळी प्रदेशांतील शेतीस पाणीपुरवठा. शेती सुधारण्याच्या दृष्टीनें (१) प्रत्येक प्रांताकरितां स्वतंत्र शेतीखातें स्थापन करणें व (२) दुष्काळाच्या प्रतिबंधाकरितां सुमारें २० ते ३० इंच पाऊस पडणाऱ्या प्रदेशांतील शेतीकरतां मोठ्या पाणीपुरवठ्याच्या योजना अस्तित्वांत आणणें. या बाबतींत असें निश्चित म्हटलें आहे कीं, दुष्काळ पडल्यानंतर त्यापासून संरक्षण करण्यापेक्षा दुष्काळापासून प्रत्यक्ष संरक्षण करण्याकरितां शेतीस पाणीपुरवठा करणें यास अग्रस्थान दिलें पाहिजे. यामुळें दुष्काळ पडल्यानंतर जमिनीच्या सारासुटीपासून होणारें नुकसान, दुष्काळपीडित जनतेस सहाय्यानिमित्त होणारा खर्च व तगाई, ढोल वगैरेवर होणारा प्रचंड खर्च, हीं सर्व टळून शेतकऱ्यामध्यें शेती करण्याच्या कामीं जास्त उत्साह उत्पन्न होईल. या पाण्याच्या योजनांचा उपयोग केवळ एखाद्या दुष्काळी वर्षापुरताच होत नसून वेळेवर पाऊस पडणाऱ्या वर्षांतहि यामुळें शेतीचीं कामें व्यवस्थित पार पाडण्यास, पिकांच्या उत्पन्नांत वाढ होण्यास व निरनिराळीं व जास्त पैसा देणारीं पिकें काढण्याच्या कामींहि यांचा अत्यंत उपयोग आहे. याच्याहि पुढें जाऊन रिपोर्टमध्यें असाहि उल्लेख केलेला आहे कीं, पाण्याच्या योजनावर झालेल्या खर्चापासून प्रत्यक्ष किती उत्पन्न येईल एवढाच विचार करून चालणार नाहीं; अवर्षणामुळें वारंवार दुष्काळ पडणाऱ्या प्रदेशांतील जनतेस बचावण्याकरितां करावा लागणारा अफाट खर्च व दुष्काळामुळें जनावरांची व मनुष्याची होणारी हानी, हीं केव्हांही मोठीच असणार.

यावरून नेहमीं दुष्काळानें पीडित भागाकरितां त्या प्रदेशांतून वहाणाऱ्या नद्यांस मोठमोठीं धरणें बांधून, त्यास दुष्काळापासून सुरक्षितता आणणें किती आवश्यक आहे हें उघड होतें. महाराष्ट्र व कर्नाटक भाग जो नेहमीं दुष्काळान ग्रस्त असतो अशा या प्रदेशांतून वाहणाऱ्या नद्याहि पुष्कळच आहेत व या प्रदेशांची भूरचनाहि या नद्यांचा उपयोग करून घेण्यास योग्य अशीच आहे.

फॅमिन कमिशनची दुसरी महत्त्वाची शिफारस म्हणजे शेतीसुधारणा करणें हीं होय. शेतीसुधारणा करण्याच्या दृष्टीनें हिंदुस्थानांतील शेतीची शास्त्रीयदृष्ट्या पहाणी करण्याकरितां एका विद्वान् शेतीरसायनशास्त्रज्ञाची नेमणूक करून पहाणी करावी अशी शिफारस होती. त्याप्रमाणें डॉ. जॉन ऑगस्टस व्हॉलकर या इंग्लंडमधील रॉयल ॲग्रिकल्चरल सोसायटी या संस्थेंतील नामांकित शेतीरसायनशास्त्रज्ञांची या कामीं नेमणूक करण्यांत आली. डॉ. व्हॉलकर हे हिंदुस्थानामध्यें १० डिसेंबर, १८८९ मध्यें आले व १०. जानेवारी, १८९१ ला, आपलें काम संपवून विलायतेस रवाना झाले. या विद्वान् गृहस्थांनीं हिंदुस्थानामध्यें बरोबर १३ महिने हिंडून आणि सर्व पहाणी करून एक अत्यंत महत्त्वपूर्ण व फारच उद्बोधक असा रिपोर्ट सादर केला. या रिपोर्टांत डॉ. व्हॉलकर यांनीं शेतीसुधारणेसंबंधीं केलेल्या अनेक शिफारसी आजही लागू पडण्यासारख्या ताज्या आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांनीं केलेल्या शिफारसींमध्यें अनिश्चित पाऊस पडणाऱ्या प्रदेशांतील शेती सुधारून सुबत्ता निर्माण होण्याकरितां 'कॅनॉल इरिगेशन' म्हणजे पाटबंधाऱ्यांच्या योजना हेंच एक महत्त्वाचें साधन आहे, असें स्पष्टपणें नमूद केलें आहे.

### सध्यांचा अन्नधान्याच्या तुटवड्याचा प्रश्न

मुंबई राज्य हा अन्नधान्याच्या दृष्टीनें तुटीचा प्रदेश आहे. दरसाल सुमारें १० लक्ष टन धान्य या राज्याकरितां बाहेरून आणावें लागतें. ही तूट भरून काढण्याकरितां खर्चहि बराच होतो. या बाबतींत भारत सरकारनें अन्नधान्याच्या आयातीकरितां केलेल्या खर्चाच्या आकड्यांकडे लक्ष देणें जरूर आहे. सन १९५१ या सालामध्यें भारत सरकारनें एकंदर ४७·३ लक्ष टन धान्य आयात केलें. याची किंमत रुपये २१६·४ कोटी होती व हें धान्य आणण्याकरितां बोटीचा भाडेंखर्च रु. ४०·१८ कोटी आला, असें प्रसिद्ध झालेलें आहे. म्हणजे ४७·३ लक्ष टन धान्यखरेदीचा एकूण खर्च रुपये २५६·५८ कोटी आला. यावरून मुंबई सरकारला लागणाऱ्या १० लक्ष टन धान्याच्या खरेदीकरितां किती खर्च येत असेल याची कल्पना येईल. हा खर्च वाचवून धान्याच्या दृष्टीनें मुंबई राज्य स्वयंपूर्ण करण्याचें साधन म्हणजे मुंबई राज्यांतील कमी पावसाच्या दुष्काळी प्रदेशाकरितां पाणीपुरवठ्याच्या योजना त्वरित हातांत घेऊन पुऱ्या करणें हाच होय. महाराष्ट्रांतील नद्यांचा पूर्ण उपयोग करून पाटबंधाऱ्यांची व्यवस्था झाल्यास सुमारें १२ लक्ष एकर जमिनीस पाणीपुरवठा होऊं शकेल, असा अंदाज काढलेला आहे. यामुळें धान्याची तूट नाहींशी होऊन सर्वत्र सुबत्ता व संपन्नता होईल.

# संशोधन "केल्यानें होत आहे रे"

( लेखकः— डॉ. श्री. द. लिमये, बी. ए., [ ऑनर्स ] पीएच्. डी., डायरेक्टर, रसायन-मंदिर, पुणें २ )

पाश्चात्य देशांतील अवाढव्य कारखाने, तेथील शास्त्रीय प्रगति आणि संशोधनपद्धति पाहिल्यानंतर विचारी माणसाला साहजिकच प्रश्न पडूं लागतो, कीं अशा प्रकारें आपल्याकडे सुधारणा होणें शक्य आहे काय? त्यासाठी आवश्यक तें शिक्षित मनुष्यबळ आपल्याकडे निर्माण कसें होईल? आपल्या आणि अमेरिकेसारख्या देशांतील जीवनमानामधील अंतर पाहतां हे आणि असे अनेक प्रश्न मनाला व्याकुल करतात, यांत कांहींच आश्चर्य नाहीं. आपल्या अडचणी बऱ्याच असल्या तरी त्यांतही आशा करण्यास अनुकूल वस्तुस्थिति आहे. ती अशी कीं, आपल्याकडे सर्वत्र आपली स्थिति सुधारली पाहिजे, आधुनिक उत्पादनपद्धतींचा अवलंब करून आपलें जीवनमान उंचविलें पाहिजे, शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे, इत्यादि गोष्टींची जाणीव आपणांस झालेली आहे, एवढेंच नव्हे तर या जाणीवेची बोंच माणसांस अस्वस्थ करण्याइतकी तीव्र असून त्यामुळें कांहीं "यत्न तो करावा" या सूत्राची कांस धरण्याची सिद्धताही दिसत आहे. असो.

अमेरिकेंत असतांना माझा अनेक समव्यवसायी आणि समवयस्कर मंडळींशीं संबंध आला. एकट्या हार्वर्ड विद्यापीठांत आम्हीं सहा जण रसायनशास्त्रांतील "पोस्ट डॉक्टोरल रिसर्च फेलो" म्हणून तिघां प्राध्यापकांपाशीं काम करीत होतों. यापूर्वी तेथें काम केलेल्या दोघांतिघां हिंदी तरुणांनीं चांगला लौकिक मिळविला होता, हें सांगण्यासारखें आहे. तेव्हां समान संधि मिळाल्यास, आपल्याकडील विद्यापीठांतून शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्यांस जगांतील इतर समव्यावसायिकांमध्यें बरोबरीनें काम करतां येतें, हें आपल्याकडील संशोधनसंस्थांमधील तोकडी साधनसामुग्री विचारांत घेतां खरोखरीच महत्त्वाचें आहे. या सहा जणांमधील एक सोडून सर्वांस हिंदी विद्यापीठाची डॉक्टोरेट होती. तेव्हां आपल्याकडे साधनसामुग्री तोकडी असली तरी त्याच्याच बळावर होईल तेवढें काम करीत रहाणें, हेंच आजच्या परिस्थितींत योग्य होय. गडगंज साधनसामुग्री असल्यावांचून संशोधन क्षेत्रांत उतरण्यांत अर्थ नाहीं, अशा प्रकारची "खाईन तर तुपाशीं" ही वृत्ति अतिशय घातुक होय. याचा अर्थ या संस्थांना साधनें कधींच देण्याची आवश्यकता नाहीं, असा समाजानेंही करतां कामा नये!

अमेरिकन प्राध्यापकास असलेलें स्वातंत्र्य पाहून खरोखरीच आश्चर्य वाटतें. बारिकसारिक नियमांचे काटेरी लगाम त्याच्या गळ्यांत नसल्यामुळें त्यास शिक्षणविषयक वेगवेगळे प्रयोग करून पाहतां येतात. त्याचप्रमाणें आपल्या संशोधनास आवश्यक द्रव्यें आपल्या वर्गातील विद्यार्थ्यांकडून बनवून घेणें शक्य होतें. म्हणजे या नवीन विद्यार्थ्यांस कामाचा अनुभव मिळतो आणि प्राध्यापकास हवीं असलेलीं द्रव्यें चटकन् मिळतात, असा दुहेरी लाभ होतो. तेंच जर ठरीव द्रव्येंच वर्षानुवर्षे करण्याचें बंधन असलें तर विद्यार्थ्यांस आणि प्राध्यापकांस वरील प्रकारच्या लाभास मुकावें लागतें. किंबहुना, पदवी परीक्षेस बसणाऱ्या त्यांच्या आणि आपल्या विद्यार्थ्यांची बौद्धिक पातळी सारखीच असूनही तिकडील विद्यार्थ्यांस प्रत्यक्ष आधुनिक साधनें व प्रयोगपद्धति डोळ्यांनीं पाहण्यास, हातांनीं काम करण्यास मिळतात हाच विशेष होय. तेव्हां अशा प्रकारची संधि आपल्या विद्यार्थ्यांना अधिकाधिक कशी मिळेल याचा विचार झाल्यास आणि त्याप्रमाणें पाउलें पडल्यास फार मोठा लाभ होणार आहे. त्यायोगें शिक्षणांतील तांत्रिकपणा, "तोच तोपणा" (मोनॉटनी) जाऊन, त्यांत अधिक जिव्हाळा आणि जिवंतपणा येईल.

संशोधनांचा उद्योगधंद्यांस अनेक प्रकारें लाभ होत असतो याची जाणीव असल्यानें तिकडील कारखाने स्वतः आणि विद्यापीठांकरवीं अतिशय द्रव्य वेंचतात. त्याचप्रमाणें संशोधनास आवश्यक द्रव्यें, पदार्थ या कारखान्यांतून मिळणें सहज शक्य होतें. एरव्हीं सध्यांच्या स्पर्धेमध्यें अमेरिकन विद्यापीठांस टिकाव धरणें अशक्य झालें असतें. अशा प्रकारच्या उभयपक्षीय सहकार्यामुळेंच "कॉर्टिसोन" सारख्या किचकट समस्यांचें निराकरण चटकन् होऊं शकलें. निरनिराळ्या निधींमधून बहुतेक प्राध्यापकांस आपल्या सहाय्यकांस द्यावें लागणारें द्रव्य मिळत असतें आणि तें प्राध्यापक आपल्या मनाप्रमाणें वेंचीत असतो. या कामींही त्यांस स्वातंत्र्य असतें. त्यामुळें द्विदल राज्यपद्धतींत उद्भवणारे दोष तेथें उत्पन्न होत नाहींत.

प्रचलित शास्त्रीय प्रगतीसंबंधीं, शास्त्रांतील मूलभूत सिद्धांतांविषयीं सर्वसामान्य माणसास माहिती देण्यासाठी बरेच प्राध्यापक जागरूक असतात असें आढळून आलें. लेख, व्याख्यानें, प्रदर्शनें, इत्यादि मार्गांनीं हें कार्य साधतात. प्रत्यक्ष संशोधनांत गढलेल्या तज्ज्ञांनीं अशा प्रकारचें कार्य केल्यानें त्यांत साहजिकच जिवंतपणा, प्रामाणिकता आणि कळकळ अतिशय दिसून येते. तज्ज्ञांची लोकाभिमुखता हा कोणत्याही समाजाचा भूषणास्पद ठेवा मानला पाहिजे. नभोवाणी आणि दूरदर्शन हीं साधनें या प्रकारच्या उपक्रमांस पोषक ठरतात. मात्र त्या प्रमाणांत या साधनांचा तिकडे उपयोग करीत नाहींत, हें अनेकांच्या मतें खेदजनक आहे. विज्ञानप्रसारासंबंधीं मला स्वतःला विशेष आवड असल्यानें साहजिकच तिकडच्या अशा प्रयत्नांमुळें माझी याविषयींची श्रद्धा दृढावली असल्यास आश्चर्य नाहीं. या दृष्टीनें अधिक संघटित आणि विस्तृत प्रयत्न करण्यासाठी लवकरच खटपट करण्याचा माझा विचार आहे. दहा वर्षांपूर्वी मराठीमध्यें जेवढा शास्त्रीय विषयांस वृत्तपत्रांतून वाव मिळत असे त्यापेक्षां सध्यां अधिक मिळूं लागलेला आहे, हें कांहीं थोड्या तरुण मंडळींच्या चिकाटीचें द्योतक आहे. तेव्हां पुढील काळांत अधिक यशाची आशा करण्यास निश्चित अवसर आहे, असें वाटतें.

तसेंच पाहूं गेल्यास, आपल्याकडे अजून शास्त्रीय शिक्षणास नुकताच कोठें खरा आरंभ होत आहे. अशा वेळीं त्याविषयींच्या अपेक्षा आणि प्रत्यक्ष साध्य झालेल्या गोष्टी यांचा मेळ, विशेषेंकरून जगाच्या भरधांव प्रगतीच्या तुलनेनें न बसल्यामुळें एक प्रकारची विषण्णता निर्माण होणें मनुष्यस्वभावास धरूनच आहे. परंतु त्यामुळें आपला प्रयत्न सोडून न देतां उलट तो अधिक नेटानें करीत राहणें हेंच योग्य ठरणारें आहे. म्हणूनच, सरकार आणि धनिक यांनीं आपल्या तरुणांस अव्याहत विज्ञानक्षेत्रामध्यें काम करण्याची संधि मिळण्याची जी जी सोय येथें निर्माण करतां येईल, ती करण्यास हातभार निष्ठायुक्त अंतःकरणानें लावला पाहिजे. तसें झाल्यास आपले तरुणही त्या संधींचा योग्य उपयोग करून आपल्या परीनें देशसेवा करण्यास चुकणार नाहींत, असा भरंवसा वाटतो. "केल्यानें होत आहेरे" हा आपला बीजमंत्र राहिला पाहिजे.

# बांठीया बँक लिमिटेड

( स्थापना १९४१ )

हेड ऑफिस—पनवेल ( कुलाबा )

—शाखा—

मुंबई, पुणें, अहमदनगर, कल्याण, भिवंडी, श्रीरामपूर

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. |
| ( १५००० भागांत विभागलेलें ) ... | १५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल ... | ७,५०,००० |
| खपलेलें व वसूल केलेलें भांडवल | |
| ( राखीव निधीसह ) ... | ५,१०,३०४ |
| खेळतें भांडवल ( ता. ३१-१२-५१ ) ... | १८,०९,८९४ |

—संचालक मंडळ—

श्री. केशरचंद आनंदराम बांठीया, श्री. रतनचंद भिकमदास बांठीया ( चेअरमन ), श्री. शिवराज आनंदराम बांठीया, श्री. थिरदीचंद मूरचंद बांठीया, श्री. सोराबजी रुस्तमजी घासवाला, श्री. गंगाधर विष्णु पुराणिक, श्री. केशव गोविंद लिमये, B. A. LL. B., श्री. जयनारायण शिवनारायण कासट, B. Com. श्री. चुनीलाल जसरुप मुणोत, श्री. रवजी भिमजी रंगपरिया, ( ऑ. मॅजिस्ट्रेट. )

**व्याजाचे आकर्षक दर**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे परवानगीनें नवीन शेअर-विक्री चालूं केली आहे. प्रत्येक शेअर १०० रुपयांचा आहे. अर्जासोबत रु. ५० द्यावयाचे आहेत. अर्जाचा नमुना बँकेचे कोणतेही ऑफिसांत मिळेल.

श्री. रतनचंद भिकमदास बांठीया
चेअरमन

आमचे हितचिंतकांना ही दिवाळी भाग्याची जावो !

# धी बँक ऑफ सिटिझन्स लिमिटेड

मुख्य कचेरी—१५१४ मारुती गल्ली, बेळगांव

( स्थापना १९३७ )

*सुरक्षितपणा, सचोटी व सेवा या त्रयींवर अधिष्ठित असलेली*

बेळगांव, खानापूर, नंदगड, चिकोडी, निपाणी, संकेश्वर, बैलहोंगल, धारवाड, हुबळी, अळणावर, गदग, विजापूर, कारवार, अकोला, शिरशी, कुमठा, हलयाळ.

या ठिकाणीं शाखा असलेली व सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार करणारी बँक.

मुंबई व इतर ठिकाणांहून रेल्वे रिसिटस वसुली-साठी वरील ठिकाणीं पाठविणेची सोय आहे.

G. D. Saraff
चेअरमन

बँकेच्या सभासदांना व हितचिंतकांना नवीन वर्ष सुखाचें जावो.

# दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, कराड ( उ. सातारा )

( झीज सोसून समाजाची सेवा साधावी आणि सामुदायिक समाधान उभारावे हा बँकेचा विशेष आहे. )

स्थापना : १४-१-१९१७

अध्यक्ष : श्री. पु. पां. ऊर्फ बाबूराव गोखले, B. A., Ex. M. L. A.,

| | |
|---|---|
| १. भागभांडवल | १,४६,३३० रु. |
| २. गंगाजळी | १,१०,००० रु. |
| ३. ठेवी | १३,५०,००० रु. |
| ४. विन्यास | ११,००,००० रु. |
| ५. इतर निधी | १,७५,००० रु. |
| ६. खेळतें भांडवल | १८,००,००० रु. |

विशेषः—

(अ) चालू, सेव्हिंग्ज, मुदतबंद वगैरे ठेवी आकर्षक दरानें स्वीकारल्या जातात.

(आ) रेल्वे रिसिट्स, हुंड्या, चेक्स, ड्राफ्टस् वगैरेंची माफक दरांत वसुली केली जाते.

(इ) मुंबई, अहमदाबाद, पुणें, कोल्हापूर वगैरे प्रमुख ठिकाणचे चेक्स, हुंड्या, ड्राफ्टस् माफक दरांत दिले जातात.

(ई) ओरिएंटल, वेस्टर्न इंडिया, वाईब, कॉमनवेल्थ, ट्रस्ट ऑफ इंडिया वगैरे विमा कंपनीचे हप्ते स्वीकारण्याची सोय आहे.

(उ) बँकेचे नियामकमंडळ, सेवकवृंद व सभासद यांच्यांतील सहकार, खास हिशेबनिसांनीं आणि लेखापरीक्षकांनीं, सरकारी अधिकाऱ्यांनीं व स्वतंत्र सहकार शास्त्रींनीं बँकेच्या व्यवस्थितपणाचें केलेलें कौतुक, लोकशिक्षणार्थ व सहकार प्रचारार्थ बँकेनें वर्षानुवर्षे सढळ हातानें केलेला खर्च यांनीं बँकेचें नांव सर्वत्र केलें आहे.

**विशेष माहितीसाठीं भेटा अगर लिहा.**

कराड, दि. २४-९-१९५२ — शंकर पुरुषोत्तम कुलकर्णी, मॅनेजिंग डायरेक्टर.

ही दिवाळी व नवें वर्ष बँकेच्या सर्व खातेदारांस, भागीदारांस व इतर संबंधीयांस सुखाचें व भरभराटीचें जावो.

# दी बँक ऑफ औंध लि.,

—: सातारा :—

हेड ऑफिसः—१११-११२, सदाशिव पेठ, सातारा.

शाखाः—औंध, भवानीनगर व ओगलेवाडी.

—: संचालक मंडळ :—

श्री. नरहर गंगाधर जोशी, बी. ए., एलएल. बी., वकील, सातारा. ( चेअरमन )

श्री. बाळकृष्ण गणेश चांदोरकर, बी. ए., एलएल. बी., वकील, सातारा.

डॉ. माधव दत्तात्रय बोकील, एल. सी. पी. अँड एस. डी. ओ. एम. एस. ( बॉंबे ) सातारा.

श्री. रघुनाथ दिनकर माजगांवकर—व्यापारी, सातारा.

श्री. बाळकृष्ण रामचंद्र वर्तक—व्यापारी व कमिशन एजंट, पुणें.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मुंबई, पुणें, सांगली, सोलापूर, कऱ्हाड व कोल्हापूर वगैरे ठिकाणांवर ड्राफ्टस् दिले जातात.

बँकेच्या शेअर्सची विक्री सुरूं आहे.

मुदत ठेवी आकर्षक दरानें स्वीकारल्या जातात.

१ वर्ष—२ टक्के, २ वर्षे—२। टक्के, ३ वर्षे—२॥ टक्के, ४ वर्षे—२॥। टक्के व ५ वर्षे—४ टक्के.

**विशेष माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.**

बा. वा. घमंडे, C. A. I. I. B. मॅनेजर.


न. गं. जोशी, B. A., LL. B. चेअरमन.

# लँड मॉर्गेज बँकांस नव्या भांडवलाचा तुटवडा

( लेखकः— श्री. आण्णाप्पा नारायण कल्याणी, चेअरमन, सातारा जि. को. लँड मॉर्गेज बँक लि. कराड-सांगली. )

आम्हां जिल्हा लँड मॉर्गेज बँकांना भांडवल पुरविणारी जी मध्यवर्ती संस्था आहे त्या मुंबई प्रॉ. को. लँड मॉर्गेज बँकेनें १९५० मध्यें ९,८६,५५६, १९५१ मध्यें १५,७८,७१६ व १९५२ मध्यें १८७६,२५७ असें एकुण गेले तीन वर्षांत २,०२७ शेतकरी बांधवांना ४३,४१,५२९ रुपये जिल्हानिहाय बँकांमार्फत कर्ज वाटलेलें आहे. म्हणजे एकेका शेतकरी कुटुंबास २,१०० ते २,२०० रुपये देऊन त्यांची उत्पादनशक्ति वाढविण्यास मदत केलेली आहे. वरील विवेचनावरून लँड मॉर्गेज बँकांची पत दिवसानुदिवस वाढत आहे, लांब मुदतीच्या कर्जाची योजना धिमेपणानें कां होईना पण पसरत आहे, याला पोषक अशी वस्तुस्थितीहि गेल्या ३।४ वर्षांपासून निर्माण झालेली आहे. सहकारी चळवळींतील ही योजना फलद्रूप होण्यास जी संधि आतांपर्यंत नव्हती ती आतां मिळाली आहे. अशा वेळीं " आमच्या जवळ भांडवल नाहीं, तूर्त तुमचे व्यवहार स्थगित करा " असें गेल्या डिसेंबरमध्यें अनपेक्षितपणें कळविण्यांत आलें. तेव्हांपासून आजतागायत सर्वच बँकांचे व्यवहार बंद पडलेले आहेत. नवीन भांडवलाची व्यवस्था व्हावी म्हणून आपल्या मुंबई प्रॉ. को. लँड मॉर्गेज बँकेनें सरकारकडे विनंती केली आहे. अर्थात् मागणीचा विचार होऊन नवीन भांडवलाची तरतूद होईल आणि ती सरकारनें ताबडतोब करावी असें मी यावेळीं आग्रहपूर्वक सांगितल्यास वावगें होणार नाहीं. याहीं-पेक्षा पुढें जाऊन मी असें म्हणूं शकेन कीं, येत्या ५ वर्षांत या भूतारण संस्थांना निदान दोन ते अडीच कोटी रुपये भांडवल सहज व सुलभ रीतीनें मिळूं शकेल, अशी आमच्या मुंबई सरकारनें व्यवस्था करावी.

लांब मुदतीनें कर्ज देणाऱ्या संस्थांकडे जितक्या आस्थेनें काम-काज होण्यास हवें, नव्हे शेतकऱ्यांच्या उपयोगी पडून खेड्यांतील जनतेंत जें स्थान आतांपर्यंत मिळवावयास पाहिजे, तें बऱ्याच बँकांना मिळवितां आलेलें नाहीं हें कांहीं कांहीं बँकांमधील व्यव-हाराकडे पाहिल्यास त्यांत सबंध वर्षांत एखाद्या दुसऱ्या सभा-सदाला ३-४ हजार पर्यंत कर्ज देण्यांत आलेलें आहे असें दिसून येईल. बँकांचे व्यवहार इतक्या कालावधीनंतर देखील लाख-दीड लाखावर जाऊं शकले नाहींत. बऱ्याच बँका तोट्यांत आहेत. ज्या ४-२ बँकांना फायदा झाला तो २,५०० रु. च्या आंतबाहेर आहे. असें कां ? सहकारी चळवळींत या लँड मॉर्गेज बँकांना एक विशिष्ट स्थान असून सभासदांचे संसार सुखी करण्याचें त्यांत साधन आहे. कार्यकर्त्यांची कुशलता आणि चिकाटीमुळें ३-४ जिल्ह्यांत लांब मुदतीच्या कर्जाचा व्यवहार वाढला म्हणजे कांहीं सबंध मुंबई राज्यांत तो वाढला असें होत नाहीं. या बँकांचें योग्य मार्गदर्शन होऊन झपाट्यानें त्यांची वाढ व्हावी म्हणून प्रथमपासूनच स्वतंत्र अशा असिस्टंट रजिस्ट्रारच्या देखरेखीखालीं ही योजना आखण्यांत आली. मुंबई कर्जनिवारण कायद्यामुळें सुमारें १० वर्षे या व्यवहाराचा प्रसार न होता उत्साहभंग होऊन हें खातें जवळ जवळ बंदच करण्यांत आलें. त्यामुळें संधि येऊनहि सर्व बँकांमध्यें सारख्या प्रमाणांत व्यवहार वाढूं शकले नाहींत आणि म्हणूनच १९५० पासून या बँकां-करितां एका स्वतंत्र अंमलदाराची नेमणूक व्हावी म्हणून मुंबई राज्यांतील या क्षेत्रांतील सर्वच कार्य-कर्त्यांनीं विनंती करूनहि अद्यापपावेतों त्याचा सरकारकडून सहानुभूती-पूर्वक विचार झालेला नाहीं. यापूर्वीच आमच्या विनंतीचा सहानुभूतीपूर्वक विचार झाला असता तर आजच्यासारखा प्रसंग कदापी गुदरलाहि नसता. तेव्हां सर्व बँकांनीं एक-मुखानें केलेल्या मागणीचा आतां तरी सरकारकडून जरूर विचार व्हावा असें या प्रसंगीं म्हटल्याशिवाय राहवत नाहीं. स्वातंत्र्या-नंतर सहकारी चळवळीचा वाढ व्हावी, सभासदांचें जास्तींत जास्त हित व्हावें म्हणून सरकारकडून अत्यंत कसोशीनें प्रयत्न केले जातात. नवीन नवीन योजनाहि आखण्यांत येतात तें योग्यच आहे. त्याचप्रमाणें १७ वर्षां-पूर्वींच हातीं घेतलेल्या या योजनेकडे तितक्याच उत्साहानें सरकारचें लक्ष जावें, अशी माझी विनंती आहे.



# दि बँक ऑफ कराड लि., कराड.

स्थापना-१२-३-१९२६

हेड ऑफिस, कराड. शाखा—भवानी पेठ, सातारा.

| | |
|---|---|
| शेअर वसूल भांडवल | रु. २,१८,००० |
| खेळतें भांडवल | रु. २० लाख |

— बोर्ड ऑफ डायरेक्टर्स —

श्री. लक्ष्मण महादेव देशपांडे, चेअरमन.

श्री. वि. रा. बेलणकर, श्री. शं. म. ओगले, मेजर सरदार बी. एन्. पाटणकर, श्री. वि. ह. शिराळकर, डॉ. व्ही. जी. देशपांडे, श्री. रा. अ. अराणके, श्री. रा. ता. पवार तडसडकर, श्री. ना. बा. बुधकर.

मुदत-ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातात.

| | |
|---|---|
| मुदत महिने ६ | २¾% |
| मुदत वर्ष एक | ३¼% |
| मुदत वर्षे दोन | ३½% |
| मुदत वर्षे तीन | ३¾% |
| मुदत वर्षे चार | ४% |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

विशेष माहितीसाठी भेटा अगर लिहा.

कराड, ता. १-१०-५२

म. वि. खंडकर,
मॅनेजर.

# कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि. पुणें

—स्थापना दि. १८ जानेवारी, १९०६—

कामाची वेळ:—सकाळीं ९ ते ११-३० व सायंकाळीं ५-३० ते ७

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल .... | रु. १,२५,००० |
| वसूल झालेलें भांडवल .... | रु. १,१४,८०० |
| गंगाजळी व इतर निधि .... | रु. १,४०,५३३ |

हप्तेबंद (रिकरिंग) व कायम ठेवीवरील व्याजाचा दर एक वर्ष २ टक्के, २ वर्षे २॥ टक्के व ३ वर्षे ३ टक्के

बँक आपल्या सभासदांनाच दोन जामीन, घर, सरकारी कर्जरोखे, कायम ठेव, सोनें, पोस्टल पॉलिसी अगर बँकेनें पसंत केलेल्या विमा कंपन्यांच्या पॉलिसी वगैरे तारणांवर कर्ज देतें. सोन्याच्या तारणांवर व्याजाचा दर ५॥ टक्केप्रमाणें आहे. तसेंच माफक व्याजाच्या दरानें सभासदांना ओव्हरड्राफ्ट देण्यात येतात. सरकारी नोकरांचा पगार, पेन्शन, बिलेंवसुली इत्यादि बँकिंगचे व्यवहार बँक करिते. तसेंच सभासदांस नियमितपणा, काटकसर व शिल्लक ठेवणेची संवय लागावी या हेतूनें बँकेनें नवीन हप्तेबंद ठेव घेणेस सुरवात केली आहे. बँकेनें सुरक्षिततेसाठीं, सेफ कस्टडी खातेंहि नवीनच सुरू केलें आहे. नियमांसंबंधीं कचेरींत चौकशी करावी.

य. श्री. शाळिग्राम,
कार्यवाह.

शं. ल. ओगले,
एम. ए., एलएल. बी., बी. टी.,
कार्याध्यक्ष.

# दि रत्नाकर बँक, लि.

(कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली)

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी: भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,००० |
| रिझर्व्ह फंड | ... | ५१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील,
B. A., LL. B., वकील
सांगली
चेअरमन

श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले,
कोल्हापूर,
व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा,
B. COM., C. A. I. I. B.
मॅनेजर

# पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि.

११५।११६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.

तारेचा पत्ताः—सॅनको सोप. टेलिफोन नं. ३११५

(जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तु पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था)

## संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

★ शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें; ऊंस गाळण्याचे चरक, सल्फेट व इतर खतें; पिकांच्या रोगांवरील औषधें, पेंड.

★ शेतकी-खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिक्श्चर यांचें वाटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★ पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वाटप योजनेंतील—गाड्यांचे आंस, धांवपट्ट्या, नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.

★ ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.

★ शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.

★ जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.

# व्यावसायिक उत्कर्षांतील पत्नीचा वांटा

## नवे प्रश्न : नव्या जबाबदाऱ्या

( लेखक:—" विवेकं परदेशी " )

स्वतःच्या पत्नीबाबत, बरं किंवा वाईट, कांहींहि न बोलण्याचा शिष्टसंमत संकेत आहे.

तो संकेत मोडण्याची माझी इच्छा नव्हती. पण त्याचं असं झालं—

लहानग्या आशाचा वाढदिवस आला होता.

कोणाकोणाला बोलवावयाचं याचा विचार चालू होता. अर्थात् मला उत्साह कमी होता, म्हणूनच कीं काय, बोलावण्याच्या यादींत मी भर घालीत होतों!

### मोठ्यांना आमंत्रण

मालक मंडळींना बोलवावें असें मी म्हणत होतों!

"बोलवावं असं मलाहि वाटतं. पण त्या मंडळींची अन् माझी ओळख नाहीं. आपण बोलावून ती येतील का?" मंदा म्हणाली.

"तुझं नेहमीं कांहींतरी वेगळंच असतं. आल्या-गेल्या शिवाय ओळख कशी होईल? मला मंडळींची साधारण माहिती आहे, त्यावरून ती सर्व फार सज्जन आहेत. चारचौघांत सहजपणानें मिसळणारी आहेत. आत्मप्रौढी, मोठेपणा, यांचा त्यांच्या वागण्यांत वासही येणार नाहीं."

"मंडळी चांगली असतील; मी नाहीं म्हणत नाहीं. पण त्यांना या वेळीं बोलावूं नये असं मला वाटतं. ओळखदेख झाली तर पुढल्या वर्षी बोलावूं. मोठ्या माणसांनीं आपल्याबद्दल थोडी-फार आस्था दाखविल्याखेरीज त्यांच्याशीं संबंध विशेष वाढवूं नये हें बरें."

मंदा माझ्या मनांतलच बोलत होती.

"बरं, तुझ्या म्हणण्याप्रमाणें होऊंद्या." नाइलाज झाल्याचें दाखवीत मी म्हटलं!

### पूर्वींचे सहकारी

"मग असं करूं या. आपल्या नेहरू आणि पटेलवाडींतील सर्व जुन्या मंडळींना बोलावूं या. इकडे रहावयास आल्यापासून त्यांच्याकडे जाणें-येणें फारसें होत नाहीं. या निमित्तानं येतील, बसतील, जुन्या आठवणी उजळतील."

माझ्या या सूचनेवर मंदा कांहींच बोलली नाहीं, त्यावरून तिला ही कल्पना पसंत नसल्याचं मी ओळखलं. चिडवण्याच्या उद्देशानं मी पुन्हां म्हणालों,

"का, पसंत नाहीं वाटतं? मला वाटलं आपल्या जुन्या, बरोबरीच्या मंडळींना भेटायला तूं उत्सुक असशील."

"तुम्हा पुरुषांना कांहीं समजत नाहीं—" पुढील टीका ऐकण्याकरितां मी कान तयार ठेवले.

"परवां मी पटेलवाडीवर गेलें होतें. सुशिलाबाईंनीं घालूनपाडून बोलून माझा जीव अर्धा केला."

"तुम्ही आतां मोठ्या झालांत. गाडींतून फिरतां. गोल साड्या नेसता. नवीन मोठा रेडिओ घेतला आहेत. त्या बोलणारच," निर्विकार चेहरा ठेवण्याचा प्रयत्न करीत मीं म्हटलें.

"म्हणूनच त्यांना बोलावण्याचा आग्रह धरूं नका."

"असं असतांनाहि त्यांना तसं वाटूं नये, हा काय तुमचा अट्टाहास?"

"माझा तसा अट्टाहास नाहीं. तसं त्यांना वाटणं सहाजिक आहे हें मला समजतं. पण त्यांनीं इतकं कांहीं बोलायला नको होतं." सुशिलाबाईंचें बोलणं मंदाला विलक्षण बोंचल्याचं तिचा चेहराच सांगत होता.

"त्याचं असं झालाय् कीं तुम्ही त्यांच्याशीं फार घसट ठेवलीत; अपेक्षा निर्माण केल्यात. हल्लींच्या या दिवसांत, आपण कंपनींत काम करीत असतांना, कोणाशीं कसं वागावं, बरोबरीच्या किंवा खालच्या मंडळींशीं कितपत रहस्य ठेवावं याचा तुम्हाला विचार राहिला नाहीं. मनुष्यानें सद्भावनेनं रहावं, ओळख-लोभ ठेवावा, पण फार चांगलं असूं नये." माझ्या डोसाचा परिणाम मी आजमावीत होतों.

किती तरी वेळ तसाच गेला—

"हं. तुम्ही म्हणतां तें खरं आहेसं वाटतं. तुम्ही सांगत असा तेव्हां ते पटलं नाहीं. माझंच चुकलं," एक एक शब्द सावकाश उच्चारत मंदानं कबूल केलं.

"कॉलेजांत तूं पॉप्युलर होतीस. तसंच नेहमीं असावं असं तुला वाटायचं. मी सांगून तें तुला तेव्हां कसं पटणार? जगांत सदासर्वत्र टाळ्या मिळतील ही अपेक्षा योग्य नाहीं. तसा प्रयत्न करणें बरं नाहीं. जगांत माणसं पुढें जात असतात; मागें पडत

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
स्थापना १९१८
हेड ऑफिसः—गिरगांव मुंबई
शाखा : दादर, माहीम, बेळगांव, पुणें.
शेअर भांडवल : रु. ४,५५,३००
रिझर्व्ह : रु. ४,५९,०००
ठेवी : रु. १,१२,००,०००

असतात. त्यामुळें भोंवती आनंद, खेद, संत, कितीतरी भावना उद्‌भवत असतात. आपण नेहमी जपून रहावयास पाहिजे. हल्लींचं सारं जीवन—विशेषत: हें कंपनींतील जीवन—कसरतीचं काम झालं आहे. मात्र आपल्याला भेटणाऱ्या सर्वच मंडळींशीं मिळूनमिसळून सहजतेनं राहतां—वागतां आलं पाहिजे. फार महत्त्व आहे याला."

## नवीन जात

अखेर शेजारच्या शामराव—शांताबाई आणि वामनराव—विमलाबाई या दोनच कुटुंबांना बोलावण्याचं ठरलं.

"मंदाताई, एकंदर बेत तर फारच फक्कड झालाय्‌ बुआ," जेवण पुरं होत असतांना वामनराव म्हणाले.

मंदाला अर्थात्‌ बरं वाटलं, म्हणूनच कीं काय श्रीखंड पुन्हां आग्रहानं वाढायला आलं. मी 'नको' म्हणतांना सहज पुस्ती जोडली,

"अग, त्यांनीं स्तुति केली अन्‌ तुला खरं वाटलं. परदेशांत दुसऱ्यांच्या बायकांचा उल्लेख 'सुंदर' शब्दानं करण्याची पद्धत आहे. शब्दाचा अर्थ जशाचा तसा कोणीच घेत नाहीं. तसा घेतला तर कितीतरी अनर्थ कोसळतील."

"तसं कांहीं नाहीं हो वहिनी," वामनराव ओरडले.

"का बाबा, नाहीं कां म्हणतोस. कुणी कुणाकडं गेलं तर असं म्हणण्याची पद्धतच आहे."

"आमच्याकडे औपचारिकपणा नाहीं बरं कां!" विमलाबाईंनीं वामनरावांना संभाळून घेण्याचा प्रयत्न केला.

जेवणानंतर आम्ही पान खात आरामशीर बसलों होतों. सारं उरकून पत्ते खेळण्याच्या विचारानं बायकाही जमल्या.

तेवढ्यांत आशा आली. तिचा झगा हात धुतांना भिजला होता. हातांत पाण्यानं भरलेली लहानशी लोटी होती.

मंदानं हसून तिच्या हातांतली लोटी काढून घेतली. भिजलेला झगा काढला. आशाच्या गालावर हळुवार हातानं चापटी मारली. आशेची कळी खुलली. विमलाबाईंनीं बरोबर आणलेला लाल झगा तिच्या अंगावर चढवला. शांताबाईंनीं रंगीबेरंगी रिबिनींचें पुडकेंच तिच्या हातांत दिलें. आशा खुदकन्‌ हसली; "लाल, लाल झगा" म्हणत टाळ्या पिटूं लागली.

"माझ्या मुलीला तर तुम्ही कम्युनिस्टच बनवून टाकलीत कीं," मी विनोदानं म्हटलं.

"अरे, तीच काय पण आपण सगळेच तसें आहोंत," वामनराव आशाला दोन्ही हातांनीं उंच करीत म्हणाले.

"कसंरे बाबा?" मी पृच्छा केली.

"आपण सारे अखेर कामगार आहोंत, हें एक. अन्‌ दुसरं म्हणजे, आपण आतां नवीन पद्धतीच्या गटबाजींत रहात आहोंत."

"तूं म्हणतोस तरी काय?" अर्थबोध न झाल्यानं अजीजीच्या स्वरांत मी विचारलें.

"अरे, पूर्वी आय. सी. एस. आणि इतर वरिष्ठ सरकारी अधिकारी यांची एक 'जात' होती. आतां कंपनीवाल्यांची नवीन जात निर्माण होत आहे. तुझ्या—माझ्या सारख्यांना अधिकारी बनवायचं. लठ्ठसा पगार द्यायचा. अन्‌ मग कंपनीच्या इभ्रतीला साजेशा पद्धतीनं आम्ही राहिलं पाहिजे, अशी अपेक्षा करायची, व्यवस्था करायची, आम्हीं कुठं रहायचं, कसं रहायचं, कुठं जायचं, कसं वागायचं, हें ते ठरवून देत आहेत. त्या स्टॅन्डर्डला जो आला त्याला पुढंमागं आणखी मोठं करायचं. आपल्यापेक्षां अमेरिकेंत हें फार झालय्‌. कंपनींतील अधिकाऱ्यांच्या बायका कशा असाव्यात याचा म्हणे ते

टे. नं. ६०४१८
वामन गणेश हरचेकर
चांदी, सोनें, मोत्यें व जवाहिरांचे व्यापारी.
केळकर रोड, दादर, मुंबई नं. १८
यांजकडून
अभिष्ट चिंतन
चालू दीपावली व नूतन संवत्सर
सर्व भारतीयांना सुखाचें व भरभराटीचें जावो.

दक्षिण सातारा जिल्हा मध्यवर्ती
सहकारी बँक लि०,
हेड ऑफिस—हायस्कूल रोड, सांगली.
(स्थापना १९२७)
तारेचा पत्ता— रयत बँक. टेलिफोन नंबर—३०
शाखा—१ जत, २ मिरज, ३ तासगांव.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ३,२०,२५० |
| वसूल भांडवल | रु. १,८५,८४० |
| गंगाजळी | रु. ८४,६०० |
| इतर फंडस् | रु. ७४,६०० |
| खेळतें भांडवल | रु. ३१,०६,१०० |

१ या बँकेंत चालू, सेव्हिंग्ज व कायम मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.
२ शेतकी सोसायट्यांना माफक व्याजाचे दरानें कर्ज देण्यांत येतें.
३ सोनें, चांदी व शेतकी माल तारणावर कर्ज देण्यांत येतें.
४ इतर सर्व प्रकारच्या बँकिंगचा व्यवहार केला जातो.
— अधिक माहिती समक्ष अगर पत्रद्वारें. —
१९५३–५४ सालाकरितां डायरेक्टर बोर्ड
१ मे. रा. बा. आरवाडे, बी. ए., एलएल. बी., सांगली, चेअरमन.
२ मे. व्यं. पि. पोवार, बी. ए., एलएल. बी., एम. एल. ए., मिरज, व्हा. चेअरमन.
३ मे. म. ह. गोडबोले, बी. ए., एलएल. बी., सांगली.
४ मे. के. अ. चौगुले, बी. ए., एलएल. बी., सांगली.
५ मे. जी. के. मोगली, बी. ए., एम्. एल. ए., जत.
६ मे. भ. अं. दप्तरदार, बी. ए., सांगली.
७ मे. वि. भा. देशमुख, माहुली, ता. खानापूर.
८ मे. द. भा. सूर्यवंशी, अंकलखोप, ता. तासगांव.
९ हिंदुराव म. पाटील, सांगली.
१० मे. सुबराव आ. पाटील, सांगली.
११ मे. मा. वि. चरणकर, बिळाशी, ता. शिराळा.
१२ मे. हैबतीजीराव बी. पाटील, पेठ, ता. वाळवें.
१३ मे. ज. वि. करमरकर, सराफ, सांगली.
१४ मे. ए. एन्. खानविलकर, जत.
१५ मे. अ. सि. रजिस्ट्रारसाहेब को. सो., सांगली.
एस. पी. सुर्वे, मॅनेजर. आर. बी. आरवाडे, चेअरमन.

अभ्यास करीत आहेत! कांहीं दिवसांपूर्वीं लाइफ मासिकांत 'बायकोंचा प्रश्न' असा लेख आला होता. तो मी वाचला; विमलनें वाचला; मग आम्ही दोघांनीं मिळून वाचला."

"कंपन्यांचा अन् आमच्या बायकांचा काय संबंध? मला हें बिलकुल पसंत नाहीं," मी तीव्र विरोध दर्शविला.

### आदर्श पत्नी

"अरे, त्या लेखांत कंपनीच्या दृष्टीनें आदर्श पत्नीबाबत अनेकांनीं विचार प्रदर्शित केले आहेत. परिस्थितीनुसार बदलणारी, आपलेपणा उत्पन्न करणारी, आणि यजमानाचं यश कंपनीवर अन् त्यांच्याबद्दल कंपनींतील प्रमुख मंडळींचं काय मत आहे ह्याच्यावर अवलंबून आहे, याची जाणीव असणारी; तसेंच, यजमान कंपनीचं काम उशिरापर्यंत करतात म्हणून तक्रार न करणारी, त्याची बदली झाली म्हणून उगीच अस्वस्थ न होणारी आणि विवाद्य गोष्टींत न पडणारी पत्नी आदर्श होय."

"बरोबर आहे." इतका वेळ पाइप ओढण्यांत गुंतलेले शामराव गुरगुरले.

"ह्यांचं कांहीं तरीच," शांताबाई पुढें सरसावल्या. "मी माझ्या मंडळांत, फेऱ्यांना, समितींत जाणार. कंपनीचा त्यांच्याशीं काय संबंध आहे?"

"बरोबर आहे," मी अनुमोदन दिलं.

"ह्यांनीं ऑफिसांत ऐटींत खुर्चीवर बसावें. वर पंखा आहे. समोर सेक्रेटरी आहे. बाहेर बॉय आहे. पलिकडे कारकून बसले आहेत. हें ह्यांचं राज्य, अन् हुकूम फर्मावणं हें ह्यांचं काम. संध्याकाळीं क्लब. कंपनीच्या कामाच्या निमित्तानें रात्रीचें कधीं कधीं तेथेंच जेवण, अधूनमधून विमानानें नाहीं तर रेल्वेच्या पहिल्या वर्गानें प्रवास, मोठाल्या हॉटेलांत अमिरी व्यवस्था. आम्ही येतों म्हटलं तर कंपनीचं काम आहे म्हणायचं. फारच आग्रह धरला तर परवडत नाहीं म्हणायचं. आम्हीं घरीं एकटं राहयचं; हातीं रहाणाऱ्या अपुऱ्या पगारांत भागवावयाचं. मुलं, डॉक्टर, पाहुणीमंडळी, नातलगांची उठबस, सारी मी एका हातानें मोजक्या रकमेंत करायची. हौस नाहीं, मौज नाहीं. सारं आयुष्य भरलेलं असून वठल्यासारखं." शांताबाईंची तक्रार बरीच लांबली.

"तुझं म्हणणं खरं आहे एका अर्थी; मला तरी एकट्याला बाहेर जाणं कुठं आवडतं? तें जेवणही चालत नाहीं. पण करायचं काय? कंपनीचं काम तर केलं पाहिजे ना?" समजावणीच्या आवाजांत शामराव बोलत होते.

"मग घरीं परत आल्यावर दोन दिवस रहायचं असतं तेव्हां कामाच्या निमित्तानं बाहेर कां पडता? घरी गोड लागत नाहीं. घरांत आलं म्हणजे कामाचा विचार. बाहेर गेलं म्हणजे बाहेरचा विचार. घर आठवतं कां? कितीकदा पाहिलं आहे, घरीं आल्यावर विचारावं अन् आपण उत्तर द्यावं, "विसरलों बुवा अगदींच!" लग्न झालं तेव्हां आम्हीं किती बोलत असूं, विचार करीत असूं, एकत्र रहात असूं. आतां आतां मी एकटी, एकटी असतें–" शांताबाईच्या शब्दांत कारुण्य ओथंबून येत होतं, स्वर रडका झाला होता.

### सहानुभूतीची अपेक्षा

"घरांत डांबलेली स्त्री नि बाहेरच्या जगांत वावरणारा पुरुष ही सुरवातीला जरी समपातळीवर असली तरी कालान्तरानें स्त्रीची वाढ खुंटते. पुरुष पुढें जातो ही गोष्ट खरी आहे. विवाहपूर्व काळांत स्त्रीनं नोकरी केली असेल, इतर कांहीं व्यवसाय केला असेल, तर तिला पुरुषापुढील प्रश्नांची कल्पना येण्यास तिचा स्वतःचा अनुभव उपयोगी पडतो. दुसरी एक गोष्ट आहे. तुम्ही घर व्यवस्थित ठेवता. वडील बाहेरून आल्याबरोबर त्यांचेकडे तक्रार नेऊं नये अशी मुलांना शिस्त लावता. भडक वेषभूषा न करतां आकर्षक पण व्यवस्थितपणानें राहतां. पण तुम्ही यजमानांचं म्हणणें नीट ऐकून घेत नाहीं," वादाला निराळें वळण लावीत वामनराव म्हणाले.

"काय तेंच तें ऐकायचं. आम्हीं कांहीं सांगितलं "तर तुला कांहीं कळत नाहीं" असं म्हणायचं; आमचा अपमान करायचा" शांताबाईचा राग निमाला नव्हता.

"आपण ऐकतां म्हणजे नाइलाजानें ऐकल्यासारखें करता. आमचं डोकं तापलेलं असतं. बाहेर बोलतां येत नाहीं. घरीं बेऊन ओकतों तेव्हां बरं वाटतं. मोकळं वाटतं. आम्हांला सहानुभूति पाहिजे असते. आमचा अहंकार तुम्ही फुलवावा असं वाटतं. हल्लींच्या धकाधकीच्या मामल्यांत त्याची कितीतरी जरूरी आहे! आम्ही अधिकारी असूं. आमच्या भोंवतालचा मोठेपणाचा पसारा तुम्हाला दिसतो. पण–पण आम्ही एकलकोंडे असतों." शामराव तणतणत पण असाह्यतेनें बोलत होते.

"तुम्हाला हें समजायला पाहिजे कीं, पुरुषाला अशा वेळीं सहानुभूति पाहिजे. ऐकणारा हवा असतो. सल्ला, मत देणारा नको असतो." शामरावांची बाजू वामनरावांनीं मांडली.

"आमच्या मंदाला हें बरोबर माहीत आहे," मीं तिच्याकडे पहात म्हटलं.

"पुरुषाला स्थैर्य आणणें हें आदर्श स्त्रीचं मुख्य कार्यच आहे," मंदा मला साथ करीत म्हणाली.

केवळ स्थैर्य आणणं एवढंच कार्य नव्हे, तर समाजांत त्याच्याबद्दल बरं बोललं जाईल असा मोठ्या खुबीनं प्रचारहि




केला पाहिजे. पुष्कळदां ह्यांना ज्या गोष्टी बोलणं, करणं अडचणीचं असतं त्या आपल्याला करतां आल्या पाहिजेत.

तसें करावयाचें म्हणजे समाजाच्या सर्व थरांत सहजतेनें आपल्याला हिंडतां फिरतां आलं पाहिजे. तितकं वाचन पाहिजे. चार–चौघांत बसलं असतांना ऐकण्याचें काम तर करायचंच; पण त्याबरोबर संभाषणांत भागहि घेतला पाहिजे. आपल्या घराण्याचा बडेजाव न माजवतां, आपल्या बौद्धिक सामर्थ्याचा देखावा न करतां, आपल्या भोंवतालचं वातावरण खेळीमेळीचं, मोकळं करण्याची कला साधली पाहिजे. पुरुषांबरोबर कुठंहि गेलं तरी तेथें सहजतेनें वागण्याची कला हस्तगत केली पाहिजे.

पुरुषाचं भवितव्य त्याच्या पत्नीच्या हातांत कितीतरी असतं!

---

## रॉकफेलर फौंडिशनचा अहवाल

न्यूयॉर्कमधील रॉकफेलर फौंडेशन ह्या संस्थेचा १९५० व १९५१ सालचा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. ह्या दोन वर्षांत संस्थेनें ३ कोटी डॉलर्सपेक्षाहि अधिक रक्कम सार्वजनिक आरोग्य, पदार्थविज्ञान शास्त्र आणि सामाजिक शास्त्रें ह्या विषयांत संशोधन करण्यासाठी देणगीच्या रूपानें दिली आहे. ही मदत जगाच्या सर्व भागांना देण्यांत आलेली आहे. १९५० सालापूर्वी रशिया, चीन व जपान ह्या देशांच्या संस्कृतीचा अभ्यास करण्यावर विशेष जोर देण्यांत आला होता. परंतु आतां हिंदुस्थान, पाकिस्तान, आग्नेय आशिया, इत्यादि पौर्वात्य देशांच्या संस्कृतींचा अभ्यास करण्यावर अधिक लक्ष देण्यांत येत आहे. ह्या नवीन धोरणाचीं उदाहरणें म्हणून दोन देणग्यांचा निर्देश करण्यांत आला आहे. पैकीं एक ३,२५,००० डॉलर्सची देणगी न्यूयॉर्क संस्थानांतील कॉर्नेल विद्यापीठाला देण्यांत आली असून दुसरी कॅनडामधील मॅक्गिल विद्यापीठाला दिली आहे. कॉर्नेल विद्यापीठानें आग्नेय-आशिआचा सांस्कृतिक अभ्यास करावयाचा असून मॅक्गिल विद्यापीठानें इस्लामी संस्कृतीचा अभ्यास करावयाचा आहे. आशिया व जवळच्या पूर्वेकडील देशांतील आरोग्याकडे व शास्त्रीय प्रगतीकडे अहवालांत अधिक लक्ष देण्यांत आल्याचें दिसतें. भारतांत आणि इजिप्तमध्यें निरनिराळ्या रोगांच्या लसींचा अभ्यास करण्यासाठी २,००,००० डॉलर्स खर्च करण्यांत यावयाचे आहेत. त्याशिवाय म्हैसूरमधील मलेरिआसंबंधीं संशोधन व्हावें म्हणून १७,००० डॉलर्स देण्यांत येणार आहेत. पुण्याच्या गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स ह्या संस्थेला २३,००० डॉलर्सची देणगी देण्यांत आली आहे. जवळच्या पूर्वेकडील देशांमधील देशांत जमिनीचा उपयोग कसा करण्यांत येतो त्याचा अभ्यास करण्यासाठी ११,४५० डॉलर्सची मदत देण्यांत येणार आहे. कॉर्नेल विद्यापीठातर्फे आग्नेय–आशियासंबंधी जो अभ्यास करण्यांत येणार आहे, त्याचें क्षेत्र बरेंच व्यापक आहे. आग्नेय आशियांत जे तांत्रिक आणि आर्थिक बदल घडून येत आहेत त्यांचा तेथील लोकांच्या जीवनावर काय परिणाम झाला आहे, अमेरिकेतर्फे आणि संयुक्त–राष्ट्रसंघटनेतर्फे तेथील लोकांना जी मदत मिळत आहे तिचा स्थानिक राजकारणावर काय परिणाम झाला आहे आणि आग्नेय–आशियांत अल्पसंख्य गट म्हणून नांदणारे चिनी व भारतीय नागरिक ह्यांचें तेथें काय स्थान आहे इत्यादि विषय अभ्यासाच्या कक्षेंत सामील करण्यांत आले आहेत.


दी पेण तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ, लि.

पेण, जि. कुलाबा

स्थापना तारीख २५-४-४५

नवीन वर्ष व दिवाळी संघाच्या शेतकरी व नागरिक सभासदांना व हितचिंतकांना उत्कर्षाची जावो.

ना. ल. आघारकर — मॅनेजर

ग. ह. मनोहर — चेअरमन

खास दिवाळीकरितां




—: सुगंधी उटणें, तेलें :—

कडबोळ्याची व चकलीची भाजणी वापरा.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★

दुकानें—मुगभाट, ठाकूरद्वार, दादर, कोट, परळ

—द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें—

[ सरकारमान्य ]

नाशिक मोटार ड्रायव्हिंग —स्कूल—

स्वस्त दरांत व अल्प मुदतींत

मालट्रक, टूरिंग, लाईटविकल, स्टेशन वॅगनचें शिक्षण दिलें जाईल.

पत्ता:—जी. बी. सातपुते

४२२ वकीलवाडी, नाशिक.

# लोकशाही आणि सहकारी संस्था

( लेखक:— य. दृ. खोले )

अलिकडे सहकारी संस्था लोकशाही पद्धतीवर चालल्या जात नाहींत असा एक प्रवाद बऱ्याच ठिकाणीं ऐकूं येतो आणि हा प्रवाद मुख्यत: निवडणुकीच्या हंगामांतच ऐकूं येतो. या दृष्टीनें विचार करतां लोकशाही पद्धत म्हणजे काय व त्यांतील किती तत्त्वें व कोणत्या मर्यादेपर्यंत तीं आर्थिक व्यवहार करणाऱ्या संस्थेत अमलांत आणावीं हा विचाराचा प्रश्न आहे.

### लोकशाही म्हणजे काय ?

देशांतील राज्यव्यवस्था व ज्यांचेवर राजकीय सत्ता चालवावयाची त्यांना राज्यकारभारांत योग्य प्रमाणांत जबाबदारी मिळावी हा आधुनिक विचारांचा प्रवाह सुरू होऊन बराच काळ लोटला. जगाच्या अगदीं प्राथमिक अवस्थेंत ज्यावेळीं गटागटानें वसाहती करून राहत त्यावेळीं गट–प्रमुख नेमून त्या त्या नियंत्रणाखालीं वसाहती चालत व वसाहतीच्या संरक्षणासाठीं व स्वास्थ्यासाठीं योजना तयार कराव्या लागून त्याकरितां आर्थिक जबाबदारीहि वसाहतींतील लोकांना पत्करावी लागली. पुढें पुढें हे गट प्रमुख सत्तेच्या अभिलाषामुळें व भौगोलिक विस्तारासाठीं लढाया करीत व त्यामुळें राज्यविस्तार झाला. राज्यकारभारासाठीं ते कांहीं प्रमुख दरबारी लोकांचा सल्ला घेत परंतु हा सल्ला सामान्य जनतेच्या दृष्टीनेंच असे, असें नाहीं व त्यामुळें सामान्य जनतेस राज्यकारभारांत आपणांस कांहीं स्थान आहे असें वाटत नसे. त्यांतच राज्यकर्ते सर्वसाधारण जनतेच्या विचारप्रवाहाविरुद्ध वागावयास लागले व त्यावेळीं सत्तासंघर्षासाठीं कटकटी निर्माण झाल्या व जनतेनें आपल्या हक्कांची सनद तयार करून ती कित्येक राज्यकर्त्यांकडून मान्य करून घेतली.

### लोकशाहीचीं तत्त्वें

राज्यव्यवस्था अगर देशांतील सरकार हें प्रस्थापित सरकार असतें व तेथील प्रत्येक नागरिक हा त्या देशाचा सत्तेचा सभासद समजला जातो. सर्व समाजाच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक व संरक्षणाची जबाबदारी राज्यसरकारच्या नेत्यावर असते व त्यामुळें तो कारभार कित्येक वेळां अगदीं कडक रीतीनेंहि करणें जरूर असतें. एकतंत्री राज्यव्यवस्था ही आधुनिक काळांत वर्ज्य अशी समजली जाऊन त्याऐवजीं ज्या कारभारांत देशांतील प्रत्येक विचारी व्यक्तीस आपले विचार स्पष्टपणें व निर्भयपणें मांडतां येतात अशी लोकशाही पद्धत अंमलांत आणली गेली आहे. लोकशाहीमध्यें मुख्यत: विचारस्वातंत्र्य, आर्थिकस्वातंत्र्य व राजकीय स्वातंत्र्य असतें; ही त्याची कसोटी मानली जाते. सर्वच व्यक्तींना दैनंदिन राज्यकारभारांत लक्ष घालणें शक्य नसल्यानें त्यांचे प्रतिनिधीमार्फत हा कारभार चालला जातो. ही प्रतिनिधींची निवड ज्यांना आपलें हित कळतें अशा मतदारांकडून केली जाते. मतदार विधिमंडळ निवडतें व त्यांतून मंत्रिमंडळ निवडलें जाऊन मंत्रिमंडळ राज्यकारभार अधिकाऱ्यामार्फत चालवितें. राजकीय विचारांची जसजशी प्रगति झाली तसतसे संघटित पक्ष अस्तित्वांत आले. राजकीय पक्षांना राज्यकारभारांत योग्य स्थान शास्त्रीय दृष्टीनें मिळण्यासाठीं निवडणुकीचे मतदानामध्यें योग्य ते फेरफार करण्यांत आले.

सहकारी संस्था यांचा विचार करतां त्या स्वतंत्रपणें व आपखुषीनें व्यक्तींची कार्यविषय घटना करतात व ती विशिष्ट हेतूनें अस्तित्वांत आलेली असते. समाजाच्या एकाच आर्थिक पातळीवर व समान अडचणींच्या लोकांनीं एकत्रित येऊन सर्वांच्या सहाय्यानें त्या अडचणी दूर करणें हा सहकार्याचा मूळ हेतु. आणि या दृष्टीनें कोठलीहि सहकारी संस्था स्थापन करतांना त्यांतील व्यक्तीचा विचार, त्यांची आर्थिक परिस्थिति, याचा विचार प्रथम केला जातो. सहकारी संस्था ही सर्व समाजघटकावर अव्याहतपणें आपली सत्ता चालवीत नाहीं, तर जी व्यक्ति आपखुषीनें संस्थेची सभासद होते व जो काळपर्यंत ती त्या संस्थेंत राहूं शकते तोपर्यंतच त्या संस्थेचीं बंधनें त्या व्यक्तीवर असतात; आणि म्हणून कोणा व्यक्तीस सभासद करून घ्यावयाचे अगर कसें याचा अधिकार त्या संस्थांकडे असतो.

### सहकारी संस्थांचे उद्देश

सहकारी संस्था या मुख्यत: अर्थप्रधान व्यवहार करणाऱ्या आहेत, यामध्यें प्रत्येकास समान हक्क आहेत, व संस्थेच्या कारभारासंबंधीं त्यास माहिती मागण्याचा व त्या कारभारावर टीका करण्याचा हक्क आहे. इतके असूनही जर राज्यव्यवस्थेंतील परिस्थितीमुळें जसे अल्पसंख्याक लोकांना प्रतिनिधित्व असावें, तसे जर अशा संस्थेंत वावयाचे तर ती हास्यास्पद गोष्ट होईल. सहकारी संस्था ज्या ठिकाणीं अडचणींत असलेल्या समाजाच्या एकाच पातळींतील व्यक्तींच्या असतांना तेथें बहुमत व अल्पमत असणें योग्य नाहीं. केवळ कांहीं व्यक्तींना अधिकारलालसा उत्पन्न होऊन त्यासाठीं सहकारी चळवळींत केवळ निवडणुकीपुरती सर्व प्रकारच्या लोकशाहीचीं तत्त्वें अंमलांत आणण्याचा प्रयत्न करण्याचा आव आणणें हास्यापद आहे, असें वाटतें. सहकारी चळवळ प्रभावी होऊन तिची पद्धत व छाप लोकशाही राज्यकारभारावर कशी पडेल असा विचार सहकारी कार्यकर्त्यांनीं करावयास पाहिजे. आपलेकडे आजकाल ही लोकशाही विचारपद्धति मुख्यत्वेंकरून कांहीं मूठभर सहकारी म्हणविणाऱ्या कार्यकर्त्यांमध्यें इतकी संचरते कीं, त्यांना स्वत:चें स्थानासाठीं सहकारी चळवळींत लोकशाही राहिली नाहीं असें वाटून ते त्याप्रमाणें टीकाही करतात.

### समारोप

सहकारी चळवळ ही मुख्यत: आर्थिक व्यवहार करणारी संस्था असल्यानें व सध्यांची एकंदर फुटीर वृत्ति लक्षांत घेतां केवळ निवडणुकीपुरतें एकत्र येऊन त्यांनीं सहकारी चळवळींत लोकशाही नाहीं असें म्हणून तीस लोकशाही पद्धतीचा मुलामा चढविण्याचा प्रयत्न करणें अयोग्य आहे. राजकीय सत्तेच्या बाबतच्या लोकशाहीच्या कल्पना अगर तत्त्वें तंतोतंत सहकारी चळवळीस लागूं करणें हे श्रेयस्करहि नाहीं. कारण, सहकारी चळवळींत समाविष्ट होणारा सभासद हा गरजू असतो व तो आपल्या परिस्थितींतील समाजघटकांशीं सहकार्य करून आपली व इतरांची उन्नति करण्याचा प्रयत्न करतो. सहकारी चळवळीची छाप जर राजकीय सत्तेवर पडावयाची असेल तर सर्व कारभार आर्थिक समतेवर चालविला जाईल, असा दाव सहकारी कार्यकर्त्यांनीं आणला पाहिजे. ज्या लोकशाही-प्रधान संस्था असतात त्यांचे कार्यकारी मंडळांत शक्य तेवढा एकोपा करून काम करणें आणि तें करीत असतां निश्चियात्मक व स्पष्ट निर्णय घेणें व ते घेत असतां कांहीं जणांची अप्रियता पत्करणें हें मात्र प्राप्त आहे.

# विक्रेत्याची गिऱ्हाइकाशीं वागणूक

*विक्रेत्यानें माल विक्रीत असतां पाळावयाचीं पथ्यें व कुपथ्यें येथें ग्रथित केलीं आहेत. हीं पथ्यें व कुपथ्यें विक्रेत्या-बरोबर मालाचे कारखानदार व एजंट यांनाही लागू होण्यासारखीं आहेत.*

(१) गिऱ्हाइकाचें स्वागत करा. तुमच्या दुकानाचे दारांतून आंत प्रवेश करणारें गिऱ्हाईक ही फार मोलाची आसामी आहे याची जाणीव ठेवा. आलल्या गिऱ्हाइकाला स्वतःला याची जाणीव असते. म्हणून ही जाणीव तुम्हांला आहे हें त्या गिऱ्हाइकाला कळूं द्या.

(२) नीटनेटका पोषाक करा. तुमचें गिऱ्हाइक तुमच्या पोषाकावरून तुमचा व तुमच्या दुकानचा नूर ओळखतें, आणि गचाळ पोषाकाचें कारण तुमच्या मालांत असल्याचा त्याचा समज होतो.

(३) मालाच्या ऑर्डरींची विचारणा नेटानें, आग्रहानें करा; सनपट्टीस बसून हट्टानें नको. ही आर्डरींची विचारणा त्वरित आणि पुनः पुनः करा. मालाचा सौदा संपण्यापूर्वीं सर्व कांहीं बोलून टाकूं नका. गिऱ्हाइकानें माल घेण्यास नकार दिला तर तुम्हांला कांहींच बोलतां येणार नाहीं. म्हणून ह्या बोलण्याच्या डावांतले कांहीं हुकमी एक्के हातचे म्हणून राखून ठेवा.

(४) गिऱ्हाइकाला मालाबद्दल मार्गदर्शन करा. गिऱ्हाईक आल्याबरोबर सुरुवातीला फाजील बोलूं नका. उलट तें काय बोलेल तें नीट कान देऊन ऐका. गिऱ्हाइकाची गरज पुरती समजून घेतल्याशिवाय विक्रीवाद करूं नका.

(५) गिऱ्हाइकासमोर तुमचे दोन्ही हात कोटाचे अगर विजारींचे खिशांत घालून बोलूं नका. ते पूर्णपणें मोकळे ठेवा आणि त्यांचा भरपूर उपयोग मालाचे निदर्शनाकडे, माल उचलण्याकडे अगर मालाचें वर्णन करण्याकडे करा. विशेषतः पोपटपंची करणाऱ्या, बडबड्या गिऱ्हाइकाशी फार बोलून भागत नाहीं. येथें तुम्हांला त्या मोकळया हातांचा फार उपयोग होईल.

(६) नकारार्थी भाषा वर्ज करा—"साहेब हें तुम्हांला पसंत नसेल" अगर "मला त्याचें महत्त्व वाटत नाहीं" अशीं अगर त्या धर्तीचीं नकारात्मक वाक्यें गिऱ्हाइकासमोर उच्चारूं नका. नकारात्मक वाक्यांचा डोस आलेल्या गिऱ्हाइकाला देऊं नका. मालाची विक्री परिणामकारक होण्यासाठी नेहमीं होकारार्थी भाषा चालू ठेवा.

(७) समान भूमिकेवरून गिऱ्हाइकाशी बोला. तुम्हांला मालाचें तांत्रिक ज्ञान विशेष आहे म्हणून गर्वानें फुगून जाऊन लाक्षणिक भाषेंत गिऱ्हाइकाशीं बोलूं नका. त्यानें गिऱ्हाईक गोंधळून जाईल व तुम्ही मालाचे विक्रीस मुकाल. सरळ सोप्या भाषेंत बोला.

(८) आपल्याच दुकानाबद्दल अगर कारखान्याबद्दल गिऱ्हाइकाशी बोलतांना दुसऱ्यावर टीका करूं नका. तुमच्या दुकानाबद्दल व दुकानचे मालाबद्दल गिऱ्हाइकांत विश्वास उत्पन्न करा. नाहीं तर साहजिकच तें गिऱ्हाइक दुसरीकडे खरेदीसाठी जाईल.

(९) माल दाखवतांना रडतराऊ अगर दुर्मुखलेल्या चेहेऱ्यानें काउंटरमागें उभे राहूं नका. माल दाखवतांना उत्साह निर्माण करणें असल्यास त्या उत्साहाचें प्रथम प्रदर्शन करा. जें तुमच्याजवळ अजिबात नाहीं तें तुम्ही दुसऱ्याला देणार कोठून? म्हणून तुम्ही उत्साहानें विक्री करण्यास शिका आणि हा उत्साह जर तुमचेजवळ नसेल तर तुम्ही मालाची विक्री न केलेलीच बरी.

(१०) तुमच्या स्वतःच्या वाईट सवईमुळें अगर खोड्यांमुळें गिऱ्हाइक बिथरेल असें कांहीं करूं नका. दुकानांत येण्यापूर्वीं याची जाणीव ठेवून काउंटरमागें उभे रहा व गिऱ्हाइकाशी जें बोलाल तें नीट विचार करून बोला. दरेक शब्दाचा हत्यारांसारखा उपयोग करा व हीं शाब्दिक हत्यारें बोथट होणार नाहींत याची काळजी घ्या.

(११) तुमचें चित्तस्वास्थ्य बिघडूं देऊं नका. कधीं कधीं आलेलें गिऱ्हाईक ताप देणारें असतें. त्यामुळें भडकूं नका. संयमानें चित्त ठिकाणावर आणा. अशा ताप देणाऱ्या गिऱ्हाइकाचे खिशांतील पैसा बाहेर काढण्यासाठी व तुमचें संत्रस्त मन शांत करण्यासाठी मालाचा सौदा सुकर होईल अशीच तुमची वागणूक ठेवा.

(१२) गिऱ्हाइकाचे खिशांवर टप्पू मारून पैसे बाहेर काढायचे नसतात. सूज्ञ विक्रेता मनपसंत विक्रीवाद करून गिऱ्हाइकाला खिशांतले पैसे काऊंटरवर खुषीनें काढायला लावतो.

(१३) माल विक्रीत असतां विक्रेत्यानें परिस्थितिनुरूप हंसण्यांत धोका नाहीं. उलट तें हंसणें त्याला खुलूनच दिसतें. आनंदमय हास्य संसर्गजन्य असतें. तुम्ही जें देतां तेंच तुम्ही घेतां. अशा वेळीं तुमचें हास्य गिऱ्हाइकापाशी होणाऱ्या व्यवहाराची किंमत तुम्हांला आहे, हेंच नेमकें दाखवतें.

(१४) सौजन्ययुक्त वागणूक ही तर तुम्हांला गिऱ्हाइकाला फुकट देता येते. त्याबद्दल तुम्हांला कांहींच खर्च येत नाहीं. सभ्यतेच्या, शिष्टाचाराच्या वागणुकीपेक्षाही त्याची किंमत जास्त आहे. कारण, सौजन्ययुक्त वागणूक म्हणजेच मालाची विक्री. जो विक्रेता सौजन्ययुक्त वागणुकीचा उपयोग कसा करावयाचा हें जाणतो तो आपल्या श्रमाची किंमत नेहमींच नगद घेतो. त्याची सौजन्ययुक्त वागणूक म्हणजेच मालाची रोख विक्री.

तात्पर्य काय, कीं तुमच्या मालाची विक्री करतांना तुमची आक्रमक चढाई झाली पाहिजे व त्याचबरोबर विक्री करतांना प्रत्येक गिऱ्हाईक समाधानी ठेवलें पाहिजे.

हिन्द फिनॅन्स, इंडस्ट्रीज ॲण्ड इन्व्हेस्टमेंट, लि०
धनवटे चेंबर्स, सिताबर्डी, नागपूर १
(इंडियन कंपनीज् ॲक्टान्वयें नोंदलेली)
स्थापना : ५ एप्रिल, १९५१
पहिल्या वर्षाच्या नफ्यांतून कर वजा
४ टक्के डिव्हिडंड वाटणार
कंपनी सभासदांकडून मुदती, बचती व भविष्य
सहाय्यक निधी ठेवी स्वीकारते.
व्याजाचे दर आकर्षक :: सविस्तर माहिती पत्रद्वारें
भोंसुले, श्रोती आणि कंपनी,
मॅनेजिंग एजंटस्.

# ब्रिटनमधील जीवन

## लोककल्याणकारी राज्यांत आर्थिक विषमता कमी होणें आवश्यक

( लेखकः—प्रा. स. वा. कोगेकर, बी. एस्‌सी., लंडन )

महायुद्धांतील प्रत्यक्ष नुकसानी व साम्राज्याचें आकुंचन यामुळें युद्धोत्तर ब्रिटनची आर्थिक परिस्थिति बरीच खालावली असल्याचें प्रसिद्धच आहे. जगांतील बलाढ्य राष्ट्रांत ब्रिटनला पूर्वीचें स्थान राहिलेलें नाहीं; त्याचा दर्जा दुय्यम झाला आहे ही गोष्टहि आतां सर्वमान्य झाली आहे. परंतु आपल्याकडे यासंबंधीं जी माहिती प्रसिद्ध झाली आहे किंवा होते तीवरून ब्रिटनच्या दारुण विकलावस्थेची जी कल्पना मनांत येते ती प्रत्यक्षांत तितकीशी बरोबर नसल्याचें माझ्या दृष्टोत्पत्तीस आलें.

गेल्या मार्च–एप्रिलमध्यें एका शास्त्रीय परिषदेच्या निमित्तानें ब्रिटनला पुनः जाण्याचा योग आला व ५।६ आठवडे तेथील जीवनक्रमाचें प्रत्यक्ष निरीक्षण करण्याची संधि मिळाली. ब्रिटनच्या कंगालपणाचें जें चित्र मनांत रंगलें होतें, त्याहून अगदीं भिन्न अशा वातावरणांत पाऊल टाकल्यासारखें त्यावेळीं वाटलें. रोजगार भरपूर, घरें स्वच्छ, नीटनेटकीं, नवीन बांधकाम पुष्कळ झालेलें, कपड्याचें दुर्भिक्ष नाहीं, सामाजिक सोयींत प्रचंड भर व एकंदर उत्साहाचें वातावरण दृष्टीस पडलें. किंमती वाढलेल्या होत्या हें खरें; पण त्या मानानें उत्पन्नांतहि वाढ झालेली होती, व विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे नियंत्रणें–वांटप–खरेदी-कर यांच्या यंत्रणेमुळें दैनंदिन गरजेच्या वस्तू प्रत्येकाच्या आटोक्यांत आणून ठेवलेल्या होत्या. दूध–पुरवठा, शिक्षण, आरोग्य, इत्यादींत तर वाखाणण्यासारखी प्रगति झालेली दिसली. नाहीं म्हणावयास अन्नपदार्थांचा तुटवडा होता परंतु पूरक अन्नाची रेलचेल असल्यामुळें 'जगण्याचीच भ्रांत' अशी परिस्थिति नव्हती. युद्ध संपतांच चर्चिल–सरकारऐवजीं मजूर सरकारला पाठिंबा देण्यांत ब्रिटिश नागरिकांनीं जें धैर्य प्रगट केलें त्याचें फळ त्यांना भरपूर प्रमाणांत मिळालें, असेंच म्हटलें पाहिजे. पूर्वी ऐषआरामी जीवनाला सरावलेल्या बड्या लाटांची मात्र आतां तिरपीट झाली आहे. प्राप्तीवरील कर व वस्तूंवरील खरेदी-कर हे अशा जबरदस्त प्रमाणांतील चढत्या श्रेणीनें लादलेले आहेत, कीं कितीहि मोठें उत्पन्न झालें तरी प्रत्यक्ष उपभोग करतांना त्यांतील फारच थोडें हातीं लागावें! 'लोककल्याणकारी' (वेल्फेअर) राज्यांत आर्थिक विषमता कमी होणें कसें आवश्यक आहे, ही गोष्ट ब्रिटनमध्यें चटकन् नजरेंत भरते. ब्रिटनमधील जनतेची राष्ट्रीय ऐक्याची भावना, सामाजिक प्रगतीच्या मार्गासंबंधीं मूलभूत ऐकमत्य, दुसऱ्यासाठी स्वतःला झीज लावून घेण्याची तयारी व शिस्तबद्ध सामाजिक जीवन यांच्या बळावरच युद्धानंतरच्या थोडक्या काळांत त्यांनीं आपली अंतर्गत घडी स्थिरस्थावरपणें बसविली. या उलट, युद्धांत पडलेल्या पश्चिम युरोपांतील राष्ट्रांत अद्यापहि आर्थिक विषमतेमुळें गांजून गेलेली जनता आढळते.


तुमच्या सर्व प्रकारच्या

**मशिनरी व प्लँटसूसाठी**

★ हिंद एजन्सीज लि. ★

शाहुपुरी, कोल्हापूर. (भारत)



**एजन्सी घ्या, पैसे मिळवा.**

सह्याद्रि विमा कं. लि., आयुष्याचा विमा घेणारी एक आदर्श संस्था. यशस्वी मूल्यमापन. विमेदारांना बोनस व भागीदारांना डिव्हिडंड. आयुष्याचा विमा या कंपनींत उतरा. एजन्सी घेऊन आपल्या उत्पन्नांत भर घाला. अधिक माहितीकरतां लिहा.

गो. ग. सौंदणकर,
मॅनेजिंग डायरेक्टर,
दि सह्याद्रि विमा कं. लि., नाशिक.



★ संपूर्ण भारतीय ★

हॉरिझाँटल, कोल्डस्टार्ट, लोस्पीड, क्रूड ऑईल

६, ९ व १२ हॉर्स-पॉवरची

**इमानी इंजीन्स**






व

इंजीनसाठीं योग्य असे मोबाइल व ग्रीससाठीं

दक्षिण भारताचे प्रमुख एजंटः- **दि युनिव्हर्सल एजन्सी**

इचलकरंजी जि. कोल्हापूर.

शोरूम्सः– सोलापूर व कोल्हापूर (भारत)



फो. नं. ४२४८४ [ तार : माधवाश्रम, बॉम्बे

**माधवाश्रम लि.**

**भोजनाची व रहाण्याची उत्कृष्ट सोय**

तसेंच ★ उपाहाराची खुल्या बगीच्यांत व्यवस्था.

★ विवाह-कार्याची थोड्या खर्चांत सर्व प्रकारची उत्तम सोय.

★ कुटुंबासह रहाणारांसाठीं स्वतंत्र खोल्या.

—माधवाश्रम लि., गिरगांव मुंबई ४—

## द. सातारा जि. मध्यवर्ती सहकारी बँक, लि., सांगली. अध्यक्ष, श्री. आर. बी. आरवाडे, चेअरमन,

# ह्यांचें भाषण

(ता. ३०-९-५२)

हिंदुस्थान हा शेतीप्रधान देश आहे. येथील बहुसंख्य जनता शेतकरी असून ती दारिद्र्य व कर्जबाजारीपणा या दोहोंनी पूर्वीपासून ग्रासलेली आहे; आपलें काँग्रेस सरकार सत्तारूढ झाल्यानंतर बरेचसे निरनिराळे उपयुक्त कायदे करून त्यांना यांतून सोडविण्यासाठी पुष्कळसे स्तुत्य प्रयत्न करीत आहे. आपणां सर्वांचे जीवन निसर्गाच्या लहरी स्वभावावर नेहमीच अवलंबून असलेमुळें दुष्काळाचे धक्के वरचेवर आपणांस बसत आहेत, त्यामुळें आर्थिक विषमतेची कठिण समस्या दिवसेंदिवस अधिकाधिकच भेसूरपणानें भेडसावीत आहे. अशा प्रकारच्या संघर्षांपासूनच क्रांति निर्माण होत असते. या सर्व संकटांस व संघर्षांस धैर्यानें व दृढनिश्चयानें तोंड देण्यासाठी एकच मार्ग खुला आहे; तो म्हणजे निर्भेळ सहकार्य व स्पर्धारहित अर्थरचना होय. त्या सहकार्यानेंच आर्थिक समानता व सामाजिक समता निर्माण होण्याची शक्यता आहे. अशा प्रकारें क्रांतीचें मूळच नाहींसें झाल्यानंतर जगांत अंतिम सुख, समृद्धि व शांति यांचें साम्राज्य स्थापन होईल. सहकार्य हा एक महामंत्र आहे, ही एक संजीवनी मात्रा आहे, सहकार्यावांचून जीवन नाहीं. सहकार्य नसेल तर सर्वनाश हा ठरलेलाच आहे. म्हणून या सहकार्याच्या निशाणाखालीं आपण सर्वांनीं एकत्र येणें अत्यंत जरूर आहे.

स्वराज्य मिळाल्यानंतर आपल्या लोकप्रिय सरकारनें नव्या घटनेमध्यें "सहकारी संघराज्य" निर्माण करण्याचें ध्येय एकमुखानें जाहीर केलें आहे. त्याप्रमाणें आर्थिक समानता व सामाजिक समता, सत्य, अहिंसेच्या मार्गानें प्रस्थापित करून सहकारी संघराज्य स्थापन करण्याचे प्रयत्न चालू आहेत. आर्थिक, सामाजिक, राजकीय, नैतिक, वगैरे सर्व दृष्टीनें प्रत्येक खेडें स्वतंत्र व प्रतिष्ठित घटक बनवून त्यांची सर्वांगीण उन्नति करणें, हें सरकारचें उद्दिष्ट आहे आणि तेंच सहकार्याचें ध्येय आहे.

ता. १२ ऑगष्ट १९४८ ला, स्वराज्यप्राप्तीनंतर सर्व दाक्षिणी संस्थानें विलीन झाल्यामुळें आपला हा दक्षिण सातारा जिल्हा ता. १-८-४९ ला नव्यानेंच जन्मास आला. या जिल्ह्यांत ५ तालुके व १ महाल असून एकूण ५३३ गांवें आहेत. लोकसंख्या सुमारें ८ लाख असून सोसायट्या ५५६ आहेत. सहकारी चळवळीचा या जिल्ह्यांत अद्याप प्रगति होण्यास बराच वाव आहे. मात्र झालेली प्रगति समाधानकारक आहे यांत मुळींच प्रत्यवाय नाहीं.

ही बँक सन १९२७ सालीं स्थापन झाली आहे. तिच्या कार्यक्षेत्रांत ३ तालुके असून एकूण १६८ सहकारी संस्था येतात. जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या आर्थिक गरजा भागविणें हा तिचा मुख्य उद्देश आहे. नवीन घटनेप्रमाणें चौकशी कमेटीच्या शिफारसी स्वीकारल्यानंतर सहकारी आर्थिक सहाय्य उपलब्ध झाल्यामुळें शेतकऱ्यांच्या गरजा भागविणें आतां सुलभ होऊं लागलें आहे.

--या वर्षी शेती-मालतारणावर कर्जे देण्याचें आम्हीं सुरू केलें आहे. येथून पुढें हा व्यवहार वाढत्या प्रमाणांत होईल अशी आशा वाटते. या वर्षी आकस्मिक आलेल्या मंदीच्या लाटेमुळें बऱ्याचशा बँकांस धक्के बसले असले तरी पण आम्हाला ही मंदी कांहीं जाणवली नाहीं. सर्व प्रकारच्या तरतुदी करूनही आपल्या बँकेस गेल्या वर्षाइतका नफा झाला आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. बँकेस नुकतीच २५ वर्षे पूर्ण झाल्यामुळें रौप्य-महोत्सव लवकरच करावयाचा आहे.


## दि पेण को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि.

स्थापना ] [ सन १९३५

पेण, जि. कुलाबा

आमचेकडे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

"पोस्ट ऑफिस नॅशनल सेव्हिंग सर्टिफिकेटस्" करतां सरकारतर्फे या बँकेला अधिकृत एजंट म्हणून नेमले आहे; त्याचा सर्वांनीं फायदा घ्यावा.

रा. गो. भावे, बी. एजी. — मॅनेजिंग डायरेक्टर.

ना. य. नेने — चेअरमन

## श्रीलक्ष्मी सं. को-बँक, लि., फलटण

(स्थापना-१।२।१९२६)

| | |
|---|---|
| भागांचें वसूल भांडवल | रु. १,१०,००० वर |
| गंगाजळी व इतर निधि | रु. १,२०,००० वर |
| ठेवी | रु. १२,००,००० वर |
| खेळतें भांडवल | रु. १७,००,००० वर |

**ठेवी**—करंट, सेव्हिंग्ज व मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात.

**कर्जें**—फलटण तालुक्यांत सहकारी पतपेढ्यांना कर्जें देण्यांत येतात. दिलेलें कर्ज रु. ११,५०,००० चे वर आहे.

**व्यवहार**—बँकिंगचे सर्व व्यवहार होतात. ही बँक **मुंबई प्रांतिक सहकारी बँक, लि.,** हीस जोडलेली असून, तिच्याकडून व **रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया,** मुंबईकडून आवश्यक तो भांडवलाचा पुरवठा होण्याची सोय झालेली आहे.

चौकशी समक्ष अगर पत्रद्वारें व्हावी.

श्री. ह. तळवलकर, A. C. R. A., व्यवस्थापक.

वि. शं. झिरपे, B. A., LL. B., अध्यक्ष.

१०।१०।५२

### भुईमुगाच्या

# शेंगाचा सीझन सुरू झाला!

**आपणांस लागणाऱ्या पॉवरवर अगर हातानें चालणाऱ्या लहानमोठ्या शेंगा फोडण्याच्या यंत्रांची ऑर्डर आजच नोंदवा—**

## भिडे अँण्ड सन्स

शिवाजीनगर, सांगली.

[ पिठाच्या चक्क्या व शेतीउपयोगी यंत्रांचे प्रमुख कारखानदार ]

# दुष्काळ-निवारण

## पूर्वानुभवावरून काय शिकावयाचें ?

( लेखक:—न. स. जोशी, बी. ई. ( सिव्हिल ), एम. आय. ई. ( इं. ), एम. आर. सॅन. आय. ( लंडन ),
सेवानिवृत्त सुपरिंटेंडिंग इंजिनीअर, मुंबई प. व. खातें. )

*" पूर्ण दुष्काळी वा निमदुष्काळी परिस्थिति निर्माण होते ती धान्य नाहीं किंवा कमी म्हणून नव्हे; तर गरीब जनतेस तें विकत घेण्याची ताकदच नसते म्हणून ".*

नामदार डॉ. पंजाबराव देशमुख.

### प्रारंभिक

एखादा नवा उपक्रम करतांना पूर्वानुभव नसतो व अशा वेळीं हातीं असलेल्या माहितीवरच किंवा निवळ कल्पनांवर विसंबून रहावें लागतें व सुचतील ते उपाय करावे लागतात. पण ते उपाय अमलांत आणून कांहीं वर्षे लोटल्यावर, ते इलाज उपयुक्त व टिकाऊ ठरतील कीं नाहीं व नसल्यास पूर्वीच्या निदानांत वा उपचारांत काय दोष आढळले व काय फरक करावयास पाहिजेत याचा विचार व्यक्तींनीं वा समाजानें करणें आवश्यक असतें. तसें न केल्यामुळें दुष्काळ-निवारणाच्या बाबतींत कशी चमत्कारिक परिस्थिति झाली आहे तें सोदाहरण या लेखांत दाखविले आहे.

यंदां जून ते सप्टेंबर या चार महिन्यांत पाऊस अपेक्षेपेक्षा व सरासरीपेक्षा फारच कमी पडल्यानें दुष्काळाची छाया मुंबई राज्यांत सगळीकडे पडल्याच्या बातम्या सप्टेंबर महिन्यांत वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होऊं लागल्या; मराठी वर्तमानपत्रांत सोलापूर व नगर जिल्ह्यांत दुष्काळाचीं पूर्व चिन्हें दिसत असल्याच्या बातम्या अनेक वर्तमानपत्रांत बघावयास मिळाल्या, तर गुजरातेंत दुष्काळाच्या प्रतिकाराची व्यवस्था वेळींच न केली तर भलताच प्रसंग ओढवेल व उशीरानें प्रयत्न सुरू केल्यास त्यांचा उपयोग होणार नाहीं, या व अशा धोक्याच्या सूचना गुजराथी वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाल्या. विजापूर हें तर दुष्काळाचें माहेरघर म्हणून प्रसिद्ध असून तेथें व धारवाड, बेळगांवच्या पूर्व भागांतही धान्याची परिस्थिति बिकट असल्याचें प्रसिद्ध झालेंच आहे.

प्रत्येक बातमीच्या शेवटीं दुष्काळनिवारणाकरतां काय करावें याबाबत सूचना असणें योग्यच व त्या होत्याही. दुष्काळी कामें काढावींत ही सूचना सगळीकडे होतीच पण तो झाला तात्पुरता उपाय. कायमचा उपाय म्हणून अनेक सूचना केलेल्या आढळल्या व त्यांतच महाराष्ट्रांत मुळा, कुकडी वगैरे मोठ्या धरणकालव्यांच्या योजनांचा, तसेंच कोयना उत्पायन (Lift Irrigation) योजनेचा, कर्नाटकांत मलप्रभा नदीवर आसोगा येथें धरण व कालवे, तसेंच घटप्रभेवरील दड्डी धरण वगैरे बांधण्याबाबत आग्रह होता.

गुजरातेंत काकडापाडा, माही वगैरे योजनांबद्दल मागणी तर होतीच पण लहानमोठ्या उत्पादन (Lift Irrigation) ची मागणी जोरांत होती. कर्वीमधीं बारकीं धरणें व बंधारे याबाबतही सूचना होत्या. अर्थात् सर्वजण असल्या योजना हाच मुख्यत: दुष्काळनिवारणावर तोडगा असें धरूनच चालत होता.

कोणत्याहि रोगावरील उपायाबाबत तात्त्विक चर्चा करणें हा झाला एक भाग; त्यापेक्षांहि जास्ती महत्त्वाचा व उपयुक्त भाग-म्हणजे अशाच योजना पूर्वी केल्या गेल्या असल्यास त्यांचा उपयोग किती व कसा झाला याचा पडताळा घेणें हा होय. या दृष्टीनें कांहीं उदाहरणें घेऊन त्याचे आंकडे व चर्चा या लेखांत केली आहे.

### सोलापूर जिल्ह्याचें उदाहरण : कालवे व दुष्काळ

सोलापूर जिल्ह्यांतील अस्तित्वांत असलेल्या सरकारी कालव्याखालील बागाइतीचें आंकडे खालील तालिकेंत उद्धृत केलें आहेत.

| पाटबंधाऱ्याचें वा धरणाचें नांव | पिकास योग्य (Culturable) असलेले वशागत (Commanded) क्षेत्र | कालव्याचें पाणी मिळण्याचें अपेक्षित क्षेत्र | प्रत्यक्ष भिजणारें क्षेत्र |
|---|---|---|---|
| | एकर | एकर | एकर |
| म्हसवड | १,०६,००० | २५,००० | ९,००० |
| नीरा प्रकल्पाचा उजवा कालवा | ३,८०,००० | ८१,५०० | ६८,००० |
| एकरूख | १७,००० | १७,००० | ५,००० |
| कोरेगांव | २,५०० | १,००० | ७०० |
| अष्टी | १७,००० | १२,००० | ५,००० |
| पाथरी | ४,५०० | २,५०० | १,३०० |
| | ५,२७,००० | १,३९,००० | ८९,००० |

सोलापूर जिल्ह्यांतील जमिनीच्या एकूण क्षेत्राचे आंकडे खालीं दिले आहेत.

एकूण क्षेत्र ... ... ... २९,००,००० एकर
पिकास योग्य क्षेत्र ... ... २२,८२,००० एकर

वरील सोलापूर जिल्ह्याच्या आंकड्यांवरून मुंबई प्रांतांतील इतर जिल्ह्यांतील परिस्थितीशीं तुलना करण्यास योग्य असे खालील आंकडे निघतात.

$$(\text{क})\ \frac{\text{पिकांस योग्य असें कनाल वशागत क्षेत्र}}{\text{जिल्ह्यांतील पिकास योग्य एकूण क्षेत्र}} = \frac{५,२७,०००}{२२,८२,०००} = \text{शें. } २३$$

$$(\text{ख})\ \frac{\text{कनाल रक्षित ( अपेक्षित ) क्षेत्र}}{\text{जिल्ह्यांतील पिकास योग्य एकूण क्षेत्र}} = \frac{१,३९,०००}{२२,८२,०००} = \text{शें. } ६$$

$$(\text{ग})\ \frac{\text{कनालचें पाणी प्रत्यक्ष मिळणारें क्षेत्र}}{\text{जिल्ह्यांतील पिकास योग्य एकूण क्षेत्र}} = \frac{८९,०००}{२२,८२,०००} = \text{शें. } ४$$

(घ) वरील ८९,००० या आंकड्यांत मुख्यत: नीरा राइट बँक कनाल-वरील उसाच्या क्षेत्राचा आंकडा समाविष्ट आहे. एक एकर उसाचें पाणी १५-२० एकर धान्य-पिकांना पुरतें. तसें तें दिलें असतें. अर्थात् धान्य-पिकांनीं पाण्याची मागणी केली असती तर वरील ८९,००० ऐवजीं भिजलेल्या क्षेत्राचा आंकडा २,२५,००० वर त्या क्षेत्रावरून (ग) ची शेकडेवारी काढल्यास

$$\frac{\text{कनालवर होण्यासारखें धान्यपिकांचें क्षेत्र}}{\text{जिल्ह्यांतील पिकास योग्य एकूण क्षेत्र}} = \frac{२,२५,०००}{२२,८२,०००} = \text{शें. } १०$$

इतर दुष्काळी म्हणून कुविख्यात असलेल्या जिल्ह्यांतील आंकड्यांशी वरील आंकड्यांशी तुलना खालील तालिकेंतील करून दाखविली आहे.

| जिल्हा | पिकास योग्य असें जिल्ह्यांतील एकूण क्षेत्र लक्ष एकर | सरकारी कनालच्या वशागत क्षेत्र (Commanded) लक्ष एकर | सरकारी कनालचें पाणी प्रत्यक्ष मिळणारें क्षेत्र लक्ष एकर | शेंकडेवारी टक्के क* | शेंकडेवारी टक्के ग ↑ सर्व पिकें सारखीं लेखून | शेंकडेवारी टक्के ग ↑ उसाला पाणी न देतां धान्याला दिलें असतें तर |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ (अ) | ६ (आ) |
| सोलापूर | २३ | ६·३ | ०·९ | २३ | ४ | १० |
| अहमदनगर | ३२ | ३·३ | १·२ | १० | ३¾ | १३ |
| प. खानदेश | १७ | ०·२ | ०·०६ | १ | १ | १ |
| पंचमहाल | ७ | ०·०१ | ०·०० | ० | ० | ० |
| विजापूर | ३२ | ०·०५ | ०·०० | ० | ० | ० |

क* = कनाल वशागत क्षेत्र ( Commanded ) / जिल्ह्यांतील पिकास योग्य क्षेत्र

ग ↑ = कनालचें पाणी प्रत्यक्ष मिळणारें क्षेत्र / जिल्ह्यांतील पिकास योग्य क्षेत्र

विजापूर सारख्या अत्यंत दुष्काळी जिल्ह्याच्या वाट्याला सरकारी कनालच्या वशागत जमीन जिथें इतकी अल्प कीं गणितांत शेंकडेवारी लिहितांना ती शून्यानेंच दर्शविली जाते, त्याऐवजीं सोलापूर जिल्ह्याला शेंकडा २३ टक्के! तसेंच प्रत्यक्ष सरकारी कनालचें पाणी सोलापुरांत शेंकडा ४ टक्के क्षेत्राला मिळतें, तर विजापूरला शून्य टक्का. अहमदनगर जिल्ह्यांत सुद्धां कनाल वशागत व कनालचें पाणी प्रत्यक्ष मिळण्याचें प्रमाण सोलापूर इतकेंच आहे.

निरा-राइट बँक कनालच्या वशागत ( Commanded ) क्षेत्रापैकीं खुद्द सोलापूर जिल्ह्यांत असलेल्या ३,८०,००० एकरांपैकीं, ६१,०००एकरांसच कनालचें पाणी प्रत्यक्ष मिळतें. यामागील मर्म समजावून सांगणें जरूर आहे. निरा राईट बँक कॅनालमध्यें १९२५ सालीं प्रथम पाणी सोडलें व सोलापूरच्या दुष्काळी भागांतील धान्य पिकांना पाण्याची मागणी असती तर सुमारें २,००,००० एकरांना तें देतां आलें असतें; पण धान्यपिकांना पाण्याची मागणीच जुजबी व अपुरी. ( तीच स्थिति नगर जिल्ह्यांतील सरकारी कनालांची. )

जर कनालचें पाणी जेवढ्या क्षेत्रास पुरेल तितकी मागणी असती तर सोलापूर जिल्ह्यांत १० टक्के व नगर जिल्ह्यांत तर १३ टक्के धान्यपीक पाण्याखालीं भिजून ज्वारी-बाजरीचा पाऊस पडला असता. अशी मागणी असती तर आहे याच धरणावर व कालव्यावर किती धान्यपीक भिजलें असतें त्याची शेकडेवारी वरील तालिकेंत ६ (ब) या स्तंभांत दाखविली आहे.

यावर कोणी असा आक्षेप घेतील कीं सरकारला तसें करणें अशक्य झालें असतें. कारण, उसाला पाणी देऊन पाणिपट्टीचें उत्पन्न येतें तितकें धान्याला देऊन येणार नाहीं. ह्याची छाननी हा ह्या लेखाचा मुख्य उद्देश नाहीं व म्हणून त्याची खोल चर्चा येथें करीत नाहीं. परंतु इतकेंच नमूद केलें म्हणजे पुरें कीं वरील विधान सपशेल खोटें आहे. धान्यपिकांना सालोसाल मागणी पाणिपुरवठ्याच्या मानानें मिळाली तर ऊंस करून मिळणाऱ्या पाणीपट्टीपेक्षां धान्यावर मिळालेली पाणीपट्टी सुमारें ३३ टक्के ( तरी ) जास्तो मिळेल ( पूर्वींचे दर दोहोंनाही लावले तरी, किंवा चालूं दर दोन्ही पिकांना लावले तरी ). पण मुख्य अडचण हीच कीं, पाणीपुरवठ्याच्या मानानें धान्यपिकांस ( जमीन व पाणी भरपूर असूनही ) सालोसाल मागणीच नाहीं. इतकेंच नव्हे तर बागाईतदारांकडूनही उसासुद्धां मागणी येईना.

या कारणामुळें ( इतरही कारणें असतील ) सरकारनें कामत-समिति नेमून महाराष्ट्रांतील मोठाले जलाशय ( सुमारें ५०,००० प्रघट Million घनफूट साठ्याचे ) व दुष्काळी मुलखांतून जाणारे कालवे यांतील पाण्यास मागणी कशी निर्माण करावयाची ह्याची चौकशी केली. त्याअन्वयें सरकारला साखर-कारखान्यांच्या उसास कांहीं सवलती देऊन, पाण्याला मागणी निर्माण करावी लागली.

सारांश, नीरा कनालच्या वशागत ( commanded ) असलेल्या सोलापुरांतील भागाची दुष्काळ-निवारणाच्या दृष्टीनें आदर्श व्यवस्था कशी करण्यांत आली, तें खालीं दाखविलें आहे.

१ माळशिरस-पंढरपूर सारख्या भागांत १ लाख एकर व धान्यपिकांस योग्य जमीन कनालच्या वशागत ( commanded ).

२ भाटघरसारख्या मोठ्या धरणामुळें होणाऱ्या २४,००० प्रघट साठ्यापैकीं निम्याचे वर पाणी त्या क्षेत्राला मिळण्याची व्यवस्था.

३ वीर सारखें जलोत्थक ( Pick-up weir ), कीं ज्यानें पावसाळ्यांतील पुराचें पाणी वरील क्षेत्रांत नेतां येतें व ( २ ) मधील पाण्यांत जादा भर घालतां येतें.

४ नीरा राइट सारखा मुंबई प्रांतांतील मोठ्यांत मोठा कालवा.

अशी सर्व दृष्टींनीं धान्योत्पादनास योग्य अशी परिस्थिति सार्वजनिक खर्चानें ३-४ कोटी रुपये जुन्या काळांत ( सध्यांच्या काळांतील १०-१५ कोटी रुपये ) करून सुद्धां, जर धान्योत्पादनाकरतां कनालच्या पाण्याला अखंड अशी सालोसाल मागणीच येत नाहीं, तरीही "दुष्काळनिवारणास उपाय कालवे" हीच विचारसरणी चालूंच ठेवावयाची काय? कोठें तरी घोडचूक होते आहे हें नजरेआड करून चालेल काय?

वरील आकडे व परिस्थिति यावरून खालील पैकीं कोणतेंही एक वा दोन किंवा तीनही अनुमानें काढणें प्राप्त आहे.

अनुमान पहिलें:— ज्यांना आपण दुष्काळी भाग म्हणतों तेथें धान्यतुटवडा असतो हेंच मुळांत खोटें आहे.

अनुमान दुसरें:— कनालचें पाणी मिळण्याजोगी सर्व परिस्थिति असली व जमीनही धान्याला योग्य असली, तरी वशागत ( commanded ) क्षेत्रांतील शेतकऱ्यांना वा खंडकऱ्यांना धान्यपिकांना सालोसाल पाणी घेण्याची व कॅनालबाहेरील प्रदेशांकरितां धान्योत्पादन वाढविण्याची आंच तर नसतेच पण इच्छाही नसते.

अनुमान तिसरें:— धान्यपिकांना पाण्याची जरूरी व सालोसाल मागणी असूनसुद्धां, सरकार तसें देत नव्हतें व धान्यपिकांची मागणी डावलून सरकार उसालाच पाणी देतें.

पैकीं पहिलें अनुमान प्रस्तुत लेखकानें आंकड्यानिशीं सिद्ध केलें आहे. खालीं उद्धृत केलेल्या सरासरी प्रतियुवक प्रतिदिन धान्यनिपजीच्या आकड्यांवरून वाचकांना हें उघडच दिसून येईल. आकडे १९४४ ते १९४७ सालांचे आहेत.

मुंबई प्रांतांतील कांहीं विशिष्ट जिल्ह्यांचें सन १९४४–१९४७ सालचें जिल्हावारी प्रतिदिन प्रतियुवक धान्योत्पादनाचे आकडे.

( बिन–दुष्काळी व दुष्काळी भागांच्या तुलनेकरितां )

जिल्ह्याचा प्रकार : दुष्काळाच्या वा पर्जन्यपाताच्या दृष्टीनें

| दुष्काळी म्हणून कायिरल्यात व कमी पावसाचे | | पाऊस पुष्कळ असलेले (मुख्यतः कोंकण) | | पूर्वेकडील भाग दुष्काळी; बाकी भाग मावळांत | | इतर | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| नांव | धान्य निपज* औंस | नांव | धान्य निपज* औंस | नांव | धान्य निपज* औंस | नांव | धान्य निपज* औंस |
| सोलापूर | २६·४ | ठाणें | २३·२ | सातारा | १९·१ | अहमदाबाद | १४·२ |
| पंचमहाल | २७·१ | कुलाबा | ३२·३ | पुणें | १९·४ | पू. खानदेश | १५·४ |
| अहमदनगर | ३२·७ | कारवार | १६·३ | धारवाड | ३१.४ | खेडा | १७·५ |
| विजापूर | ३२·७ | रत्नागिरी | १३·१ | | | सुरत | १७·५ |
| प. खानदेश | २९·७ | | | | | | |

* प्रति–दिन प्रति–युवक

दुसऱ्या अनुमानाबाबत वर माहिती सांगितलीच आहे. ४–५ वर्षांनीं अवर्षण वा अपुरा पाऊस पडला म्हणजे व तेव्हां सुद्धां अगदी प्राण कंठाशीं आल्यावर "आमचें धान्य-पीक जळायला लागलें. त्याला पाणी द्या" म्हणावयाचें, ही वशागतक्षेत्रांतील शेतमालकांची रीत. पावसाळ्यांत नदी दुथडी भरून जात असते तेव्हां पाणी घेण्याची तयारी नाहीं. कारण काय तर म्हणे आमचा प्रांत रबी पिकांचा! हें जर खरें तर रबी हंगामाच्या आधींच दुष्काळाची ओरड कां व नवीन कनाल बांधल्यानें स्थिति कशी सुधारणार? कालवे बांधा प्रांतांतील सर्व जनतेच्या नांवावर कर्ज काढून, पण पाणी घेणार ४–५ वर्षांनीं अवर्षण पडेल तेव्हांच. म्हणजे प्रांतानें आमच्याकरितां क्रोडो रुपये खर्च करून कालवे काढावे; आम्हीं मात्र प्रांताकरितां दरवर्षी पाणी घेऊन धान्यपिकें करून प्रांतांतील वा त्याच जिल्ह्यांतील भुकेल्या जनतेस पुरवूं ही सहकार्याची भाषाच नाहीं!! अशा लाडावलेल्या मुलाप्रमाणें स्थिति झाली आहे.

तिसरें अनुमान चूक आहे. पूर्वीचें सरकार काय किंवा हल्लींचें काय, उपाशी जनतेला लागणारें धान्य उत्पन्न करण्याबाबत दक्षच होतीं व आहेत. पण कनाल काढून धान्यास त्याचें पाणी घेऊन धान्यपीक करण्याचे बाबतींत वशागत (commanded) क्षेत्रांतील शेतकरीच उदासीन असलेला आढळल्यानंतर, त्यांनीं त्या पाण्यास कायमचें गिऱ्हाईक मिळविण्याकरितां समिति नेमून, भांडवलावरील व्याजाची व चालू खर्चाची तरतूद केली यांत कोणती चूक? तसें केलें नसतें तर मात्र ती घोडचूक ठरली असती.

या चचपासून सार हें निघतें कीं, मागील अनुभवावरून "दुष्काळ–निवारणास निवळ कनाल बांधून भागत नाहीं" हें शहाणपण शिकावयाचें; तें शिकणें किंवा त्यांत काय सुधारणा करावयास पाहिजे याचा विचार करून त्याची अंमलबजावणी करण्याची कोशीस कोणीच करीत नाहीं! घोडें पेंड खातें तें मुख्यतः येथेंच !!

कालवे काय किंवा स्वस्त दरांत खतें वगैरे सरकारी इतर उपाय काय, त्याची मूळ कल्पनाच अशी कीं "शेतकऱ्याला सोई (कालव, स्वस्त खतें, वगैरे) करून दिल्या कीं, जरूर तें धान्य निर्माण होणारच." हा मूळ पायाच चुकीच्या कल्पनांवर आधारल्यामुळें "अधिक धान्य पिकवा" मोहीम अजिबात फसुनै मुंबई प्रांतांत व अखिल भारतांत क्रोडो रुपयांचा चुराडा झाला. त्या पराभवाची मीमांसा ही अशी आहे!

**दुष्काळांत उपाशी राहतो कोण? व त्याला धान्य मिळण्याची व्यवस्था काय?**

वरील विवेचनावरून दिसून येईल कीं, रोगाचें निदानच चुकीचें व त्यावरील उपाय तर त्याहूनही चुकीचे, म्हणजे रोग बळावयास मदत होईल असेंच, करण्यांत आले व पुढेंही चालूंच आहेत! दुष्काळांत उपाशी राहतो कोण याचा विचार कोणीच करीत नाहीं. दुष्काळांत उपाशी रहातात त्यांत कांहीं शेतकरीही (मालक वा खंडकरी) असतील पण मुख्य भरणा बिगर–शेती व्यक्तींचा. खेडेगांवांत बिगरशेती जनतेची लोकसंख्या पूर्वी होती ती आतां तिपटी–चौपटीनें वाढली आहे. याबाबत खालील आकडे बरेच उद्बोधक ठरतील. आंकडे मुंबई राज्याचे आहेत.

| जमिनीची मालकी एकर | एकंदर मालकांशीं प्रमाण : शेकडा टक्के |
|---|---|
| ५ एकरांपेक्षां कमी | ४२ |
| ५ ते १० | १९ |
| १० ते १५ | १२ |
| १५ ते २५ | १३ |
| उरलेले म्ह. २५ एकरांपेक्षां जास्ती | १३ |
| एकूण | १०० |

टीपाः—(१) "अर्थ"मध्यें प्रसिद्ध झालेल्या माहितीवरून हे आकडे काढले आहेत. (२) ५ एकरांपेक्षां कमी या कलमांत कोंकणांतील भातशेतीचे बरेच मालक असण्याचा संभव.

वरील आकड्यांत अजीबात शेती नसणारे आलेले नाहींत. शिवाय अशा व्यक्तींची संख्या पूर्वीपेक्षां आतां फारच वाढली आहे. त्यांचा समावेश वरील आंकड्यांत नसावा, असा तर्क आहे. कालवे काढून त्यावर धान्योत्पादन केलें तरी तें पडणार मुख्यतः ५ एकरांपेक्षां जास्ती शेती असणाऱ्यांच्या कोठारांत. तें धान्य बिगर-शेती किंवा अपुरी शेती असणाऱ्या व्यक्तीस मिळण्याची व्यवस्था काय? व याहीपेक्षां महत्त्वाचा प्रश्न हा कीं, कनालच्या वशागत नसणाऱ्या जमीनमालकांची व्यवस्था काय? जखम पायाला पण तिथें उपचार मुळींच नाहीं; त्याऐवजीं पाठीला मलम व डोक्याला शेक देण्याचा सपाटा, असलाच प्रकार, कालवे काढल्यानें दुष्काळ निवारण होईल असें समजणारांचा मार्ग झाला व आतां होत आहे.

बरें, चूक व्हावयाची ती तरी एकच बाबतींत होते असेंही नव्हे. इंग्रजींत ज्याला Vicious circle म्हणतात तशी चक्रवाटी चूक आपण करीत आहोंत व तींत सुधारणा होण्याचीं चिन्हेंही दिसत नाहींत. हें खालील विचार–मालिकेंत दाखविलें आहे.

१ धान्य–वांटप–शहरें (Fully Rationed towns) सोडलीं, तर बाकीच्या जनतेस भरपूर पुरेल इतकें धान्योत्पादन सध्यां मुंबई प्रांतांत आहे.

२ मुख्य अडचण आहे त्या धान्याच्या समप्रमाणांत वांटणीची; त्याची तरतूद कांहींच नाहीं!

३ अर्ध-पोटीं राहते तीं बिगर-जमीन वा अपुरी जमीन असणारीं ३५ टक्के कुटुंबें ( त्यांत हरिजन व पूर्वास्पृश्य यांचाच मुख्य भरणा ) त्यांना धान्य मिळण्याची तरतूद काय ?

४ नवीन कालवे काढले तर धान्यपीकवाल्या मालकांकडून पाण्यास मागणीच नसते वा अत्यंत थोडी किंवा ४-५ वर्षांनीं एकदां अशी असते याचें कारण वर ( १ ) मध्यें दिलें आहे. त्याचा परिणाम नीरा राईट बँक कॅनालखालीं सोलापूर जिल्ह्यांतली ३ लाख एकर जमीन येत असून व त्यावर धान्यपिकास दरवर्षी पाणी घेतलें तर देण्याइतकें पाणी असतांना, तसें होत नाहीं.

५ ही कारण-परंपरा माहीत असून आपल्या कालवे काढा म्हणजे धान्योत्पादन वाढेल व तें उपासपोटी जनतेस मिळेल या वेड्या कल्पनेनें सर्व जनता भारावली आहे.

### विकारवशतेचे व विचार न करण्याचे परिणाम

शहाणा व मूर्ख यांत खरें म्हटलें तर अंतर फारसें नसतें. कित्येक बाबतींत दोघेही चुकीचा मार्ग स्वीकारतात. फरक इतकाच कीं शहाणा माणूस एकदां चूक झाली तर ती पुन्हां न होईल याची दक्षता घेतो तर मूर्ख माणूस तीच चूक दुसऱ्यांदां, तिसऱ्यांदांच नव्हे तर अनेकवार करून, उघड्या डोळ्यांनीं अधःपात पावतो.

मागील ७०-८० वर्षांत प्रथम-श्रेणींतील अनेक कालवे-धरणें [ त्यांत छोटीं ( Minor ) व मोठीं ( Major ) ह्या दोन्हीं प्रकारचीं आलीं. ] सरकारी खर्चानें बांधलीं गेलीं. त्यांतच प्रथम-श्रेणींतील मोठ्या ( First Class Major ) ४ प्रकल्पांची भर या शतकाच्या प्रारंभींच्या २५ वर्षांत ( १९०० ते १९२५ ) महाराष्ट्रांतील दुष्काळी भागांत पडली. त्यांची खरी फलश्रुती काय याची दखल कोणीं नीट घेतली आहे काय ? दुष्काळनिवारणाच्या दृष्टीनें त्यांचा उपयोग झाला कां व असल्यास किती, याची "सत्यकथा" कोणीं निवेदन केली आहे काय ?

बघण्याची दृष्टीच विकृत व विचार-परंपरा न धरतां ठेवल्यामुळें आपला पाय चिखलांत खोलच जात चालला आहे. खरी वस्तुस्थिति जगापुढें मांडण्याऐवजीं "लोकप्रियता काय बोलण्यानें वा केल्यानें मिळेल" तें बोलण्याची वा करण्याची घातुक खोड समाजांतील पुढारी व अधिकारी अशा सर्वांनाच लागली आहेसें वाटतें. आपल्या मताविरुद्ध सांगणाराचें नीट ऐकून घेण्याची सुद्धां जनतेची तयारी नाहीं असा अनुभव आहे. श्रीमंताच्या घरच्या शागीर्दानें "कान असून ऐकायचं नाहीं, डोळे असून पहायचं नाहीं व तोंड असून बोलायचं नाहीं" हा नियम पाळल्याशिवाय गत्यंतर नसतें, असें "शारदा"कार देवलांनीं सांगितलें तें आपणांस पूर्ण लागू आहे ! कोणी सत्यवक्ता सत्यकथन करूं लागला तर त्याचें ऐकूनच घ्यावयाचें नाहीं, विपर्यास करून वेळ मारून न्यायची किंवा कोट्या करून त्याची थट्टा करावयाची व टर उडवावयाची संवय लागल्यामुळें खरा प्रकार कळण्याचा मार्गच खुंटला आहे ! परंतु तसें केल्यानें कोठवर चालणार ? गळूं झांकून ठेवलें तरी तें केव्हांतरी फुटल्याशिवाय थोडेंच रहाणार ?

व्यापारी मंडळ्यांच्या बाबतींत, भांडवल देणाऱ्यांनींच चालविलेल्या कारखान्यावर नफा किंवा तोटा झाला तरी ज्याचे ते जबाबदार अशी स्थिति असते, व त्यामुळें ते आपल्या व्यवहारांत अत्यंत दक्ष असतात. मात्र सरकारी पैसा ज्यावर ओतला जातो त्या प्रकल्पांचे बाबतींत तशी स्थिति नसते. येथें भांडवलाची जबाबदारी सर्व प्रांताच्या व देशाच्या लोकसंख्येवर व ते कालवे चालवले जातात तोट्यांत; व त्या तोट्याचें समर्थन करण्याकरितां कारण दाखवावयाचें दुष्काळनिवारणाचें !

" आंधळे दळतें, कुत्रें पीठ खातें, " तें हें असें !

### दुष्काळ-निवारणास कालव्यांचा उपयोग झाला कां ? सोलापूरचें प्रत्यक्ष उदाहरणच पहा.

पण शाब्दिक चर्चा वा वैचारिक उहापोह करण्यापेक्षां प्रत्यक्ष उदाहरणच पहा ! ! हातच्या कांकणाला आरसा कशाला पाहिजे ? या उद्देशानेंच सोलापूर जिल्ह्याचें उदाहरणच घेतलें आहे. सोलापूर सारखीच स्थिति नगर व पुणें पूर्वभाग येथें आहे.

मुंबई प्रांतांतील इतर जिल्ह्यांच्या मानानें सोलापूर जिल्ह्याकरितां किती खर्च केला गेला हें खालील आकड्यांवरून दिसून येईल.

| | एकंदर क्षेत्राचे मानानें कालव्याचें वशागत क्षेत्र शेंकडा | एकंदर क्षेत्राचे मानानें कालव्याखालीं भिजणारें क्षेत्र शेंकडा | जिल्ह्यावर वा प्रांतवर क्षेत्रपायनिक (Irrigation) भांडवल खर्च झालें तें दर एकरीं रुपये |
|---|---|---|---|
| (१) सर्व मुंबई प्रांत | ६ (ला कमी) | १ | ४ |
| (२) सोलापूर जिल्हा | २३ | ४ | १६ |
| (३) सोलापुरास, मुंबई प्रांताचे सरासरीचे मानानें कितीपट | ४ | ४ | ४ |

टीपः—विपुल पर्जन्यमानाचे कोंकणपट्टी व मावळ यांचें क्षेत्र व आकडे सोडले तरी वरील आकड्यांत फारसा फरक पडत नाहीं.

सारांश, प्रांतांतील बाकीच्या क्षेत्राचे मानानें सोलापूर जिल्ह्यास चौपट सोई दिल्या व त्या जिल्ह्यावर चौपट खर्च क्षेत्रपायनिक ( Irrigational ) प्रकल्पांवर केला. इतकें करून तरी दुष्काळनिवारण झालें आहे का ? नाहीं. दुष्काळाची ओरड आहेच !

चौपट सोई करून जर सोलापूर जिल्ह्यांत दुष्काळनिवारण झाल्याचें समाधान लाभलें असतें तर श्रमाचें व खर्चाचें चीज झालें असें म्हणतां आलें असतें. परंतु तेंही नाहीं. परवा पाऊस पडेपर्यंत सोलापूरच्या भावी दुष्काळाचीं भडक चित्रें वर्तमानपत्रांतून झळकत होतीं. यावरून खालील अनुमानें काढणें अटळ आहे.

१ वर्तमानपत्रांतून दुष्काळाची जी ओरड होते ती मुख्यतः त्या त्या काळच्या अवर्षणावरच आधारलेली असते. त्यामुळें पुढें धान्य-तुटवडा होईल, हा निव्वळ अंदाज असतो.

अवर्षणांत खेडोपाडीं धान्यच शिल्लक नाहीं अशी ओरड खरी कीं खोटी हें कोणी ठरवावयाचें ? माणसांची दर १० वर्षांनीं "शिरगणती" होते, तशाच धर्तीवर दुष्काळ पडला म्हणजे धान्यच अपुरें असतें हें सिद्ध करण्यास जोंवर सरकार घरोघरीची धान्य-गणती करीत नाहीं, तोंवर खेड्यांत धान्य अपुरें आहे हें सिद्ध किंवा गैरसिद्ध कसें होणार ?

२ अलीकडे तरी अशी प्रथाच पडली आहेसें दिसतें कीं ज्या त्या जिल्ह्यानें दुष्काळाची वा इतर अडचणींची ओरड करीत रहावें. पुष्कळ ओरड केली म्हणजे थोडेंतरी पदरांत पडेल ही आशा ! कांहीं धूर्त व्यक्ति वा गट यांचे अशा बातम्यांच्या मागें कांहीं उद्देशही असणें शक्य आहे. आपल्या शेतावर सरकारी खर्चानें पाणी मिळण्याची व्यवस्था होण्याजोगा एकादा

बंधारा वा लहान जलाशय होण्याजोगा असल्यास, त्या मागणीला दुजोरा मिळण्यास ही ओरड चांगलीच उपयोगी पडण्याचा संभव. व्यक्तींची व एखाद्या खेडेगांवची नजर बारक्या प्रकल्पावर असते तर मोठ्या कारखान्याच्या मालकांची वा चालकांची नजर मोठ्या ( १०,०००–२०,००० हजार प्रघट M. C. Ft. ) जलाशयावर व कालव्यावर असते. मात्र दोघांचीहि इच्छा एकच. प्रकल्पावर भांडवल सरकारनें घालावें व विहिरीवर पंपानें पाणी उपसण्यास खर्च येतो त्याच्या ⅓ पेक्षा कमी खर्चात आपणांस पाणी मिळावें. तिसरीहि मुख्य इच्छा म्हणजे, आपणांवर प्रांताला धान्य वा इतर वस्तू पुरविण्याचें किंवा दराचें नियंत्रण असूं नये.

अशी ओरड जेव्हां एकाद्‌दुसरा धूर्त गट पूर्वी करीत असे तेव्हां त्याचा कार्यभाग साधला. पण हें तंत्र आतां अनेकांना माहीत झाल्यामुळें सर्वचजण ओरड करूं लागले त्याचा परिणाम काय झाला आहे पाहा ! नुकतांच सरकारी हुकूम निघाला आहे कीं जिल्हाधिकाऱ्यानें सरकारी मंजुरीशिवाय दुष्काळीकाम– मग तें त्यास कितीहि निकडीचें वाटो– हातीं घेऊं नये !

" लांडगा आला रे लांडगा आला " या जुन्या गोष्टीची ही प्रचीतीच दुसरें काय ?

३ कनाल काढून दुष्काळ निवारण होतें ही कल्पनाच खोटी. ह्या तिसऱ्या अनुभवाचा खरेखोटेपणा पडताळून घेण्याकरितांच सोलापूर जिल्ह्याचें उदाहरण घेतलें आहे. बाकीच्या क्षेत्राचे मानानें सोलापुरांत प्रत्येक बाबतींत चौपट खर्च व चौपट खटपट करूनहि दुष्काळाची ओरड कायमच आहे व त्याबरहुकूम आणखी कालवे काढा ही मागणीहि कायमच आहे. म्हणजे ही मागणी करणारांची कल्पना तरी काय आहे ? मुंबई राज्यांतील इतर भागांनीं व जनतेनें सर्व बोजा व तोटा सोसावा व एकट्या सोलापूरचीच धन करावी ! !

मागून पुढून जर बापच नवरा व्हायला लागला व आत्याबाईच नेहमीं करवली म्हणून मिरवायला लागली तर लेकाची ( विजापूर सारख्यांची ) पाळी तरी कधीं यावयाची ?

महाराष्ट्राची भौगोलिक ठेवणच अशी आहे कीं, तेथें सरासरी १०–२० टक्के जमीनच वशागत होणें शक्य. नीरेसारख्या नदी ('सह्याद्रींतून निघणाऱ्या नदीवर ) वर कालवा काढल्यानें २३ टक्के जमीन वशागत होण्याचें भाग्य लाभून सुद्धां जर मुख्य उद्देश साध्य होत नाहीं तर वरील तिसरें अनुमान काढणें क्रमप्राप्त आहे.

मात्र–सोलापुरांत कालवे काढल्यानें साधलें काय हें नीट समजून घेण्याच्या दृष्टीनें त्या कालव्यांवर उत्पादन तरी काय होतें ह्याचा ऊहापोह खालीं केला आहे.

### सोलापुरांतील कालव्यावर उत्पादन तरी कसलें होतें

कालवे- धरणें यांचा उपयोग दुष्काळनिवारणास होतो अशी समजूत असणारांनीं खालील आंकडे पहावे. हे आंकडे सोलापुरांतील कालव्याखालील पिकांच्या उत्पन्नाचे आहेत. उत्पादनाची खरी कल्पना येण्यास पिकांचा गट आकडा करून येणार नाहीं. इतकेंच नव्हे तर एकरांत पीकवारी करूनहि नीट कल्पना येणार नाहीं. पण उत्पन्नाची किंमत पीकवारी पण रुपयांत सांगितली म्हणजे मात्र पूर्ण कल्पना येईल. या उद्देशानें खालील तालिका दिली आहे.



### सोलापूर जिल्ह्यांतील कालव्याखालीं भिजणाऱ्या जमिनींवरील उत्पन्नाच्या आंकड्यांचा तक्ता.

आंकडे लक्ष रुपयांचे आहेत.

| | भाज्या फळें | ऊंस | धान्य | डाळी | कडबा | कपास | रंग-मसाले | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नीरा राइट बँक | २ | १८६ | २४ | ७ | १ | † | † | २२१ |
| एकूण प्रथमश्रेणींतील मोठीं | २ | १८६ | २४ | ७ | १ | — | — | २२१ |
| म्हसवड | — | १ | ७ | १ | १ | † | † | ९⅔ |
| एकरूख | २ | १ | ६ | १ | १ | † | † | १०¾ |
| कोरेगांव | † | — | १ | † | — | — | † | १¼ |
| अष्टी | † | † | ३ | † | † | — | † | ३½ |
| पाथरी | — | — | १ | ½ | † | — | † | १¾ |
| एकूण प्रथमश्रेणींतील छोटीं | २ | २ | १८ | ३ | २ | — | — | २७ |
| एकूण प्रथम श्रेणींतील सर्व | ४ | १८८ | ४२ | १० | ३ | — | — | २४८ |

† टीपः— किंमत १ लाखापेक्षां कमी असल्यास † खूण केली आहे.

वरील तालिकेवरून हें स्पष्ट होईल कीं, प्रथमश्रेणींतील मोठीं ( First Class Major ) या प्रकारच्या प्रकल्पांवर मुख्यतः द्रव्योत्पादक पिकेंच होतात. धान्यपदार्थांचें उत्पन्न नांवाला. सोलापूर जिल्ह्यांतील एकूण धान्योत्पादन प्रतिवर्षी २,००,००० टन तर सर्व प्रकारच्या कालव्यांवर मिळून ८,०००–१०,००० टन म्हणजे जिल्ह्याच्या ५ टक्के सुद्धां नाहीं !!

कोयनाउत्पायन ( First Class Major ) योजनासुद्धां " प्रथमश्रेणींतील मोठी " ( First Class Major ) या धर्तीं ( Pattern ) चीच आहे. तिच्यावरील अपेक्षित उत्पन्नाचे आंकडे पाहा.

| मालाचें नांव | उत्पन्न लाख टन |
|---|---|
| साखर | १·४ |
| गूळ | १·४ |
| फळें | ०.११ |
| धान्यें | ०·८४ |
| पूरक अन्न | ०·९२ |
| एकूण | ४·६७ |

म्हणजे दुष्काळपिडित जनतेच्या उपयोगाकरितां साठवून ठेवण्याजोगें धान्य एकूण उत्पन्नाच्या फक्त ⅙ !! त्या उत्पायन-योजनेची तरफदारी तीं मुख्यतः दुष्काळग्रस्तांस धान्य पुरविण्याकरितां अत्यंत उपयुक्त म्हणून केल्यास ती कशी पटेल ! नीरा, कोयना–उत्पायन ( lift irrigation ), कुकडी, मूटा वगैरे योजना दुष्काळनिवारणाकरितां आहेत असें प्रतिपादन करणारे स्वतः फसत आहेत कीं लोकांस फसवीत आहेत याचा निर्णय करणें अवघड जातें !!

प्रथमश्रेणींतील लहान ( First class Minor ) ह्या प्रकारांत धान्यउत्पादनाचा भाग प्रमुख होता हें खरें; परंतु वार्षिक प्रत्येक टन धान्य उत्पन्न होण्यास यावर भांडवली खर्च जबर; धान्य कमी आहे या गैरसमजुतीवर असा खर्च करणें गैरशिस्त.

प्रस्तुत लेखकानें, या सर्व विषयाची आर्थिक दृष्टीनें चर्चा एका निबंधांत आंकड्यानिशीं केली आहे. धान्योत्पादनाकरितां अत्यंत मितव्ययी पायनिक प्रकार ( Pattern ) म्हणजे सह्याद्रींतून निघणाऱ्या नद्यांवर वीरकें ( Pick up weirs ) व कालवे हा होय, असें निबंधांत सिद्ध केलें आहे. पण असले प्रकल्प केले तरी त्यांतून मिळणारें पाणी घेऊन त्यावर धान्योत्पादक पिकें शेतकऱ्यांनीं केलीं, तरच धान्योत्पादन होणार.

इंग्रजींत म्हण आहे कीं,

"You can take a horse to water, but cannot make it drink water."

तोच प्रकार येथें होत आहे. आपल्या स्वतःच्या कुटुंबास लागतें त्यापेक्षा जास्त धान्योत्पादन करण्याची इच्छाच नसेल, तर कनाल काढले तरी जादा धान्योत्पादन कसें होणार! जलाशयांतील पाण्याच्या दर प्रघट ( M. C. ft. ) आकल्पित साठ्यामागें १५-२० एकर धान्यपीक भिजून निघावें ही अपेक्षा, तेथें ४-५ च भिजतात यावरून धडा घेतला पाहिजे तो असा कीं गतानुगतिकत्व सोडून कांहींतरी जालीम उपाय योजले पाहिजेत वा क्रांतिकारक बदल ( Revolutionary changes ) केले पाहिजेत. ते कोणते याचें वर्णन दुसऱ्या एखाद्या लेखांत करतां येईल. मात्र "दुष्काळी मुलुख" म्हणून सार्वजनिक खर्चानें निरनिराळ्या प्रकारचे प्रकल्प करीत रहावें, पण जेथें कनालमधून पाणी आणलें जातें. तेथील लोकांवर पाणी घेऊन धान्यवाढ करायची जबाबदारी मात्र कोणत्याच प्रकारची नसावी, हा दुष्ट प्रघात सुरू राहिला तर दुष्काळनिवारण तर होणार नाहींच, पण प्रांताच्या तिजोरीवर मात्र भलता ताण पडेल.

( मिरज येथें १९१९ सालीं स्थापन झालेली भागीदारांची जबाबदारी मर्यादित )

दि मिरज स्टेट बँक लि.

— मिरज —

शेड्यूल्ड बँक

( स्थापना : १९२९ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. २५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | ... | रु. ११,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. ६,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ७०,००,००० |

: शाखा :

★ लक्ष्मेश्वर ( जि. धारवाड )
★ कुर्डूवाडी व पंढरपूर

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेंचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

व्ही. पी. बेडेकर, चेअरमन. के. डी. शिराळकर, मॅनेजर.

कोल्हापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को. बँक लि. कोल्हापूर.

( स्थापना १९३८ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भाग भांडवल | रु. | ७,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | ३,२२,६०० |
| खेळतें भांडवल | रु. | ३०,००,००० |

—: बँकर्स :—

दि बॉम्बे प्रॉ. को-ऑप. बँक लि. बॉम्बे

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

१. मे. व्ही. जी. सरनाईक, एम. ए., एलएल. बी., अॅडव्होकेट ( प्रेसिडेंट ), २. मे. सरदार बहादूर डी. डी. जाधव, ( व्हाइस प्रेसिडेंट ), ३. मे. राव. ए. के. सरनाईक, ४. मे. कृष्णाजी तुकाराम पाटील, चुयेकर, ५. मे गणपतराव आबाजीराव डोंगळे, ६. मे. गुरुपाद राचय्या स्वामी, ७. मे. यशवंतराव भाऊसाहेब पाटील, ८ मे. दादा बळवंत पाटील, ९ एन्. टी. सरनाईक, ( मॅनेजिंग डायरेक्टर )

ऑडिटर्स

मे. डी. डी. जोशी आणि कंपनी, चार्टर्ड अकौंटंटस, बॉंबे

हेड ऑफिस—लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

— शाखा —

हातकणंगलें, मलकापूर, जयसिंगपूर, इचलकरंजी.



डोंगरे यांचे बालामृत

लहान मुलांना शक्तिवर्धक औषध

के. टी. डोंगरे आणि कं. मुंबई ४.

## हिंदी बँकांनीं दिलेल्या कर्जाची वर्गवारी ( मार्च, १९५२ अखेर )

(आंकडे लक्ष रुपयांचे)

| माहिती पुरविणाऱ्या बँका | प्रमुख शेड्यूल्ड बँका ११ | | | इतर शे. बँका ६३ | | | बिगर शे. बँका ४०८ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | खातीं | रक्कम | एकूण कर्जाशीं प्रमाण% | खातीं | रक्कम | एकूण कर्जाशीं प्रमाण% | खातीं | रक्कम | एकूण कर्जाशीं प्रमाण% |
| १ कारखानदारी | | | | | | | | | |
| कपास कापड | ९८६ | ५२,४४ | १४·५ | २६९ | ४,४२ | ६·३ | १,९८९ | २,०७ | ४·९ |
| ताग | ७९ | १५,३० | ४·२ | १२ | २५ | ०·४ | ११ | ११ | ०·३ |
| इतर धागे | २८३ | ११,०८ | ३·१ | ३११ | १,१० | १·६ | ३९२ | २७ | ०·६ |
| लोखंड-पोलाद | १६५ | ४,५७ | १·३ | १४६ | ६६ | ०·९ | १६३ | ३८ | ०·९ |
| कोळसा, वगैरे | १६२ | २,२१ | ०·६ | ७० | ४३ | ०·६ | ९७ | १४ | ०·३ |
| इंजिनीअरिंग | २८५ | ४,१३ | १·१ | २३२ | १,२७ | १·८ | ३४७ | ४० | ०·९ |
| साखर | २०१ | ३५,४३ | ९·८ | ९८ | १,६७ | २·४ | १९ | १,१२ | २·९ |
| सिमेंट | १७ | १,०३ | ०·३ | ६ | २२ | ०·३ | ४ | १ | — |
| वहातूक, गॅस, वीज इ. | १८२ | २,१४ | ०·६ | ३४८ | ५५ | ०·८ | ६५० | ६३ | १·५ |
| वनस्पति, साबण इ. | ४५१ | ७,७१ | २·१ | २३९ | ७९ | १·१ | १६९ | ३९ | ०·९ |
| रसायनें, रंग इ. | १०२ | ३,०५ | ०·८ | १३३ | २६ | ०·४ | ३९ | ७ | ०·२ |
| इतर | १,९८० | १९,६३ | ५·४ | २,०७६ | ५,४६ | ७·७ | २,९५२ | २,५० | ५·९ |
| १ ची बेरीज | ४,८९३ | १५८,७३ | ४३·८ | ३९४० | १७,०९ | २४·२ | ६,८०२ | ८,०७ | १८·९ |
| २ व्यापार | | | | | | | | | |
| घाऊक व्यापार | २०,२९४ | ८५,१४ | २३·५ | १३,२५४ | २०,६५ | २९·२ | १०,२४७ | ७,२८ | १७·० |
| शेतीचा माल | १३,२९६ | ५५,३५ | १५·३ | ५,९९१ | ७,४६ | १०·५ | ५,४४५ | ३,६९ | ८·६ |
| इतर माल | ६,९९८ | २९,७८ | ८·२ | ७,२६३ | १३,२० | १८·७ | ४,७९७ | ३,५९ | ८·४ |
| किरकोळ व्यापार | १०,३३३ | ७,२९ | २·० | १३,८१४ | ४,२४ | ६·० | ५५,६६८ | ४,४४ | १०·४ |
| रोखे वगैरेचा व्यवहार | १,४८९ | १०,१४ | २·८ | ५३८ | २,६० | ३·७ | २०४ | १,४१ | ३·३ |
| सोनें-चांदी व्यापार | २३० | १,६० | ०·४ | ३४५ | ६९ | १·० | १,७०३ | १९ | ०·४ |
| श्रॉफ | २,०८६ | ८,१८ | २·३ | १,३८६ | १,६१ | २·३ | २,८०१ | ४१ | १·० |
| बँका इ. | १,११६ | २४,९८ | ६·९ | ८१४ | १,९९ | २·८ | ४८९ | २२ | ०·५ |
| इतर | ४,८९६ | १७,२३ | ४·८ | ५,३५७ | ५,३९ | ७·६ | २९,७८२ | ३,२५ | ७·६ |
| २ ची बेरीज | ४०,४४४ | १५४,५५ | ४२·६ | ३५,५०८ | ३७,१६ | ५२·६ | १,०१,९९७ | १७,२० | ४०·३ |
| ३ शेती | | | | | | | | | |
| अन्नधान्यें | १,२९९ | २,३१ | ०·६ | १,५९२ | ३७ | ०·५ | ३७,४६० | ६६ | १·५ |
| इतर पिकें | १,२७९ | ३,७९ | १·० | १,९५९ | १८ | ०·३ | ४,८७८ | ५१ | १·२ |
| इतर | २९२ | १२ | — | ३,६५८ | ४२ | ०·६ | ६०,०३६ | १,२१ | २·८ |
| ३ ची बेरीज | २,८७० | ६,२१ | १·७ | ७,२०९ | ९७ | १·४ | १,०२,३७४ | २,३८ | ५·६ |
| ४ वैयक्तिक व व्यावसायिक | ९१,४१५ | २४,८२ | ६·८ | १,४८,३६७ | ११,८५ | १६·८ | ५,२०,०४१ | ११,३९ | २६·७ |
| ५ इतर सर्व | १०,३८९ | १८,३५ | ५·१ | १७,६६८ | ३,६४ | ५·२ | १,०२,२५९ | ३,६७ | ८·६ |
| १ ते ५ ची बेरीज | १,५०,०११ | ३६२,६६ | १००·० | २,१२,६९२ | ७०,७१ | १००·० | ८,३३,४७३ | ४२,७१ | १००·० |


खटाव तालुका शेतकरी सहकारी
खरेदी-विक्री संघ लि.
वडूज ( उ. सातारा )
स्थापना ता. १८।६।१९४८ इ.

नवीन वर्ष व दिवाळी सोसायटीच्या शेतकरी व नागरिक सभासदांना व हितचिंतकांना उत्कर्षाची जावो.

भि. ना. झिरपे, मॅनेजर.
बाबूराव तात्याजी गोडसे, चेअरमन.

कोरेगांव व माण तालुका सहकारी
खरेदी-विक्री सोसायटी लि.
कोरेगांव ( उ. सातारा )
भुईमुगाच्या शेंगाचा हंगाम सुरू झाला!
कोरेगांव-माण तालुका सहकारी खरेदी-विक्री सोसायटीच्या अडत दुकानामार्फत आपला माल विकून योग्य मोल मिळवा.

जी. आर. कुलकर्णी
प्रेसिडेंट.
गुलाबराव रामजी कंजळे, चेअरमन.
डी. एन. कुलकर्णी, मॅनेजर.

# दि सांगली बँक लिमिटेड

## सांगली

( स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक )

## मुख्य ऑफिस : सांगली

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रुपये १०,००,००० |
| वसूल भांडवल | रुपये ४,५०,००० |
| रिझर्व व फंडस् | रुपये ४,५०,००० |
| वर्किंग फंडस् | रुपये एक कोटी |

: शाखा :

मुंबई, शहापूर, तेरदळ, रबकवी, शिरहट्टी, मंगळवेढें, कवठें, कराड, उगार, विलिंग्डन कॉलेज.

सांगली येथें सेफ् डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था आहे. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. एस्. ई. सुखटणकर, D. F. C., I. A. S. (चेअरमन) कलेक्टर, साउथ सातारा.

(१) श्री. नेमचंद रावजी शहा (२) श्री. भूपालराव अनंत आरवाडे (३) श्री. पुरुषोत्तम गोकुळदास, (४) श्री. गुंडप्पा बाबाजी आरवाडे, (५) श्री. शांतीनाथ बाबुराव आरवाडे, B. A., (६) श्री. मारुतीराव रामचंद्र जाधव.

एम्. के. गुप्ते,
एम्. ए., सी. ए. आय. आय. बी.
मॅनेजर

# बँक ऑफ पूना लि.

( शेड्यूल्ड बँक )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल : | ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें : | २५,००,००० |
| वसूल भांडवल : | १२,५०,००० |

## –संचालक मंडळ–

१ श्री. मुरलीधर चतुर्भुज लोया, चेअरमन
२ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी.
३ डॉ. नारायण भिकाजी परुळेकर M. A. Ph. D. संपादक, सकाळ, पुणें.
४ श्री. फ्रामजी पी. पोचा, बियांचे व्यापारी.
५ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी
६ श्री. गणपतराव काळूराम नाईक, B. SC., B. E., LL. B.

शाखा—(१) भवानी पेठ, पुणें. (२) सदाशिव पेठ, पुणें. (३) सोलापूर (४) सांगली.

व्याजाचे दर–चालू ठेव १/२ टक्का. सेव्हिंग्ज १॥ टक्का.

मुदत ठेव : १ वर्ष ३ टक्के, ५ वर्षे ४ टक्के.

एक वर्षापेक्षां कमी मुदतीच्या ठेवींवर आकर्षक व्याज.

मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत लॉकर्सची सोय.

मुख्य ऑफिस : ४५५ रविवार, पुणें २.

गो. गं. साठे,
मॅनेजर.

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरी:–भोर, जि. पुणें.

शाखा:–पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष.
न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले.
श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी.
श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:–बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी
ॲ. मॅनेजर.

स्थापना १९३६

# युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

पॅलेस स्ट्रीट, सातारा.

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३०–६–५१ अखेर

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. ६,४[illegible],९२५ |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. १,७९,००० |
| ठेवी | रु. ७१,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ८१,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. १–८–० | रु. १–१२–० | रु. ३–०–० | रु. ३–८–० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४–०–०

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १–८–० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | „ | १–०–० |
| चालू डिपॉझिट | „ | ०–८–० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
एस. एच. साठे, बी. ए., एलएल्. बी., चेअरमन


## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## कर चुकव्यांचा करास बेजबाबदार विरोध

### नागरिकांचें कर्तव्य

( लेखकः—ग. रा. साठे, साठे बिस्किट अँड चॉकोलेट कं. लि., पुणें )

स्वतंत्र व प्रगतिशील देशाचे एक नागरिक या दृष्टीनें नवीन करच नकोत हें म्हणणें अदायित्वपणाचें ( बेजबाबदारपणाचें ) होईल. जगांतील मागासलेल्या देशांत दिली जाणारी अमेरिकेची कोट्यावधी डॉलर्सची मदत अमेरिकन नागरिकांनीं दिलेल्या करांतूनच दिली जात आहे व हें माहीत असूनहि तेथें सतत वाढत्या करास फारसा तीव्र विरोध तर नाहींच, पण असें वाढते कर चुकविण्याचा प्रयत्नहि सर्वसाधारणपणें होत नाहीं. याच्या उलट येथली परिस्थिति काय आहे? वाढते कर हे अंतर्गत सुधारणाकरितांच बसविण्यांत येत आहेत व बसविलेले कर प्रामाणिकपणें भरले जात नाहींत म्हणूनच करांचा दर वाढवावा लागतो हें सप्रमाण सिद्ध झालेलें आहे. जे आज नवीन विक्री-करास विरोध करीत आहेत, त्यांच्यापैकीं किती टक्के व्यापारी प्रामाणिकपणें सध्यांचा विक्रीकर भरीत आहेत, याचा ज्याचा त्यानें स्वतःच्याच सद्सद्विवेकबुद्धीस कौल लावून विचार करावा. केवळ करचुकवे लोकांच्या अधिक प्रमाणामुळेंच प्रामाणिकपणें कर देणाऱ्यांवर जादा बोजा पडत आहे, याचा कोणी विचार केला आहे का?

याचा अर्थ असा नव्हे, कीं आम्हीं सध्यांच्या सरकारच्या करपद्धतीशीं सहमत आहों. कराचा बोजा उत्पन्नाच्या प्रमाणांतच असावा, कर भरून व स्वतःचा वाजवी खर्च भागवून प्रत्येकास कांहींतरी बचत करतां यावी आणि अशी बचत झाली तरच राष्ट्राचें पाऊल पुढें पडणार असल्यानें उत्पन्नांत वाढ करून घेण्याची संधी देऊन नंतरच वाढती करवाढ करावी असेंच आमचें मत आहे व त्या दिशेनें जी चळवळ करण्यांत येईल तिला आम्हीं जरूर पाठिंबा देऊं. करवाढीस सरास विरोध करणें मात्र योग्य होणार नाहीं.

### रोख्यांच्या किंमतीचे निर्देशक आंकडे
( १९३८ = १०० )

| गट | आठवड्याची सरासरी | |
|---|---|---|
| | ऑगस्ट १९५१ | आगस्ट १९५२ |
| भारत सरकारचे रोखे ... | ९८·४ | ९१·२ |
| निश्चित डिव्हिडंड देणारे शेअर्स ... | ९९·१ | ९१·० |
| अनिश्चित डिव्हिडंड देणारे शेअर्स ... | १२७·९ | १०७·८ |

### रहाणीच्या खर्चाचें मान थोडें उतरलें.

जून १९५२ अखेर संपलेल्या वर्षी रहाणीच्या खर्चाचें मानं उतरलें असल्याचें आढळतें. मद्रासमध्यें ही घट २% झाली, तर कटकमध्यें ती १८% झाली. खालील तक्त्यांत १४ प्रमुख औद्योगिक शहरांबाबत तुलनात्मक माहिती दिली आहेः—

| १९४४=१०० | | | ऑगस्ट १९३९=१०० | | |
|---|---|---|---|---|---|
| | जून १९५२ | % घट (जून १९५१ ते जून १९५२) | | जून १९५२ | % घट (जून १९५१ ते जून १९५२) |
| कटक | १५५ | १८ | मुंबई | ३२२ | ... |
| जबलपूर | १४८ | १२ | कानपूर | ४२४ | ५ |
| लुधियाना | १४८ | १२ | कलकत्ता | ३४२ | १० |
| झरिया | १७५ | ८ | नागपूर | ३७५ | ५ |
| अजमीर | १७१ | ४ | मद्रास | ३३७ | २ |
| जमशेदपूर | १५३ | ३ | अहमदाबाद | ३६० | ३ |
| दिल्ली | १४५ | ... | सोलापूर | ४११ | ४ |

### हिंदी बँकांनीं दिलेलीं कर्जें ( लक्ष रुपये )

| | शेड्यूल्ड बँका | | बिगर-शेड्यूल्ड बँका | |
|---|---|---|---|---|
| | मार्च १९५१ | मार्च १९५२ | मार्च १९५१ | मार्च १९५२ |
| एकूण कर्जें | | | | |
| डॉक्युमेंटरी बिल्स | ५३,९५ | ५७,९२ | ८३ | ४३ |
| क्लीन बिल्स | २१,७४ | २२,६३ | १,६९ | १,४५ |
| इतर कर्जें | ५०८,८६ | ५५१,६९ | ४०,४८ | ४०,८३ |
| एकूण | ५८४,५६ | ६३२,२४ | ४३,०० | ४२,७१ |
| कर्जें—तारणाचीं व बिनतारणाचीं | | | | |
| तारणावर दिलेलीं | ५१२,९६ | ५५२,७४ | ३२,४० | ३२,५२ |
| विनातारण दिलेलीं | ७१,६० | ७९,५० | १०,६० | १०,१९ |
| एकूण | ५८४,५६ | ६३२,२४ | ४३,०० | ४२,७१ |

**ऑस्ट्रेलिआंत भरपूर युरेनिअम**—ऑस्ट्रेलिआच्या उत्तर भागांत सांपडणाऱ्या खडकांत जगांतील सर्वांत मोठा युरेनिअमचा सांठा आहे असें समजतें. ह्यासंबंधीं एक खास अहवाल ब्रिटनचे मुख्य प्रधान मि. चर्चिल ह्यांना सादर करण्यांत येणार आहे.


रेखा फर्निशर्स

३२४, सदाशिव, पुणें.

*************

सर्व प्रकारच्या सुबक फर्निचरचे कारखानदार



दि इसलांपूर अर्बन को. बँक लि.

इसलांपूर ( जि. दक्षिण सातारा. )

स्थापना १९३५

अधिकृत भांडवल रु. ५०,०००

वसूल भांडवल रु. २४,५७५

खेळतें भांडवल रु. १,३६,०००

बँकिंगचे व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

# दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

# " कुलाबा "

* साबणचुरा, बार व वड्या
* ब्लॅक टूथ पावडर
* गुलाबी टूथ पावडर
* सुवासिक कोकोनट हेअर ऑईल
* सुवासिक टाल्कम पावडर
* सुवासिक चमकदार गंध
* सुवासिक ब्रिलियंटाईन, फिनाईल वगैरे.

एजन्सीजसाठीं चौकशी करा.

कुलाबा इंडस्ट्रीज, पनवेल, कुलाबा

# सांडू ब्राह्मी तेल.....

सर्वप्रथम, आयुर्वेदांतील संशोधन करून, केशसंभार वाढविण्याकरितां, डोळ्यांची जळजळ नाहींशी करून, तप्त मेंदूस शांतता देणारें, कृत्रिम रंग-वास रहित नैसर्गिक स्वरूपांतील " सांडू ब्राह्मी तेल " आम्ही निर्माण केलें. सर्वत्र विकत मिळतें.



द. कृ. सांडू ब्रदर्स

चेंबूर लिमिटेड

फॅक्टरी व हेड ऑफिस

चेंबूर (मुंबई)

STUSA SB/A2M

पुणें चीफ एजंटस् :

—प्रभाकर एजन्सी—


रविवार पेठ पोस्ट ऑफिस शेजारी, | १००, रविवार पेठ, पुणें.

# कोना सोकांबा

जेवण अधिक रुचकर करण्यासाठीं

घरांतील, प्रवासांतील आणि खाणावळीं-तील जेवणांत अधिक रुचकरपणा आणण्यासाठीं सोकांबा, जॅम, चटणी व लोणचें यांसारखा उपयोगांत आणतां येतो. पावाला वर लावण्यास खास उपयोगी.

वापरल्यानें खात्री पटेल.




कोना प्रॉडक्टस

१७१ गिरगांवरोड मुंबई नं. ४

# ठेवींचा विमा

( लेखकः—गोविंद विठ्ठल सराफ, बी. ए., एलएल्. बी., बेळगांव )

चलनवाढीच्या काळांतील कंपन्यांच्या उलाढालीचे भरघोंस आंकडे पाहून, भडक जाहिरातींना भुलून किंवा जास्त व्याजाच्या आशेला लागून मध्यम वर्गीयांनीं आपल्या ठेवी निरनिराळ्या बँकांत व औद्योगिक कंपन्यांत ठेवल्या. आतां आर्थिक मंदीचीं पाउलें जलद गतीनें पडत असल्याचें दिसून येत असतां, यापैकीं कित्येक कंपन्यांची स्थिति घसरगुंडीस लागल्याचें उघडकीस येणें सहाजिक आहे. व्याजाचे दर वाढविण्याचें धोरण सरकारनेंच स्वीकारल्यामुळें, या कंपन्यांची अधिक कुचंबणा होत आहे. अशा वेळीं यांतील अव्यवस्थित कारभाराच्या कंपन्या डबघाईस येऊन ठेवीदारांचें अपरिमित नुकसान होण्याचा संभव जास्त दिसूं लागला आहे. सदर ठेवीदार वर्गांत केवळ या ठेवीच्या व्याजावरच चरितार्थासाठीं अवलंबून असणाऱ्या पेन्शनर, वृद्ध, बायाबापड्या, यांचाहि वर्ग असल्यानें ही एक सामाजिक आपत्तीच ठरेल. अशा ठेवींचा आंकडा नक्की समजणें आज शक्य नसलें तरी तो कोटींनींच मोजावा लागेल हें निःसंशय.

अशा प्रकारचे दुर्धर प्रसंग मधून मधून येऊन अनेक कुटुंबांची आर्थिक हानि झाल्यानें जनतेच्या विश्वासास धक्का बसून सामाजिक व राष्ट्रीय प्रगतीस खीळ पडल्याच्या अनुभवांची आठवण सोदाहरण देण्याची जरुरी दिसत नाहीं. परंतु असा प्रसंग येण्याचा बराच संभव दिसत असल्यानें, महाराष्ट्रांतील कांहीं सद्गृहस्थांनीं ठेवीदारांची परिषद् भरवून सरकारचें लक्ष या महत्त्वाच्या प्रश्नाकडे वेधण्याचा उपक्रम चालविला आहे. परंतु अशा व्यापक व जिव्हाळ्याच्या स्वरूपाच्या प्रश्नाचा विचार बऱ्याच दूरगामी व व्यावहारिक दृष्ट्या होणें योग्य असल्यानें, ज्यामुळें जनतेला आपला पैसा सुरक्षित असल्याची हमी मिळेल व त्याचबरोबर कर्तबगार पण प्रामाणिक उद्योगधुरिणांना आपल्या योजना यशस्वी रीतीनें तडीस नेण्यास धैर्य येईल अशीच योजना सरकारनें अमलांत आणणें इष्ट आहे. लिमिटेड कंपन्यांच्या डायरेक्टर मंडळींना व्यक्तिशः जबाबदार धरलें तरी ठेवीदारांच्या संभाव्य नुकसानीची भरपाई पुरेशी होणें अशक्यच ठरेल. सध्याच्या कंपनी कायद्यांतसुद्धां डायरेक्टर्सनीं अप्रामाणिकपणें किंवा बेजबाबदारपणें कारभार केल्याचें सिद्ध झाल्यास ते शिक्षेस पात्र आहेतच. परंतु कित्येक वेळां अंदाज चुकीचा ठरल्यामुळें किंवा परिस्थितींत आकस्मिक बदल झाल्यामुळें किंवा प्रतिकूल घटनांमुळें कंपन्यांना बरेंच नुकसान सोसावें लागत असल्याचें दिसून येतें. यावेळीं चुकीचें माप कोणाच्याच पदरांत निश्चितपणें घालतां येत नाहीं. तसेंच आमच्या देशाची विशिष्ट परिस्थिति लक्षांत घेतां असें दिसून येतें कीं, अद्याप सर्वसाधारण जनतेचा आपल्याकडील शिलकी पैसा बँकांकडे किंवा औद्योगिक कंपन्यांकडे ठेवीदाखल किंवा भांडवलासाठीं गुंतविण्याची प्रवृत्ति फारच कमी आहे. खेडेगांवांतील आम जनता तर, अद्याप जमिनी व सोनें खरीदण्यास उत्सुक दिसते. तें न जमलें तर पैसा तसाच पुरून ठेवतील, परंतु उत्पादक योजनांकडे गुंतविण्यास कबूल होणार नाहींत. याला इतर कारणें असलीं तरी पैशाच्या सुरक्षिततेची हमी नसणें हेंहि मुख्यतः कारण असतेंच. तेव्हां अशा तऱ्हेची हमी मिळण्याची एकमेव खात्रीची योजना म्हणजे या कंपन्यांनीं आपल्याकडील ठेवींचा विमा उतरविण्याचें कायद्यानें सक्तीचें करणें हीच होय आणि या दृष्टीनें मध्यवर्ती सरकारनें जरूर त्या योजना लवकर अमलांत आणून या महत्त्वाच्या बाबतींत नेहमींच वाटत राहणारी अनिश्चितता काढून टाकणें आवश्यक आहे. कित्येक बाबतींत सरकारनें स्वतः पुरस्कारलेल्या, सकृद्दर्शनीं फायदेशीर वाटणाऱ्या औद्योगिक कंपन्या बुडाल्याचा जनतेला महागाईचा अनुभव मिळालेला आहे.

वर आम्हीं सुचविलेली ठेवींचा विमा उतरविण्याची योजना आज अमेरिकेंत चांगलीच रूढ झाली आहे. त्यामुळें तेथील जनता आपला सर्वच पैसा बिनधोकपणें बँकांकडे टाकून देते. कारण, विमा कंपनीची हमी असल्यामुळें "बुडाली तर ?" हा विचार करण्याचें त्यांना कारणच पडत नाहीं आणि त्यामुळें अमेरिकेंत लहान-मोठ्या सर्वच बँका कार्यक्षम झाल्या आहेत व त्याचा परिणाम औद्योगिक विकासास पैशाचें भरपूर पाठबळ मिळण्यांत दिसून येतो. औद्योगिक कंपन्यांना दीर्घ मुदतीच्या ठेवी मिळत राहिल्याशिवाय त्यांची फेड करणें शक्य होत नाहीं. त्याचा दोष त्यांना देणें योग्य होणार नाहीं. कारण मोठ्या धंद्यांत मशिनरी, इमारतीकरितां गुंतविलेला पैसा ठराविक मुदतींत परत करणें शक्य नसतें. त्याला दीर्घ अवधीची जरूरी असते.

अमेरिकेंत अशा ठेवींचा विमा फेडरल डिपॉझिटर्स इन्शुरन्स कंपनीकडे उतरविण्यांत येत असल्यानें ठेवीदारांना कोणतीहि अनिश्चितता वाटत नसते. तसेंच, कंपन्यांना विम्याचा हप्ता भरावा लागत असल्यामुळें एकाप्रकारें कारभारावर नियंत्रण अप्रत्यक्षपणें येतें. एखाद्या बँकेचा कारभार बंद पडल्यास ही विमा कंपनी ठेवीदारांचे पैसे न चुकता देते. आपल्याकडील कंपन्या बुडतात, याचीं कारणें अप्रामाणिकपणापेक्षां संचालक मंडळाचें अननुभवित्त्व, तुटपुंजें भांडवल, अव्यवस्थित खर्चाचा बोजा, अशींच बव्हंशी असतात. ज्या कंपन्यांत केवळ एकहातीं अरेरावी कारभार असेल तेथें अप्रामाणिकपणालाहि वाव मिळण्याचा संभव असेल. परंतु कंपनीच्या नुकसानीस केवळ संचालक मंडळाचें अप्रामाणिकत्वच कारण असतें असें म्हणणें अयोग्य होईल. लढाईच्या काळांत सरकारनें वाहतूक कंपन्यांना वॉर रिस्क विमा सक्तीचा केला होता ही माहिती सर्वांस आहेच. विमा उतरविणें हें नेहमींच जरा खर्चाचें असतें हें खरें; परंतु त्यापासून होणारी अंतिम बचत व टळणारा सर्व प्रकारचा त्रास व हानि पाहतां हा खर्च इष्टच आहे याबद्दल दुमत होण्याचें कारण नाहीं. यामुळें एका महत्त्वाच्या विम्याच्या धंद्याची सुरवात आपल्या देशांत होऊन देशोन्नतीस चांगलीच मदत होणार आहे. याकरितां अर्थात मोठें भांडवलही लागणार हें निश्चित व म्हणूनच सरकारनें या बाबतींत पुढाकार घेणें आवश्यक आहे. यामुळें असाही फायदा होईल कीं, आज ठेवींची वाटणी प्रमाणशीर नाहीं. केवळ फार मोठ्या बँकांकडेच रक्कम बिनव्याजी टाकण्याकडे सधन लोकांची प्रवृत्ति आहे. याचें कारण त्यांत वाटणारी सुरक्षितता. विम्याची योजना अमलांत आल्यावर कोठेंही सवडीप्रमाणें रकम गुंतविण्यास धोका वाटणार नाहीं व सर्वांनाच सारखी संधी मिळेल. तरी या सूचनेचा मध्यवर्ती सरकार अवश्य विचार करेल अशी उमेद वाटते.

## जगांतील सर्वांत मोठ्या २० बँका


| | | एकुण जिंदगी ( डॉलर्स ) | ताळेबंद तारीख |
|---|---|---|---|
| १ | बँक ऑफ अमेरिका, एन्. टी. अँड एस. ए., सॅन फॅन्सिस्को | ६,५३,१०,००,००० | ३१-१२-५१ |
| २ | दि नॅशनल सिटी बँक ऑफ न्यूयॉर्क, न्यूयॉर्क | ५,९०,९०,००,००० | ” |
| ३ | दि चेस नॅशनल बँक ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्क, न्यूयॉर्क | ५,६०,७०,००,००० | ” |
| ४ | मिडलंड बँक लि., लंडन ( £ १,४६,८०,००,००० ) | ४,११,००,००,००० | ” |
| ५ | बार्कलेज बँक लि., लंडन ( £ १,३७,८०,००,००० ) | ३,८५,८०,००,००० | ” |
| ६ | बँको दो ब्राझील, रिओडि जानेरो ( Cr. ६४,५१,४०,००,००० ) | ३,५०,९०,००,००० | ३०-६-५१ |
| ७ | लॉइड्स् बँक लि., लंडन ( £ १,२०,५०,००,००० ) | ३,३७,४०,००,००० | ३१-१२-५१ |
| ८ | गॅरंटी ट्रस्ट कं., न्यूयॉर्क | ३,१३,६०,००,००० | ” |
| ९ | मॅन्युफॅक्चरर्स ट्रस्ट कं., न्यूयॉर्क | २,७६,६०,००,००० | ” |
| १० | कॉंटिनेंटल इलिनॉइस नॅशनल बँक अँड ट्रस्ट कं., शिकॅगो | २,७०,३०,००,००० | ” |
| ११ | फर्स्ट नॅशनल बँक ऑफ शिकॅगो, शिकॅगो | २,६८,३०,००,००० | ” |
| १२ | वेस्ट मिनिस्टर बँक लि., लंडन ( £ ९१,००,००,००० ) | २,५४,८०,००,००० | ” |
| १३ | रॉयल बँक ऑफ कॅनडा, मॉंट्रिअल | २,५१,५०,००,००० | ३०-११-५१ |
| १४ | नॅशनल प्रॉव्हि. बँक लि., लंडन ( £ ८७,८०,००,००० ) | २,४५,८०,००,००० | ३१-१२-५१ |
| १५ | बँक ऑफ मॉंट्रिअल, मॉंट्रिअल | २,२२,१०,००,००० | ३१-१०-५१ |
| १६ | बँकर्स ट्रस्ट कंपनी, न्यूयॉर्क | २,१७,१०,००,००० | ३१-१२-५१ |
| १७ | केमिकल बँक अँड ट्रस्ट कं., न्यूयॉर्क | १,९४,१०,००,००० | ” |
| १८ | सिक्युरिटी फर्स्ट नॅशनल बँक ऑफ लॉस एँजेल्स, लॉस एँजेल्स | १,८६,८०,००,००० | ” |
| १९ | दि हॅनोव्हर बँक, न्यूयॉर्क | १,८३,१०,००,००० | ” |
| २० | कॅनेडिअन बँक ऑफ कॉमर्स, टोरँटो. | १,७३,४०,००,००० | ३१-१०-५१ |

## भारतांतील सर्वांत मोठ्या आठ बँका

| | | एकूण जिंदगी ( डॉलर्स ) | |
|---|---|---|---|
| १ | इंपिरिअल बँक ( २,६१,७४,८५,००० रु. ) | ५२,३०,००,००० | ३१-१२-५१ |
| २ | सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( १,५५,११,८३,००० रु. ) | ३१,००,००,००० | ” |
| ३ | बँक ऑफ इंडिया ( ८१,९२,६०,००० रु. ) | १६,३८,००,००० | ” |
| ४ | पंजाब नॅशनल बँक ( ६७,५१,८२,००० रु. ) | १३,५०,००,००० | ” |
| ५ | युनायटेड कमर्शिअल बँक ( ४८,७३,५९,००० रु. ) | ९,७५,००,००० | ” |
| ६ | बँक ऑफ बरोडा ( ३९,४७,४५,००० रु. ) | ७,९०,००,००० | ” |
| ७ | युनायटेड बँक ऑफ इंडिया ( ३८,४६,४४,००० रु. ) | ७,७०,००,००० | ” |
| ८ | अलाहाबाद बँक ( ३२,३५,३०,००० रु. ) | ६,५०,००,००० | ” |




सातारा जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि. चे स्थापनेपासून ( १९३५ ) चेअरमन



श्री. आण्णाप्पा नारायण कल्याणी

# दि भारत इंडस्ट्रियल बँक लिमिटेड

## पुणें शहर

शाखा : पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर-तांबट ( जि. नाशिक ), खोपोली ( जि. कुलाबा )

**एकूण खेळतें भांडवल : रु. ६० लाखांचे वर**

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. बा. म. वाळवेकर, अध्यक्ष
श्री. का. म. महाजन, वकील
श्री. आर. वी. गिरमे, श्रीरामपूर
श्री. एच. बी गिरमे, मॅनेजिंग डायरेक्टर, सासवड माळी शुगर फॅक्टरी लि., माळीनगर.
श्री. आर. पी. दामोदरे, बारामती
श्री. के. पां. जोशी, वकील, उपाध्यक्ष.
श्री. भा. प. केळकर, व्यापारी. केळकर ब्रदर्सपैकीं.
सौ. इंदुमतीबाई फडके, बी. ए., ( ऑ. ), बी. टी.

मुंबई, नगर, नाशिक, बंगलोर, सोलापूर व सव शाखांवर डिमान्ड ड्राफटस् दिले जातात.

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

रा. बा. साळवेकर, बी. ए., एलएल. बी.,
नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स

**********************************************************************

बँकेचे सर्व खातेदार, भागीदार व असंख्य हितचिंतक यांना ही दिवाळी आनंदाची जावो.



# पुणें सेंट्रल को-ऑप. बँक लि., पुणें शहर

पोस्ट बॉक्स नं. ५११ टेलिफोन नं. १४८१

**नवीन शाखा:—भोर, पौड व वडगांव ( मावळ )**

घोडेगांव, तळेगांव ( दाभाडे ) व नारायणगांव येथें पे-ऑफिसेस सुरू केलीं आहेत.

**चालू व सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातील.**

**कायम ठेव खालील दरानें स्वीकारली जाते.**

१ वर्ष : २ टक्के, २ वर्षें : २॥ टक्के, ५ वर्षें : ३ टक्के, ७ वर्षें : ३॥ टक्के व १० वर्षें : ४ टक्के.
रुपये २५,००० चे पुढील ठेवी ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.
दराबद्दल समक्ष चौकशी करावी.

* * *

**मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट व्हॉल्ट व सेफ कस्टडीची सोय आहे.**
**याचा फायदा सर्वांनीं घ्यावा. दर अत्यंत माफक आहेत.**

मो. वि. रबडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें २

## मुख्य व महत्त्वाचें कार्य सिद्धीस गेलें आहे.

★ एक हजार टनांच्या सेमी-इलेक्ट्रिक मशिनरीची उभारणी होऊन सत्तर लक्ष रुपयांचें साखरेचें उत्पादन झालेलें आहे.

★ याचप्रमाणें यापुढें दरवर्षी सत्तर लक्ष रुपयांचें किंवा त्याहिपेक्षा अधिक साखरेचें उत्पादन होत जाणार.

## आरंभापासून कंपनीचें यश साखरेच्या भावावर न ठेवतां दर एकरीं उंसाचें टनेज व साखरेचा उतारा यांवर ठेविलें आहे.

महाराष्ट्रीय जनतेला शेअरपेक्षा ठेवी देणें अधिक पसंत असतें म्हणून शेअर-विक्री होईपर्यंत न थांबतां एक वर्ष मुदतीच्या ठेवी घेऊन १००० टनी मशिनरीची उभारणी पुरी केली व साखरेची कायमची उत्पादन-वाढ केली. अद्यापि तीस हजार पोतीं साखरेची विक्री व्हावयाची आहे. येत्या नोव्हेंबरमध्यें नवीन हंगाम सुरू होऊन साखर होऊ लागेल. येत्या हंगामांत साखरेवरील नियंत्रण जाणार अशी सरकारी घोषणा आहे.

## कोणाहि ठेवीदाराची अगर भागीदाराची एक पैचीहि बूड होणार नाहीं.

हा कारखाना महाराष्ट्राचा असल्यामुळें ठेवीदार मुदतवाढीचें सौजन्य दाखवीत होते व अजूनहि दाखवीत आहेत. परंतु मुदतवाढीच्या सौजन्यावर सर्वस्वी अवलंबून राहण्यापेक्षा अधिक मुदतीच्या ठेवींना व्याजाचा दर वाढवून उत्पादनाकडे जास्त लक्ष देणें इष्ट: याकरितां

## नवीन ठेवींचे व्याजाचे दर : खालीं दिल्याप्रमाणें ठेवले आहेत.

| ठेवीची मुदत | | | व्याजाचा दर |
|---|---|---|---|
| एक वर्ष | ... | ... | ६ ( सहा ) टक्के |
| दोन वर्षें | ... | ... | ६॥ ( साडेसहा ) टक्के |
| तीन वर्षें | ... | ... | ७ ( सात ) टक्के |

साखरेवरील नियंत्रण गेलें तर ठेवींची जरूरी भासणार नाहीं.

## शेअर-विक्रीहि सुरूच आहे.

शेअर व ठेवीचे फॉर्म सिंडिकेटच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

९८०, सदाशिव पेठ,
कॉमनवेल्थ बिल्डिंग,
लक्ष्मी रोड,
पुणें २.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एलएल. बी.,
सी. जी. आगाशे अॅण्ड कं.,
मॅनेजिंग एजंटस्.

यंदाची दिवाळी व नूतन वर्ष सिंडिकेटच्या भागीदारांस व ठेवीदारांस सुखाचें व भरभराटीचें जावो.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजानगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.